# आपला देश भारत



म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र.

IRBK-0114059

२५० समाज शिक्षण माला

# आपला देश—भारत

सादर भेट
प्रसिद्धि संचालक,
महाराष्ट्र शासन,
सचिवालय, मुंबई ३२.

लेखक

कृ. भा. बाबर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे वाचनालय शाखा.
अनुक्रम ........ वि........
क्रमांक ........ नोंद दि........

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ........ नों. दि ........
वि. ........ क्र. ........

समाज शि

IRBK-0114059

मालेचे दोनशे एकावन्नावे प्रकाशन

**झुंझार बुरूज**

**लेखक—श्री. बाबासाहेब पुरंदरे**

दि. २० ऑगस्ट १९७१ रोजी प्रकाशित होईल.

---

**वार्षिक वर्गणी रु. ५–००**

**या अंकाची किंमत रु. ३–००**

---

संपादक, मुद्रक, प्रकाशक : **डॉ. सरोजिनी बाबर**, एम्. ए., पीएच्. डी.
२०९५ सदाशिव पेठ, पुणे ३०.

मुद्रणस्थळ : **आनंद मुद्रणालय**, १५२३ सदाशिव पेठ, पुणे ३०.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ पुरस्कृत

# प्रास्ताविक :—

सगळ्या गावाची उचापत करणाऱ्या माणसाला आपल्या स्वत: बद्दल फार कमी कळतं म्हणतात. तीच गोष्ट इथं काय चाललंय, तिथं काय चाललंय याची विचारपूस करीत उभ्या दुनियेच्या चौकशीत गुंतलेल्या माणसांचीही. अशा लोकांना आपला देश कसा आहे, इथं काय चाललं आहे, काय होणं जरूरीचं आहे आणि त्या गडबडीत आपण कसं असायला पाहिजे याबद्दल फारसं ज्ञान नसतं. त्यामुळं केव्हातरी आपण आपला देश आपल्या लोकांना समजावून द्यावा या कल्पनेत मी होते. माझ्या वडिलांनी, ती. **कृ. भा. बाबर** यांनी सहज बोलण्यावरून बोलणं निघालं तेव्हा ही गोष्ट लक्षात घेतली. आपल्या नेहमीच्या अभ्यासू वृत्तीनं त्यांनी लेखन केलं. आज "**आपला देश–भारत.**" त्यामुळंच प्रकाशित होत आहे.

चालू महिना हा जुलाई महिना आहे. क्रांती घडवून आणलेला असा ऑगस्ट महिना आता लवकरच येणार आहे. त्यामुळं आमच्या **समाज शिक्षण मालेचं २५० प्रकाशन** हे देशाची माहिती करून देणार. असं प्रकाशित व्हावं, हा एक अपूर्व असा योगायोग आहे. म्हणूनच वाचकांना या पुस्तकाचं आगळं आकर्षण जाणवेल ही खात्री आहे. कारण हे पुस्तक सोपं आहे, खूप माहिती देणारं आहे.

समाज शिक्षण प्रकाशन
२०९५ सदाशिव, पेठ पुणे ३०
दि. २० जुलै १९७१.

**सरोजिनी बाबर**
संपादिका
समाज शिक्षण माला

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | आई आणि जन्मभूमी | १ |
| २. | अभिमान बाळगण्यासारख्या गोष्टी | ९ |
| ३. | देशाची स्वाभाविक रचना | २५ |
| ४. | राजकीय विभाग | ३८ |
| ५. | देशाचे उत्पन्न—शेती व जंगले | ५४ |
| ६. | देशाचे उत्पन्न—खनिज पदार्थ | ६८ |
| ७. | देशाचे इतर उत्पन्न | ७५ |
| ८. | लोक आणि त्यांची संस्कृती | ८२ |
| ९. | एकाच संस्कृतीची अनेक रूपे | ९४ |
| १०. | सुधारणेच्या काळात | ११५ |


—o—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ................ वि.................
क्रमांक ...................नोंद दि...............

# आपला देश–भारत

## १ आई आणि जन्मभूमी

जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपिगरीयसी ।

आई आणि जन्मभूमी त्या स्वर्गापेक्षा मोठ्या आहेत, असे आपल्या शहाण्या पूर्वजांनी म्हणून ठेविले आहे.

स्वर्ग आजवर कोणी पाहिलेला नाही, कारण तो मेल्याशिवाय दिसत नाही असे म्हणतात. आणि मेल्यानंतर काही सांगायसाठी कोणी परत तर येत नाही. निदान आजवर तरी कोणी आलेले नाही.

तथापि स्वर्गासंबंधी काही कल्पना लोक करून राहिलेले आहेत. पुण्यवान लोकांना मेल्यानंतर स्वर्गात जागा मिळते आणि तेथे सर्व प्रकारची सुखे असतात, दुःखाचा लवलेशही तेथे नसतो, अशी एक कल्पना आहे.

स्वर्गासंबंधाच्या अशा कल्पना ह्या भोळ्या कल्पना आहेत. मागे समाज शिक्षण मालेच्या २३६ व्या पुस्तकात 'स्वर्ग आहे कोठे ?' असा प्रश्न उत्पन्न करून मी त्या-

संबंधी सविस्तर माहिती दिलेली आहे.

असल्या ह्या स्वर्गात आपणाला मेल्यानंतर जाता यावे म्हणून पुष्कळ लोक जिवंतपणीच नाना यातना भोगीत असतात, अनेक प्रकारच्या व्रतांच्या आणि वैकल्यांच्या मागे लागतात.

काही असले तरी असल्या ह्या स्वर्गापेक्षा आई आणि जन्मभूमी ह्या मोठ्या आहेत, असे पूर्वीच्या शहाण्या व अनुभवी लोकांनी सांगितलेले आहे.

प्रत्येक माणसाच्या दृष्टीने त्याची आई मोठी असते, यात शंकाच नाही. तिनेच त्याला ह्या जगात आणून सोडलेले असते. आपल्या पोटात त्याला नऊ महिने वागविलेले असते आणि तसे करीत असताना अनेक प्रकारच्या यातना सोसलेल्या असतात. शेवटी जन्माला घालताना तर स्वतःच्या जिवावर उदार होण्याचीच तिला पाळी आलेली असते !

आणि यानंतर तर तिचे कष्ट संपलेले असतात काय ? छे, बिलकूल नाहीत. यानंतर आणखी कष्ट सुरू झालेले असतात. लहान मुलाला वाढविणे हे एक प्रकारचे दिव्यच असते. हे दिव्य आईच करू जाणे.

लहान मुलाला पाणी पाजणे, दूध पाजणे, न्हाऊ घालणे, त्याचे हागमूत काढणे, त्याचे कपडे बदलणे, त्याला मांडीवर किंवा कडेवर घेणे, त्याची आवडनिवड पुरविणे,

त्याचे रडे थांबविणे, त्याला हसायला लावणे, त्याच्यासाठी गाणी म्हणणे, त्याला झोके देणे, त्याला झोपविणे इत्यादि सारे प्रकार करण्यात आईचा सारा वेळ जातो, तिला काडीची विश्रांती मिळत नाही.

आणि हे मूल आजारीबिजारी झाले तर? तर आईची काय तारांबळ उडते हे तिचे तिलाच माहीत. तिचा जीव उडून गेलेला असतो, तिला खायला सुचत नाही की प्यायला सुचत नाही. आणि तिच्या डोळ्याला डोळाही लागत काही. डॉक्टरांच्याकडे किंवा वैद्यांकडे किंवा शेजारपाजारच्या आजीबाईकडे ती सारखी खेटचा घालीत असते. देवाला शेकडो नवस बोलते आणि बाळाला बरे वाटेपर्यंत तिला काहीही सुचत नाही. जणू काय ती ह्या मानवी जगात असतच नाही.

मूल मोठे होत जाते, तसे आईचे कष्ट वाढतच जातात. त्याच्या खाण्यापिण्याकडे तिला अधिक लक्ष द्यावे लागते. त्याच्या आवडीनिवडी वाढत जातात, त्या तिला पुरवाव्या लागतात, त्याच्या शिक्षणाकडे आणि त्याच्या खेळाकडेही तिला लक्ष द्यावे लागते.

हे सारे तिला घरचा रोजचा उद्योग सांभाळून करायचे असते. नवऱ्याच्या खाण्यापिण्याकडे आणि त्याच्या इतर तऱ्हा सांभाळण्याकडे तर तिला पाहावे लागतेच, पण घरातील स्वतःचीच इतर मुले आणि आले–गेले यांच्या-

कडेही काळजीपूर्वक लक्ष द्यावे लागते.

मूल लहानाचे मोठे होत जाते, तसतसे त्याचे कार्यक्षेत्र वाढत जाते. अगदी लहानपणी आईच्या मांडीवरच राहाणारे मूल पुढे रांगू खेळू लागते आणि घरातील जागा त्याला अपुरी वाटू लागते. ते अधिक मोठे झाले की, बाहेरच्या जगात वावरायला लागते. आता त्याला आईच्या मांडीची आणि घराचीही गरज उरत नाही. आता त्याचे लक्ष शेजारपाजारच्या मित्रमंडळीत आणि शाळासोबत्यात गुंतून राहते व घर हे केवळ एक खाण्यापिण्याचे किंवा विसाव्याचे ठिकाण बनते. ह्या काळात त्याला आईची आठवण क्वचितच अधून-मधून खाण्यापिण्याच्या वेळी किंवा इतर हट्ट पुरवून् घेण्याच्या वेळीच होते.

पण हेच मूल मोठे-अधिक मोठे होऊन कामधंदा किंवा रोजगार—व्यवसाय करू लागले आणि त्याचा विवाह होऊन वेगळा प्रपंच निर्माण झाला, म्हणजे त्याला जन्मदात्या आईची आठवण फारशी होईनाशी होते.

ज्या आईने त्याला ह्या जगात आणले, लहानाचे मोठे केले, त्यासाठी नाना यातना सहन केल्या, त्या आईला विसरणे याच्याइतका कृतघ्नपणा दुसरा कोणता असणार ? सर्वच मोठी माणसे असे करीत नाहीत हे खरे, पण स्वर्गापेक्षा मोठी असलेली आपली आई आपणासाठी

काय काय करून राहिलेली आहे, याची जाणीव सतत ठेवणे हेच शहाणपणाचे आहे. खरी माणुसकी तेथेच आहे, हे विसरता कामा नये.

माणसाच्या जीवनात आईला जे स्थान आहे, तेच स्थान जन्मभूमीलाही आहे. जन्मभूमी म्हणजे ज्या ठिकाणी आपण जन्मलो, अथवा ज्या ठिकाणी आपण लहानाचे मोठे झालो, ते ठिकाण.

ह्या जन्मभूमीत आपण लहानाचे मोठे होतो, एथल्या मातीत लोळतो–खेळतो, येथले अन्न खातो, येथले पाणी पितो आणि येथल्याच हवेवर जगत असतो.

आपण लहानाचे मोठे कसे होतो, हे आपल्या लक्षात येत नाही. कारण हे कार्य नकळत हळू हळू घडत असते. पण आपण लहानाचे मोठे होतो म्हणजे काय होते बरे ? आपले शरीर वाढते. आपली हाडे वाढतात, मांस वाढते आणि शक्तीही वाढते. हे होण्यास आपण खातो ते अन्न, पितो ते पाणी दूध इत्यादि आणि घेतो ती हवा कारणीभूत होत असते. जन्मभूमीच हे आपणाला पुरवते.

आपण ज्वारीची किंवा बाजरीची भाकरी खातो, गव्हाची पोळी किंवा चपाती खातो, तांदळाचा किंवा राळ्याचा भात खातो; निरनिराळ्या डाळींची आमटी किंवा कालवण खातो आणि मिळतील तितक्या भाज्याही खातो; केळी, आंबा, फणस, द्राक्षे, सफरचंद, संत्री,

मोसंबी, अंजीर, चिकू, करवंदे इत्यादि फळांपैकी काही फळेही खातो. हे सारे मिळते कोठून ? आपल्या जन्मभूमीतूनच की नाही ?

आपण वापरतो ते कपडे–शर्ट, फेटा किंवा टोपी, धोतर किंवा विजार, लुगडे, चोळी किंवा झंपर, पोलके अथवा असलेच काहीतरी आणि अंथरायला व पांघरायला लागणारे कपडे हे येतात कोठून ? जन्मभूमीच हे पुरवते.

आणि आपण राहातो ते घर किंवा झोपडी तयार झालेली असते, ती जन्मभूमीवरच आणि तिनेच तयार केलेल्या मालमसाल्याच्या साह्याने.

आपण खातो–पितो त्या अन्नपाण्याच्या योगाने आपल्या शरीरात रक्त तयार होते आणि ह्या रक्तावरच तर आपले शरीर चालत असते. तेव्हा जन्मभूमीवरच आपले जीवन अवलंबून असते, हे कबूल करावयास हवे.

पण हे किती जणांच्या लक्षात येते ? मोठे झाल्यावर पुष्कळजण आईचे उपकार विसरतात, तसेच बहुतेकजण जन्मभूमीचेही उपकार विसरत असतात.

आई आणि जन्मभूमी ह्या स्वर्गाहूनही मोठ्या आहेत, हे सांगणाऱ्या थोर पुरुषांना त्यांचे हे उपकार सतत आठवत असले पाहिजेत, यात शंका नाही.

आई आणि जन्मभूमी यांचे उपकार सतत लक्षात ठेवायचे, याचा अर्थ त्यांच्यासंबंधाची आपली कर्तव्ये

जाणून घेऊन ती सतत पार पाडीत असायचे.

आईला तिच्या हयातीपर्यंत समधान लाभेल असे वागणे हे आपल्या कर्तव्यातील प्रमुख कर्तव्य आहे. जन्मभूमीसंबंधीही असेच आपले महत्त्वाचे कर्तव्य आहे. पण जन्मभूमीसंबंधीची आपली जाणीवच कमी असल्यामुळे, हे कर्तव्य आपल्या लक्षात येत नाही. आपले जीवन योग्य प्रकारे जावे असे वाटणाऱ्यांना जन्मभूमीसंबंधीची जाणीव नीट असणे जरूर आहे.

ज्या ठिकाणी आपण जन्माला येतो किंवा ज्या ठिकाणी आपला पूर्व आयुष्यातला काळ जातो, त्या ठिकाणाला जन्मभूमी म्हणायचे, हे वर सांगितले आहेच. पण तेवढ्याने जन्मभूमीसंबंधीची कल्पना आपणाला नीट येणार नाही. आपण जन्माला आलो असेल ते एखादे गाव किंवा बाळपणचे आणि थोडे मोठे झाल्यानंतरचे आपले दिवस जेथे गेले असतील ती एक किंवा अधिक ठिकाणे म्हणजेच जन्मभूमी समजणे बरोबर होणार नाही.

आपले भरण–पोषण केवळ एका चारदोन गावांनीच केलेले नसते. आपणाला रोजच्या व्यवहाराला लागणाऱ्या हरतऱ्हेच्या वस्तू ह्या कितीतरी गावांनी पुरविलेल्या असतात; तेव्हा ही गावे ज्या एखाद्या विभागात असतात तो विभाग किंवा तो देश म्हणजे आपली जन्मभूमी एवढी व्यापक कल्पना जन्मभूमीच्यासंबंधात आपण बाळगावयास

हवी. म्हणूनच शहाणे लोक आपला देश हीच आपली जन्मभूमी समजत असतात.

ह्या दृष्टीने विचार केला असता आपला देश म्हणजे भारत होय. आज आपण ह्या देशाला भारत म्हणतो. ह्या-पूर्वी इंग्रज लोकांच्या ताब्यात तो होता, तेव्हा ते त्याला इंडिया म्हणत; आणि त्याच्या आधी ह्या देशाचा बराच भाग मुसलमान राज्यकर्त्यांच्या ताब्यात होता, तेव्हा ह्याच देशाला ते हिंदुस्थान म्हणत असत. आणि त्यांच्याही आधी ह्या देशाच्या उत्तर भागाला आर्यावर्त व दक्षिण भागाला दक्षिणापथ ही नावे होती. आपल्या ह्या देशा-बद्दल–आपल्या ह्या जन्मभूमीबद्दल–आपण आदर आणि अभिमान तर बाळगला पाहिजेच, पण त्याच्यासंबंधी नीट समजूतही आपणाला हवी आहे.

## २. अभिमान बाळगण्यासारख्या गोष्टी

भारत हा आपला देश. ह्या देशात आपण जन्माला आलो आणि ह्या देशाच्या अन्नपाण्यावर आपण वाढलो, म्हणूनच केवळ ह्या देशाबद्दल आपण अभिमान बाळगला पाहिजे असे नाही, तर हा देश आहेच तसा मोठा की, ज्याच्याबद्दल आपणालाच नव्हे तर इतरांनाही अभिमान वाटावा.

एक तर हा देश तसा फार मोठा आहे. चीनच्या खालोखाल जगातील दुसऱ्या क्रमांकाचा तो आहे. १९७१ सालच्या नुकत्याच झालेल्या लोकांच्या मोजणीवरून ह्या देशाची लोकसंख्या ५४ कोटी ६९ लक्ष ५५ हजार ९४५ एवढी भरलेली आहे. साऱ्या जगाच्या म्हणजे पृथ्वीवरील सर्व देशांच्या लोकसंख्येच्या सातव्या हिश्श्याएवढी ती आहे; आणि रशिया सोडला, तर जवळजवळ सर्व युरोप-खंडाएवढा हा देश क्षेत्रफळानेही मोठा आहे. म्हणजे भारत हा देश एक लहानसे खंडच आहे, म्हटले तरी चालेल. ५६ देशचे आणि ९६ कुळींचे राजे येथेच होऊन गेले; इतकेच नव्हे तर नऊ खंड पिरतिमी आणि दहावे खंड काशी म्हणून पूर्वीच्या काळचे सामान्य लोक म्हणत,

ते ह्या देशालाच ! देश फार मोठा आणि पूर्वी दळण-वळणाची साधने फारशी नव्हतीच, त्यामुळे ह्या देशात फिरणाराला तो अवाढव्य-अंत न पार नसलेला वाटला तर नवल काय ? आज आता मोटारीने, रेल्वेने किंवा विमानाने प्रवास करताना फारसे काही वाटत नसले, तरी ह्या देशाच्या उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत म्हणजे काश्मीरच्या उत्तर टोकापासून कन्याकुमारीपर्यंत चालत जायचे ठरविले, आणि रोज ३० मैल जायचे म्हटले, तरी एक दिवसही विसावा न घेता आपणास दोन महिन्यांहून अधिक काळ चालतच राहावे लागेल !

दुसरे असे की हा देश फार जुन्या काळापासून प्रसिद्ध आहे. जगातील सुधारलेल्या देशांमध्ये तो अग्रगण्य–म्हणजे सर्वांत महत्त्वाचा असा होता. पूर्वीच्या काळी ह्या देशाला सुवर्णभूमी म्हणत असत. येथे सोन्याचा धूर निघत होता, असे म्हटले जात होते; आणि म्हणूनच जगातील सर्व देशातील लोक व्यापाराच्या व शिक्षणाच्या निमित्ताने इकडे धाव घेत असत.

भारतातील प्राचीन काळच्या विद्वानांनी–ऋषीमुनींनी रचलेले वेदवाङ्मय हे जगातील आजच्या वाङ्मयातील सर्वांत जुने वाङ्मय आहे. वेद म्हणजे ज्ञान. हे ज्ञान सुमारे चारपाच हजार वर्षांपूर्वीचे आहे. ह्या वेदांच्या अभ्यासावरून त्या काळचे भारताचे लोक किती तरी सुधारलेले

होते, हे दिसून येते.

वेदांच्या नंतर काही काळाने तयार झालेले जे उपनिषद् वाङमय त्याला तर जगाच्या वाङमयात तोड नाही. हे जग, त्याची उत्पत्ती आणि माणूस व त्याचे जीवन–जन्म-मृत्यु इत्यादीसंबंधी उपनिषदे तयार करणाऱ्या शहाण्या लोकांनी एवढा खोल अभ्यास केलेला आहे की, आजच्या सुधारलेल्या जगातील पश्चिमेकडील विद्वानही हा अभ्यास करताना थक्क होऊन जातात ! धार्मिक तत्त्वज्ञानाची मजल आजही त्यापुढे जाऊ शकलेली नाही.

हिंदू लोकांच्या धार्मिक ग्रंथात श्रीमद्‌भगवद्‌गीतेला फार मोठे स्थान आहे. ही गीता म्हणजे भगवान श्रीकृष्णाने काढलेले उपनिषदांचे सारच आहे. सारी उप-निषदे म्हणजे जणू काय गाई असून, भगवान श्रीकृष्णांनी ह्या गाईची धार काढून काढलेले दूध म्हणजे गीता होय, असे म्हणण्यात येते. डॉ. ॲनी बेझांट बाईने व इतरही युरोपियन लोकांनी ह्या गीतेचे अनेक भाषांत भाषांतर केलेले आहे व तिच्या लाखो प्रती आजवर जगात खप-लेल्या आहेत.

असले थोर पुरुष पूर्वी आपल्या देशात होऊन गेलेले आहेत. त्यामुळे भारत हा एके काळी सगळ्या जगाच्या गुरुस्थानी होता. इ. स. पूर्वी सातव्या शतकात तक्षशीला (पंजाबात) येथे फार मोठे विद्यापाठ होते. प्रसिद्ध

व्याकरणकार पाणिनी याचे शिक्षण ह्याच विद्यापीठात झालेले होते.

इ. स. च्या पाचव्या शतकात नालंदा (बहार प्रांत) यथे असेच मोठे विद्यापीठ स्थापन झालेले होते. चिनी प्रवासी इत् सिग, फाहिआन व युआन च्यांग हे काही दिवस त्या विद्यापीठात ज्ञान मिळविण्यासाठी येऊन राहिलेले होते.

तक्षशीला व नालंदा येथे शिक्षण घेण्यासाठी जगातील अनेक देशांतील विद्यार्थी येत असत. सातव्या शतकाच्या सुमारास नालंदा विद्यापीठात शिक्षण घेणारे भिक्षू ५००० वर होते. इ. स. ६४५ ते ६७५ पर्यंत चीन, तिबेट, बुखारा, कोरिया, इ. देशांतील बरेच विद्यार्थी एथे येऊन राहिले होते. नालंदाच्या खर्चासाठी निरनिराळ्या राजांनी सुमारे १०० गावे दिलेली होती. त्यामुळे तेथे शिकणाऱ्या सर्व भिक्षूंना–विद्यार्थ्यांना–जेवण, कपडे व औषधे फुकट मिळत. नवव्या शतकात तर आंतरराष्ट्रीय शिक्षणकेंद्र म्हणून नालंदाची प्रसिद्धी झालेली होती.

जगाने निरनिराळ्या देशांकडून जे ऋण घेतलेले आहे, त्या संबंधात असे म्हणतात की, ग्रीस देशाने वाङ्मय आणि कला दिल्या, रोमन लोकांनी कायदे, सिमेंट आणि इमारतीतील कमानीची कल्पना दिली, अरबांनी अल्जिब्रा (बीजगणित) व वैद्यकी यांचे ज्ञान दिले.

इजिप्तने शास्त्र, भूगोल व तत्त्वज्ञान वाढीला लावले, तर भारताने तत्त्वज्ञान, गणित, ज्योतिष व वैद्यक यांच्या ज्ञानाचा पुरवठा केला. अंकगणितातील १ ते ९ आकडे जगाला माहीत होते, पण भारताने शून्याची कल्पना देऊन गणिताला पुरेपणा आणला.

हिजरी सनाच्या २ ऱ्या शतकात म्हणजे इ. स. च्या आठव्या शतकात अरबांनी हिंदूंच्या वाङमय व सायन्स (शास्त्र) यांची माहिती घेण्यास सुरवात केली. बुद्धाचे वाङ्मय उदा० ‘ सिद्धान्त ’ व सुश्रुत, चरक वगैरे औषधा-संबंधांचे ग्रंथ, तसेच खगोलशास्त्र (आकाशातील ज्योती-संबंधांचे म्हणजे ग्रह व तारे यांच्या संबंधांचे शास्त्र) यांचे त्यांनी भाषांतर केले. आर्य चाणक्याच्या अर्थशास्त्राचे व ‘ पंचतंत्रा ’ चे आणि ‘ हितोपदेशा ’ चेही भाषांतर त्यांनी केले.

अलकिंदी याने हिंदुस्तानातील निरनिराळ्या धर्मांच्या माहितीचा ग्रंथ लिहिला, तर सुलेमान व मसूदी यांनी हिंदुस्तानातील प्रवासात अनेक प्रकारची माहिती मिळवून तीवर ग्रंथ लिहिले. मसूदी याने इ. स. ९१६ मध्ये हिंदुस्तानास भेट दिली होती.

यापूर्वीच कितीतरी अगोदर म्हणजे आजपासून सुमारे २ हजार वर्षांपूर्वी महाभारत व रामायण हे दोन महत्त्वाचे ग्रंथ भगवान व्यासमुनी व महर्षी वाल्मीकी यांनी भारतात




व्यासमुनी

तयार केलेले होते. हे दोन ग्रंथ आणि पुराणे यांमध्ये भारताचा पूर्वीचा बराचसा इतिहास व ज्ञान एकत्र करण्यात आलेले आहे. महाभारतात इतिहास आहे, कथा आहेत, वाङ्मय आहे, तत्त्वज्ञान आहे आणि नीतीचा उपदेशही आहे. त्यात काय नाही ?

व्यासोच्छिष्टं जगत् सर्वम्

म्हणजे व्यासाने सगळे जग उष्टे करून सोडलेले आहे, म्हणजे जगातील सर्व प्रकारच्या ज्ञानाचा साठा त्याने करून ठेवलेला आहे, असे म्हटलेले आहे.



वाल्मीकि

रामायणात भगवान श्रीरामचंद्राची कथा आहे आणि ह्या एकपत्नी व एकवचनी थोर पुरुषाचे चरित्र भारतातील पुष्कळ लोकांना आजही

पवित्र वाटत आहे. 'रामायण' वाल्मीकींनी रचलेले आहे. महाभारतात अनेक थोर पुरुषांचा उल्लेख आलेला आहे, तथापि भगवान श्रीकृष्णाच्या चरित्राचा त्यामध्ये मोठा भाग आहे.

भगवान श्रीरामचंद्र व भगवान श्रीकृष्ण हे हिंदू लोकांचे म्हणजे भारतातील बहुसंख्य (पुष्कळ) लोकांचे देवच बनलेले आहेत. यांच्यानंतर जैन व बौद्ध धर्माची स्थापना करणारे भगवान महावीर व महात्मा गौतमबुद्ध आणि त्या नंतर धार्मिक व तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात कार्य केलेले थोर पुरुष श्रीमत् शंकराचार्य, रामानुजाचार्य, वल्लभाचार्य, निंबादित्य, बसवेश्वर, ज्ञानेश्नर, नामदेव, एकनाथ, रामदास, तुकाराम, कबीर, नानक, तुळशीदास, चैतन्य व अगदी अलीकडील रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ, महर्षी अरविंद, रमण महर्षी यांचा उल्लेख केल्यावर केवढी मोठी माणसे आपल्या देशात होऊन गेली, ते लक्षात येईल. स्वामी विवेकानंद व स्वामी रामतीर्थ यांनी तर अमेरिका, यूरोप व जपान येथेही भारतीय तत्त्वज्ञानाचा झेंडा फडकविलेला आहे.

आणि आज अपरंपार पैसा मिळवून वैभवात लोळणाऱ्या अमेरिकेतील व युरोपातील लोकांना मनाला खरे समाधान मिळविण्यासाठी भारताकडेच धाव घ्यावी लागत आहे. केवळ खायला-प्यायला भरपूर असले, तरी

खरे समाधान मिळत नाही. ते मिळण्यासाठी मनाचीच तयारी अधिक करावी लागते.

'बुद्धीच्या वाढीपेक्षा अंतःकरणाचा विकास अधिक करा' असा श्रीमत् स्वामी विवेकानंदांचा संदेश आहे.

कौपीनवन्तः खलु भाग्यवन्तः

म्हणजे लंगोटीवालाच खरा भाग्यवान असेही आपल्या पूर्वजांनी म्हणून ठेवले आहे. त्याचा अर्थ

भोगापेक्षा त्यागातच खरे सुख आहे

हे सांगण्याचा आहे. हा अर्थ भारतातील ऋषी–मुनींनी जाणलेला होता. हा अर्थ लक्षात घेऊन ते वागत होते आणि त्यामुळेच त्यांना समाजात फार मोठा मान होता.

स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते

असेही एक वचन आहे. राजाला फार तर आपल्या राज्यात मान असेल, पण विद्वानाला सर्वत्र–सर्व जगात–मान असतो, असा ह्या वचनाचा अर्थ आहे. येथे विद्वान म्हणजे शहाणा, ज्याला खरे ज्ञान मिळाले आहे तो, असा अर्थ आहे.

असे त्यागी थोर पुरुष आपल्या देशात पूर्वी पुष्कळ होऊन गेले. आजही आहेत. आपणाला अभिमान वाटण्यासारखी केवढी मोठी गोष्ट आहे ही. बुद्धदेव किंवा महावीर यांनी असलेल्या राज्याचा आणि वैभवाचा त्याग करून धर्मज्ञान मिळवले व ते आयुष्यभर सर्व सामान्य

जनतेला प्राप्त करून दिले. पहिल्या शंकराचार्यांनी आणि नंतर ज्ञानेश्वरमाऊलीने तर प्रपंचाच्या फंदात न पडता केवळ थोड्या आयुष्यात अवाढव्य काम करून ठेवले. अलिकडे स्वामी विवेकानंद आणि त्यांनी स्थापन केलेल्या रामकृष्ण–मठातील संन्यासी–साधूंनी असाच मोठा त्याग करून धर्म आणि नीती ह्यांच्या प्रसाराचे कार्य चालविलेले आहे. आणि संत विनोबा भावे स्वतःचा कसलाही प्रपंच न करता राष्ट्राच्या–देशाच्या–प्रपंचासाठीच आयुष्य वेचीत आहेत.

केवळ अहिंसेच्या मार्गाने आपला भारत देश स्वतंत्र करणारे महात्मा गांधी यांच्या त्यागाला तर तुलनाच नाही. आपले वैभव व आपली विद्वत्ता यांचा त्याग करून त्यांनी गरिबीचे व्रत स्वीकारले व जनतेच्या हितासाठीच सबंध आयुष्य घालविले. त्यांनी किती वेळा तुरुंगवास भोगला आणि किती हाल–अपेष्टा सोसल्या त्याला मर्यादा नाही. गांधीजीएवढा मोठा माणूस अलीकडच्या काळात आपल्या देशातच काय साऱ्या जगात झालेला नाही.

शूरवीरांची तर ही जननीच आहे. समाजासाठी आणि देशासाठी आपल्या प्राणांची आहुती देणारे हजारो थोर पुरुष आजवर ह्या देशात होऊन गेलेले आहेत. महाभारत आणि रामायण यांच्यामध्ये प्राचीन काळच्या वीर पुरुषांची चरित्रे गायलेली आहेतच. पण त्यानंतर चंद्रगुप्त मौर्य,

सम्राट अशोक, हर्षवर्धन आणि पुलकेशी, पृथ्वीराज चव्हाण, राणा संग आणि राणा प्रताप, छत्रपती शिवाजी व संभाजी महाराज, पहिला बाजीराव पेशवा, छत्रसाल बुंदेला, गुरू गोविंदसिंग व रणजितसिंग, राणी पद्मिनी व राणी लक्ष्मीबाई ह्या इतिहासातील व्यक्ती आणि अलीकडच्या काळात इंग्रजांच्याकडून स्वातंत्र्य मिळविण्यासाठी जिवावर उदार झालेले लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, लाला लजपतराय, स्वामी श्रद्धानंद, बिपिनचंद्र पाल, सत्यमूर्ती, चित्तरंजनदास, खुदीराम बोस, वासुदेव बळवंत फडके व चाफेकर बंधू, स्वातंत्र्यवीर सावरकर, नेताजी सुभाषचंद्र बोस, पंडित मोतीलाल व जवाहरलाल नेहरू, भगतसिंह, सुखदेव व राजगुरू आणि सरदार वल्लभाई पटेल, देवी सरोजिनी नायडू व १९२१ च्या, १९३० च्या आणि १९४२ च्या लढ्यामध्ये प्राणास मुकलेले शेकडो देशभक्त यांच्या त्यागाने पावन झालेला असा हा आपला देश आहे; ही काय कमी अभिमानाची गोष्ट आहे ?

आणि ह्या आपल्या देशात समाजसुधारक तरी आजवर काय कमी झालेले आहेत ? समाजाच्या डोळ्यावरील रूढीची झापड उडावी आणि त्याने विचार करायला लागावे, म्हणून आजवर कितीतरी लोकांनी प्रयत्न केले आहेत.

या दृष्टीने पहिल्या प्रथम चार्वाकपंथी लोकांची

आठवण होते. चार्वाक ह्या नावाचा कोणी थोर पुरुष होऊन गेला की नाही कळत नाही, कारण त्याबद्दल निश्चित पुरावा मिळत नाही. पण त्याच्या नावावर एक विचारसरणी मात्र इ. स. पूर्वी आठव्या शतकापासून आजवर चालत आलेली आहे.

हिंदू लोकांचे मूळ ग्रंथ जे वेद, ते ईश्वरप्रणीत आहेत, म्हणजे ते कोणी माणसांनी रचलेले नाहीत, तर ईश्वरानेच ते तयार केलेले आहेत, अशी कल्पना समाजात जेव्हा वाढीला लागली, तेव्हा चार्वाकांनी तिच्यावर हल्ला चढविला. ते म्हणाले, ईश्वरच मुळी नाही. त्याला माणसांनीच बनविलेला–मानलेला आहे. तेव्हा वेद हे माणसांनीच रचलेले आहेत. वेदाच्या काळानंतर यज्ञयाग करण्याचे आणि ब्राह्मण-पुरोहितांचे बंड माजलेले होते. ह्या बंडाच्या विरूद्धही चार्वाकांनीच बंड उभारले. पुरोहित लोक हे एकजात कपटी आणि लबाड आहेत, ते सामान्य लोकांना फसवून आपली पोटे जाळीत आहेत. तेव्हा लोकांनी सावध व्हावे. ईश्वर किंवा देव, पूर्वजन्म आणि पुनर्जन्म, स्वर्ग आणि नरक वगैरे कल्पना धूर्त लोकांनी आपल्या डोक्यातून काढलेल्या आहेत, त्या साऱ्या खोट्या आहेत, त्यांच्या नादी कोणी लागू नये; असे हे चार्वाकवादी लोक सांगत. आपल्या बुद्धीला जे पटेल तेच खरे मानावे. केवळ मोठ्या माणसाने सांगितले आहे म्हणून

मुकाट्याने माना डोलावू नयेत. आपले चालू जीवन हेच खरे जीवन. सुखाने, समाधानाने सर्व प्रकारचे भोग भोगीत आनंदाने जगावे. पातिव्रत्य वगैरे कल्पना जुलमी पुरुषांनी स्त्रियांवर लादलेल्या आहेत. जातीभेद, वर्णभेद वगैरे सब झूट आहेत, अशी ही चार्वाकांची विचारसरणी होती.

वेदानंतर उपनिषदांनी जशी विचारात क्रांती घडवून आणली, नवे विचार मांडले, तशाच प्रकारचे आणि त्याच काळाच्या सुमाराचे हे चार्वाकांचे विचार आहेत. चार्वाकांनी लोकांच्या विचाराला धक्के दिले, यात शंका नाही.

चार्वाकांच्या पंथाला 'लोकायत' असे नाव होते. लोकायत म्हणजे 'लोकात गेलेला, लोकांचा' पंथ होय. सर्वसामान्य माणसांच्या हितासाठी हा पंथ निघालेला होता. 'सर्व सिद्धांत संग्रहा'त लोकायतांचा म्हणून दिलेला खालील श्लोक ह्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे.

> कृषि गोरक्षवाणिज्यं दण्डनीत्यादिभिः बुधः ।
> दृष्टैरेव सदोपत्यैः भोगाननुभवेद भुवि ।।

म्हणजे शहाण्या, जाणत्या माणसाने शेतीभाती, गोपालन (जनावरे पाळणे), व्यापारउदीम, सरकारी कामकाज वगैरेसारख्या सरळ मार्गांचा अवलंब करून धन मिळवावे व सुखाचा उपभोग घ्यावा.

उपनिषदांच्या आणि चार्वाकांच्या नंतर जैन व बौद्ध

धर्म उदयास आले. ह्या धर्मांनीही ईश्वर मानलेला नाही आणि जातीभेद किंवा वर्णभेद न मानता माणसाने नीतीने वागावे, ह्याच्यावर भर दिलेला आहे, ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. म्हणजे ह्या धर्मांनी एकप्रकारे मोठी सामाजिक क्रांतीच केलेली होती.

जातीभेद किंवा वर्णभेद म्हणजे जन्मानेच एखादा मनुष्य श्रेष्ठ किंवा वरच्या दर्जाचा व एखादा कनिष्ट किंवा खालच्या प्रतीचा असे मानण्याचा रोग आपल्या समाजाला जडलेला आहे. हा रोग बराच जुना आहे, तो नाहीसा करून समाजामध्ये समता–सारखेपणा व बंधुत्व –भावासारखी वागणूक–निर्माण करण्याचा प्रयत्न चार्वाक किंवा लोकायतनी पुढाऱ्यांनी व जैन आणि बौद्ध धर्मी लोकांनी बऱ्याच चांगल्या प्रकारे केला, पण हजार–बाराशे वर्षे गेल्यानंतर आणि जैन व बौद्ध धर्माचे महत्त्व कमी होत गेल्यानंतर पुन्हा समाजामध्ये उच्चनीच भाव निर्माण झाला व भोळ्या समजुती वाढीला लागल्या.

म्हणून मग पुन्हा समाजसुधारणेचे प्रयत्न काही थोर लोकांनी केले. गुजराथेत व विशेषतः महाराष्ट्रात पसरलेल्या महानुभाव पंथाने, महाराष्ट्रातच सुरवात होऊन पंजाबपर्यंत गेलेल्या वारकरी सांप्रदायाने आणि त्याच सुमाराला स्थापन झालेल्या लिंगायत धर्माने ह्या दृष्टीने चांगले काम केले. उत्तरेकडे शीख धर्मीयांनी व कबीर–

पंथाच्या लोकांनी अशाच प्रकारचा प्रयत्न केला. महानुभाव धर्म स्थापन करणारे स्वामी चक्रधर, नाथसंप्रदायातून वारकरीपंथ स्थापन करणारे ज्ञानेश्वर, नामदेव इत्यादि संत, लिंगायत धर्म संस्थापक महाराज बसवेश्वर, शीखांचे आद्य (सुरवातीचे) गुरु नानक, संत कबीर इत्यादि सातशे-आठशे वर्षांपूर्वीचे थोर पुरुष व त्यानंतर होऊन गेलेल्या सर्व साधूसंतांनी परमेश्वराच्या दरबारी उच्चनीच भाव नाही, आपण सर्व माणसे एकाच परमेश्वराची लेकरे असल्यामुळे आपणांमध्ये बंधुत्वाचे नाते आहे, वगैरे सांगून समाजाला जागे करण्याचा प्रयत्न केला. संत एकनाथांनी तर ब्राह्मणाआधी महारांना जेवू घातले. त्यांनी व तुकाराम महाराजांनी लोकांच्या ढोंगीपणावर चांगले कोरडे ओढले.

पण जातीभेदाच्या आणि उच्चनीच कल्पनेच्या रोगाची पाळेमुळे एवढी खोलवर गेली आहेत की, ती अजूनही निपटून निघालेली नाहीत. कुळवाने किंवा नांगराने निघून गेलेल्या हरळीसारखा किंवा लव्हाळ्यासारखा काही काळ सुधारलेला देखावा दिसला, तरी तो लवकरच नाहीसा होतो. पाऊस पडून गेला की, हरळीच्या मुळाला आणि लव्हाळ्याच्या गड्डयाला अंकूर फुटतात, तसेच ह्या रोगाने पुन्हा उचल खाल्लेली दिसते.

म्हणून सामाजिक सुधारणेचे कार्य सतत चालूच ठेवावे

लागले आहे. अलीकडच्या काळात बंगालमधील राजा राममोहन रॉय यांनी स्थापन केलेला ब्राह्मोसमाज, डॉ. भांडारकर वगैरेंनी महाराष्ट्रात स्थापन केलेला प्रार्थना समाज, गुजराथेत व नंतर पंजाबात स्वामी दयानंदांनी पसरविलेला आर्यसमाज व पुण्याला स्थापन केलेला महात्मा जोतीराव फुले यांचा सत्यशोधक समाज ह्यांनी हेच काम सुरू केले व ते त्यांच्या अनुयायांनी आजवर चालू ठेवलेले आहे. जोतीराव फुले, महर्षि धोंडो केशव कर्वे, श्री. गोपाळ कृष्ण देवधर वगैरे लोकांनी स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रश्न हाती घेऊन हेच कार्य केलेले आहे. न्या. रानडे व प्रि. गोपाळराव आगरकर यांनी ह्या दिशेनेच आयुष्यभर काम केले.

महात्मा गांधीजींनी व विशेषतः डॉ. आंबेडकर यांनी खालच्या प्रतीच्या म्हणजे हरिजनाच्या हितासाठी–त्यांच्या उद्धारासाठी–जे काम केले, ते ह्याच दृष्टीने अतिशय मोलाचे ठरलेले आहे.

आणि आज समाजवादी समाजरचना करण्याचे व्रत स्वीकारून आपल्या देशातील प्रमुख पुढारी श्रीमती इंदिरा गांधी, श्री. यशवंतराव चव्हाण वगैरे लोक जे कार्य करीत आहेत, ती मोठ्या प्रमाणावरील समाज-सुधारणाच आहे.

ह्याशिवाय आजवर आपल्या देशात मोठे कवी,

संशोधन करणारे, गणिती वगैरे लोक होऊन गेलेले आहेत आणि त्यांनीही भारताचे नाव उजळलेले आहे. व्यास-वाल्मीकीप्रमाणेच कालिदास व भवभूतीसारखे प्राचीन काळचे कवी व रवींद्रनाथ टागोरांच्यासारखे अलिकडच्या काळातील कवि जगप्रसिद्ध आहेत. भास्कराचार्यांसारखे गणिती व ज्योतिषी आणि प्रफुलचंद्र रॉय, जगदीशचंद्र बोस, चंद्रशेखर व्यंकट रामन यांच्यासारखे संशोधक व रामानुजमसारखे गणिती सर्वत्र नावाजलेले आहेत.

अशा प्रकारे रम्य भूतकाळ लाभलेल्या भारत देशात आपण जन्माला आलेले आहो.

### दुर्लभं भारते जन्मन्

भारतामध्ये जन्माला येणे हे दुर्लभ (कठीण) आहे, असे एकाने म्हटलेले आहे. आपणाला हा असला लाभ झालेला आहे, ही केवढी अभिमानाची गोष्ट आहे बरे ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय
अनुक्रम ... वि ...
क्रमांक ... ३७५८ ... नोंद दि ... ९:२:६२

# ३. देशाची स्वाभाविकरचना

येथवर ज्या आपल्या देशाचा इतिहास आपण पाहिला, तो भारत देश आपल्या ह्या पृथ्वीवर कोठेसा आहे आणि त्याची स्वाभाविक म्हणजे आपोआप झालेली रचना आहे तरी कशी, हे पाहू या.

आपली पृथ्वी केव्हा जन्माला आली आहे कोणास ठाऊक ! ती आपल्या सूर्यमालेतील एक ग्रह आहे; आणि ती सूर्यापासून तुटून सुमारे २,०००,०००,००० वर्षांपूर्वी वेगळी झालेली आहे, असे काही विद्वान लोकांचे म्हणणे आहे. हे खरे असले तरी केवढा मोठा काळ आहे हा ! ह्या विद्वान लोकांचेच म्हणणे आहे की, २ अब्ज वर्षांपूर्वी पृथ्वी जन्माला आली. नंतर ५० कोटी वर्षांनंतर म्हणजे दीड अब्ज वर्षांपूर्वी ह्या पृथ्वीवर पाणी तयार झाले. त्यानंतर आणखी ५० कोटी वर्षे गेल्यावर म्हणजे सुमारे एक अब्ज वर्षांपूर्वी ह्या पृथ्वीवर खडक व जमीन तयार झाली. त्यानंतर आणखी ५० कोटी वर्षे गेली व मग वनस्पती व प्राणी यांचा जन्म झाला.


हे काही का असेना, आज आपण ज्या पृथ्वीवर राहात आहोत, तीवरील दीडशेहून अधिक देशांपैकी आपला

भारत हा एक देश आहे. काही शहाण्या लोकांचे म्हणणे आहे की, आपला देश आणि आफ्रिका खंड हे एका काळी एकमेकास जोडलेले होते. केव्हा तरी एकदा उलथापालथ होऊन हिंदी महासागर निर्माण झाला आणि आफ्रिका खंडापासून आपला देश वेगळा झाला. आफ्रिका खंडाच्या पूर्व भागाच्या नकाशाला आपल्या देशाचा नकाशा जोडून लावला तर हे म्हणणे खरे असावे असे वाटते.

आपल्या देशातही फार वर्षांपूर्वी उत्तरेकडे राजस्थानपासून बंगालपर्यंत समुद्रच होता, असे म्हणतात. आज देशातील हा भाग बराच सखल म्हणजे कमी उंचीचा आहे. देशातील दक्षिणेकडील भाग–तिन्ही बाजूंनी समुद्र असल्यामुळे याला द्वीपकल्प (बेटासारखाच) म्हणतात तो–सुमारे ३० ते ५० कोटी वर्षांपूर्वी ज्वालामुखीच्या स्फोटापासून निर्माण झालेल्या खडकांचा बनलेला आहे, असे शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. ह्याच लोकांचे म्हणणे आहे की, आपल्या देशाच्या उत्तरेकडील जगातील सर्वात मोठा पर्वत हिमालय हा सुमारे ७ कोटी वर्षांपूर्वी जन्माला आलेला आहे.

देशाच्या स्वाभाविक रचनेचा विचार करताना त्या देशाचा उंचसखल भाग, त्याची जमीन, त्यामध्ये वाहणाऱ्या नद्या वगैरे पाहावे लागते.

आपल्या देशाच्या उत्तरेला पर्वतांची मोठी रांग आहे.




पूर्व बाजूलाही काही भागात बरेच डोंगर आहेत. वायव्ये-कडे आणि पश्चिमेच्या उत्तर भागात पाकिस्तानची हद्द आहे आणि बाकीचा पश्चिमेकडील, पूर्वेकडील व दक्षिणे-कडील भाग समुद्राने व्यापलेला आहे. दक्षिणेकडे मोठा हिंदी महासागर आहे. पश्चिमेला त्याचाच भाग अरबी समुद्र व पूर्वेला त्या हिंदी महासागराचाच भाग बंगालचा उपसागर म्हणून आहे.

भारताच्या पश्चिमेच्या बाजूला जो आरबी समुद्र आहे, तो मोठा असून त्याच्या पलीकडे आफ्रिका खंड आहे. पश्चिमेच्या उत्तर बाजूला पाकिस्तान देश लागून आहे. वायव्येला अफगाणिस्तानचा थोडा भाग आहे आणि त्या बाजूला जवळच रशियाचाही काही भाग आलेला आहे. बाकी उत्तरेला तिबेट हा हल्ली चीनचे ताब्यात असलेला देश आहे. उत्तर सरहद्दीवर हिमालयात नेपाळ व भूतान ही स्वतंत्र लहान राज्येही आहेत. पूर्वेला ब्रह्मदेश व पाकिस्तानचा भाग आलेला आहे.

अगदी प्राचीन काळी आपला देश आफ्रिका खंडालाच जोडलेला होता, तो भाग सोडला, तरी अलीकडच्या काही काळात–पण पूर्वीच–आपल्या देशाच्या मर्यादा बऱ्याच लांबपर्यंत पसरलेल्या होत्या. पाकिस्तानच्या पलीकडील अफगाणिस्तानचा बराच भाग त्या काळी भारतात होता. कंदाहार शहर तर भारतातीलच आहे. कौरवांची आई गांधारी ही कंदाहारची ! पश्चिमेकडे तुर्कस्तानपर्यंतही भारतीय लोक आपली संस्कृती घेऊन गेलेले होते; आणि पूर्वेकडे ते ब्रह्मदेश, मलाया, अनाम, कंबोडिया, जावा–सुमात्रादि बेटे (इंडोनेशिया) यामध्ये भारतीय लोकांचा धर्म व त्यांच्या चालीरीती पुष्कळ काळपर्यंत नांदत होत्या. आज इंडोनेशियात मुसलमान लोक राहात असले, तरी तेथे अजून हिंदू देवळे आहेत व रामायणाचा अभ्यास

अजूनही तेथील लोक करीत असतात. अमेरिकेतील मध्य भाग जो मेक्सिको, त्यामध्येही भारतीय लोक जाऊन राहिले होते व त्यांनी आपल्या संस्कृतीचा ठसा तेथे उमटविलेला होता. ह्या मेक्सिकोलाच प्राचीन काळी ‘ पाताळ ’ म्हणत होते ! एका विद्वानाने तर म्हटले आहे की, कौरव-पांडवांचे युद्ध हे भारतात झालेच नाही, ते चीनमधील पूर्व भागात मंगोलियाच्या दक्षिणेस यांगत्सी नदीच्या खोऱ्यात झाले होते ! त्या काळी आशियाचा पूर्व भाग व अमेरिकेचा उत्तर भाग जोडलेला होता व त्यामार्गाने लोक अमेरिकेतील पाताळात उतरत असत. पाताळातील सुंदर नागकन्यांशी भारतीय लोक विवाह करीत.

बौद्ध धर्माच्या प्रसाराच्या निमित्ताने भिक्षू म्हणजे धर्म-प्रसारक–मिशनरी–सीलोन, ब्रह्मदेश, इंडोचायना, चीन, जपान वगैरेकडे गेलेले होते आणि अजूनही ह्या देशातील बरेच लोक बुद्धधर्मीय आहेत, हे विसरता येणार नाही.

प्राचीन काळच्या अगस्ती मुनीने समुद्र प्राशन केल्याची कथा प्रसिद्ध आहे. ह्या कथेचे रूपक लक्षात घेतल्यास दिसून येईल की, अगस्तीने पूर्व बाजूला समुद्रावरून अनेक सफरी केल्या होत्या व त्याला समुद्राचे काहीच वाटत नव्हते.

ह्या जुन्या काळच्या गोष्टी सोडून दिल्या, तरी २५ वर्षांपूर्वीही आपला देश आजच्या पेक्षा मोठा होता. आज

पाकिस्तान म्हणून ओळखला जाणारा देश त्या वेळी आपल्या भारतातच होता. १९४७ साली आपला देश इंग्रजांच्या तावडीतून सुटून स्वतंत्र झाला, त्याच वेळी आपल्या देशाचा एक तुकडा तोडला गेला. इंग्रजांनीच ती पुण्याई बांधून घेतली ! त्यांनी जवळ केलेल्या मुसलमान पुढाऱ्यांच्या आग्रहासाठी त्यांनीच देशाचे दोन तुकडे केले. पंजाब व बंगाल प्रांताचे दोन दोन भाग पाडले आणि सिंध व वायव्य सरहद्दीवरचा पेशावर प्रांत हे या वेळी पाकिस्तानात गेले.

आज असलेल्या भारत देशाचे स्वाभाविकरित्या पडणारे भाग म्हणजे उत्तरेकडील पर्वतांचा प्रदेश; त्याच्या दक्षिणेकडील सिंधू आणि तिला मिळणाऱ्या नद्या व गंगा आणि ब्रह्मपुत्रा व त्यांना मिळणाऱ्या नद्या ह्यांच्या खोऱ्यातील सखल प्रदेश; दक्षिणेकडील पठार व त्याच्या पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील सखल प्रदेश हे होत.

आपल्या देशामध्ये पर्वतांचा भागही बराच मोठा आहे. इतकेच नव्हे तर उत्तरेकडे असलेला हिमालय पर्वत हा साऱ्या जगात मोठा आहे. लांब, रुंद आणि उंचही. तो पूर्व-पश्चिम असा सुमारे २५०० किलोमीटर लांब असून, त्याने ५ लक्ष चौरस किलोमीटरचा प्रदेश व्यापलेला आहे. हा पर्वत म्हणजे आपल्या देशाची उत्तरेकडची एक मोठी रक्षण करणारी भिंतच आहे, असे म्हणावयास हरकत

नाही. तसेच आपल्या देशाला—विशेषतः देशाच्या उत्तर भागाला—धनधान्याने भरपूर आबादीआबाद करणारा कुबेरच आहे, म्हटले तरी चालेल. कारण ह्या हिमालयातून मोठमोठ्या व अनेक नद्या निघालेल्या आहेत आणि त्यांना वर्षभर पाण्याचा पुरवठा होत असतो. पावसाळ्यात तर त्या भरून वाहतातच, पण हिमालयातील बर्फ वितळून उन्हाळ्यातही त्यांना पाणी हवे तेवढे मिळत असते. माऊंट एव्हरेट हे हिमालयाचे शिखर जगात उंच आहे.

हिमालयाच्या पूर्व टोकाकडून दक्षिणेकडे जाणाऱ्या डोंगरांच्या बऱ्याच रांगा आहेत. आपल्या देशाच्या पूर्वेकडील उत्तर भाग त्यांनी व्यापलेला आहे. गारो, खाशी, जयंतीया आणि नागा टेकड्या किंवा मोठे डोंगर हे यांपैकी मुख्य आहेत.

आपल्या देशाच्या मध्यभागी जवळ जवळ पूर्व—पश्चिम जाणारे असे दोन मोठे पर्वत आहेत.

विंध्य आणि सातपुडा हे ते पर्वत. विंध्य पर्वत सातपुड्याच्या उत्तरेस आहे. मध्यंतरी थोडे अंतर ठेवून दक्षिणेस सातपुडा पसरलेला आहे. हे पर्वत देशाच्या पूर्वेपासून पश्चिमेकडे असे सर्व अंतर पसरलेले नाहीत. पश्चिमेकडून साधारणपणे देशाच्या मध्यभागापर्यंत ते आलेले आहेत. ह्या पर्वतांनी—विशेषतः विंध्य पर्वताने देशाचे दोन भाग केलेले आहेत. उत्तर भारत किंवा प्राचीन

आर्यावर्त व दक्षिण भारत किंवा दक्षिणापथ–दख्खन, हे ते दोन भाग.

उत्तर भारतात अरवली म्हणून आणखी एक पर्वत काहीसा पश्चिम भागी दक्षिणोत्तर असा गेलेला आहे. असे म्हणतात की, अरवली पर्वत हा सगळ्यात म्हातारा–जुना –पर्वत आहे. हिमालय त्या मानाने बराच अलीकडचा आहे.

अरवली पर्वत ७०० किलोमीटर लांबीचा आहे, तर विंध्य १०५० आणि सातपुडा ९०० किलोमीटर लांबीचे आहेत.

दक्षिण भारतात पूर्व आणि पश्चिम भागी समुद्र–किनाऱ्यापासून थोड्या अंतरावरून पूर्व घाट आणि पश्चिम घाट ऊर्फ सह्याद्री हे दोन पर्वत गेलेले असून, त्यांना जवळ जवळ जोडणारा असा निलगिरी नावाचा एक पर्वत दक्षिण भागात आहे.

पर्वत–प्रदेश सोडल्यास उत्तरेकडे एक फार मोठे सखल मैदान आहे आणि दक्षिणेकडे तसेच मोठे पण उंचवटयाचे एक पठार आहे.

उत्तरेकडचे मैदान हे पूर्व पश्चिम पसरले असून त्याने ६५२००० चौरस किलोमीटर प्रदेश व्यापलेला आहे. ह्यातील जवळजवळ तिसरा भाग राजस्थानचा आहे, तो साधारणपणे वाळवंटाचा भाग–विशेषतः पश्चिमेकडील-

आहे. बाकीचा भाग म्हणजे पंजाब, मध्य प्रदेश–माळवा, उत्तर प्रदेश व बिहार, बंगालचा चांगला सुपीक असा आहे. जगात एवढे मोठे सखल मैदान नाही, असे म्हणतात.

दख्खनचे पठारही असेच मोठे आहे. हे पठार त्रिकोणाकृती आहे. त्याची उत्तर–दक्षिण लांबी पंचमढीपासून केपकामोरीनपर्यंत १६०० किलोमीटर व पश्चिम–पूर्व रुंदी सह्याद्रीपासून राजमहल टेकड्यापर्यंत सुमारे १४०० किलोमीटर आहे. उंचवट्याचे एवढे मोठे–पिकाऊ जमीन असलेले–पठारही जगात दुसरे नाही, असे म्हणतात. आपले महाराष्ट्र राज्य ह्या दख्खनच्या पठारावरच आहे.

आपल्या देशातील नद्याही बऱ्याच महत्त्वाच्या आहेत. हिमालय पर्वत, विंध्य पर्वत, सातपुडा पर्वत आणि सह्य पर्वत यांतूनच मोठ मोठ्या नद्या निघालेल्या आहेत. यांतील हिमालयामधून निघालेल्या नद्या बऱ्याच मोठ्या आहेत. सिंधू आणि तिला मिळणाऱ्या जेहलम, चिनाब, रावी, बियास आणि सतलज ह्या पंजाबाकडील नद्या आणि गंगा व तिला मिळणाऱ्या यमुना, गोमती, घोगरा, गंडक आणि कोसी ह्या नद्या उत्तरेकडून हिमालयातूनच निघालेल्या आहेत. दक्षिणेकडून आलेल्या चंबळी, बेटवा, सोन आणि दामोदर ह्या नद्याही गंगेलाच मिळणाऱ्या आहेत. पूर्वेकडे अशीच फार मोठी नदी ब्रह्मपुत्रा आहे. सिंधू आणि ब्रह्मपुत्रा हिमालयाच्या उत्तरेकडून निघून अनुक्रमे पश्चिमेकडे व

पूर्वेकडे वाहत जाऊन मग हिमालय संपल्यावर दक्षिणेकडे वळल्या आहेत. पैकी सिंधू नदीचा महत्त्वाचा प्रदेश आता पाकिस्तानात गेलेला आहे. तथापि गंगेचे खोरे असे ज्याला म्हणता येईल असा प्रदेश एवढा मोठा आहे की, आपल्या देशाचा जवळ जवळ तिसरा हिस्सा त्याने व्यापला आहे. गंगेला पाणी पुष्कळ असते आणि तिला कालवेही पुष्कळ काढलेले आहेत. त्यामुळे ही नदी म्हणजे आपल्या देशाला मिळालेले एक वरदानच आहे. म्हणून तिला आपल्या देशात फार पवित्रपणा प्राप्त झालेला आहे. तिच्या काठी हरिद्वार, प्रयाग, काशी वगैरे अनेक तीर्थस्थाने आहेत आणि देशातील इतर कोणत्याही नदीत स्नान करणारा हिंदू माणूस ‘ जय गंगे भागीरथी ’ म्हणून उच्चार करीत असतो.

विंध्य व सातपुडा ह्या पर्वतातून निघालेल्या नर्मदा व तापी ह्या नद्या पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहत जातात. त्या व पूर्वेकडील महानदी ह्या मध्यभारतातील महत्त्वाच्या नद्या आहेत.

दक्षिण भारतातील नद्यांमध्ये गोदावरी, कृष्णा, कावेरी, पेन्नार वगैरे नद्या महत्त्वाच्या आहेत, तथापी उत्तरेकडील नद्यांइतका पाण्याचा पुरवठा ह्या नद्यांना होत नाही. दक्षिणेकडे हिमालय नाही ! दक्षिणेकडील बहुतेक नद्या सह्य पर्वतातून निघालेल्या असून, त्या पश्चिमेकडून

पूर्वेकडे वाहतात. ह्या नद्यांचा पूर्वेकडील भाग मात्र चांगला महत्त्वाचा झालेला आहे. तिकडे ह्या नद्या मोठ्या झालेल्या आहेत व त्यांना तिकडे कालवेही मोठे काढलेले आहेत.

आपल्या देशातील आणखी एका नदीचे नाव मला घ्यावेसे वाटते. ही नदी म्हणजे सरस्वती नदी. आज ही नदी जिवंत नाही. म्हणजे तिच्यातून वर्षभर पाणी वाहत नाही व मध्येच राजस्थानात वाळवंटातच जिरून जाते. त्यामुळे ती आता नाहीशी झाल्यासारखीच झालेली आहे. पण प्राचीन काळी ही नदी फार महत्त्वाची होती. इतकी की तिच्यामुळे एके काळी आपल्या देशाचे–उत्तर भारताचे–पूर्व आणि पश्चिम असे भाग पडलेले होते. ह्या नदीच्या काठी त्या काळी मोठी शहरे होती व तेथे विद्वान लोक राहात असत. ब्राह्मणातील एका वर्गाला सारस्वत असे नाव पडले आहे आणि वाङ्मयालाही सारस्वत म्हणतात, हे लक्षात घेण्यासारखे आहे. त्या काळी ह्या नदीच्या काठी सरस्वती देवीचा वास होता! ही नदी उत्तरेकडून सिमल्याच्या बाजूकडून हिमालयातून निघून आजच्या राजस्थानातून वाहत येऊन कच्छच्या रणात समुद्राला मिळत असे, असे म्हणतात.

नद्यांना लोकमाता म्हणतात. लोकांना त्या आईसारख्या उपयोगी पडतात, म्हणून त्यांना हे नाव दिलेले

आहे. लोकांना जगायला उपयोगी पडणारे उत्तम गोडे पाणी ह्या नद्या देतात. पाण्याला जीवन असे नाव आहे. पाण्यावरच प्राण्यांचे जीवन अवलंबून असते. अन्न थोडे उशीरा मिळाले तरी चालते, पण पाणी वेळच्या वेळी मिळाले पाहिजे. पाणी वेळेवर मिळाले नाही, तर जीव राहणेच शक्य नाही. नद्या ह्या पाणी तर देतातच, पण त्यांच्या पाण्यावर अनेक प्रकारची पिके निघत असल्याने त्या अन्नही देतात. म्हणूनच त्यांना लोकमाता म्हटलेले आहे.

आपल्या देशाची जमिनीची सरहद्द १५१६८ किलोमीटर आहे, तर समुद्राची–पाण्याची–सरहद्द ५७०० किलोमीटर आहे; आणि देशाची उत्तर–दक्षिण लांबी २९७७ किलोमीटर आहे, तर पूर्व पश्चिम–लांबी ३२१९ किलोमीटर आहे. साऱ्या जमिनीने व्यापलेला भाग म्हणजे क्षेत्रफळ ३२,६८,०९० चौरस किलोमीटर एवढा आहे. सुमारे ८ किलोमीटर म्हणजे ५ मैल.


पृथ्वीच्या गोलाच्या मध्यावरून पूर्व–पश्चिम असे एक वर्तुळ कल्पिलेले–मानलेले आहे, त्याला विषुववृत्त म्हणतात. ह्या विषुववृत्ताच्या उत्तरेच्या बाजूला आपला देश आहे.

आपला देश विषुववृत्ताला लगतच उत्तरेकडे असल्यामुळे एकंदरीने ह्या देशाची हवा उष्ण आहे आणि दक्षिणेकडे तिन्ही बाजूला समुद्र असल्यामुळे व देशात पर्वतांच्या

रांगाही असल्यामुळे काही थोडा भाग वगळला तर पाऊसही कमीजास्त मानाने बरा पडतो, त्यामुळे जवळजवळ सर्व प्रकारची पिके ह्या देशात निघतात. पूर्वीच्या काळी लोकसंख्या कमी होती, तेव्हा लोकांना खायला–प्यायला मुबलक मिळत होते. आता त्या मानाने ते कमी पडायला लागले आहे. पण लोकांच्या प्रयत्नाने ही उणीव भरून निघत आहे.

# ४. राजकीय विभाग

निसर्गाने तयार केलेले किंवा मूळचेच आपोआप झालेले



म्हणजे स्वाभाविक असे आपल्या देशाचे भाग कोणते मानता येतात, ते येथवर पाहिले. आता आपण माणसांनी आपल्या सोईसाठी–राज्यकारभाराच्या सोईसाठी–आपल्या देशाचे कोणते भाग पाडले आहेत, ते पाहावयाचे आहे. हे भाग पुढीलप्रमाणे आहेत. ह्या प्रत्येक भागाला स्टेट म्हणजे राज्य असे नाव आहे.

| अ. नं. | राज्य | राजधानीचे शहर |
|---|---|---|
| १ | जम्मू आणि काश्मीर | श्रीनगर |
| २ | पंजाब | चंदीगड |
| ३ | हरियाना | ,, |
| ४ | हिमाचल प्रदेश | सिमला |
| ५ | उत्तर प्रदेश | लखनौ |
| ६ | बिहार | पाटणा |
| ७ | आसाम | शिलाँग |
| ८ | मेघालय | ,, |
| ९ | नागालँड | कोहिमा |
| १० | पश्चिम बंगाल | कलकत्ता |
| ११ | ओरिसा | भुवनेश्वर |
| १२ | मध्य प्रदेश | भोपाळ |
| १३ | राजस्थान | जयपूर |
| १४ | गुजराथ | अहमदाबाद |
| १५ | महाराष्ट्र | मुंबई |

| अ. नं. | राज्य | राजधानीचे शहर |
|---|---|---|
| १६ | म्हैसूर | बंगलोर |
| १७ | आंध्र प्रदेश | हैद्राबाद |
| १८ | तामीळनाडू | मद्रास |
| १९ | केरळ | त्रिवेंद्रम |

आपला देश स्वतंत्र झाला तेव्हा आरंभाला १५ च राज्ये होती. पण मागाहून पंजाबचे दोन भाग होऊन हरियाना एक वेगळे राज्य झाले व डोंगरी प्रदेशातील लोकांच्या विशेष गरजा लक्षात घेऊन हिमाचल प्रदेश व मेघालय आणि नागालँड ही लहान लहान राज्ये स्वतंत्र अशी निर्माण केली आहेत.

ह्या शिवाय काही प्रदेश मध्यवर्ती–भारत–सरकारने निरनिराळ्या कारणांनी आपल्या अखत्यारीतच ठेवलेले आहेत. हे प्रदेश असे—

| अ. नं. | प्रदेश | राजधानीचे शहर |
|---|---|---|
| १ | दिल्ली | दिल्ली |
| २ | गोवा, दमण व दीव | पणजी |
| ३ | पांडेचरी | पांडेचरी |
| ४ | मणिपूर | इम्फाळ |
| ५ | त्रिपुरा | आगरताळा |
| ६ | अंदमान व निकोबार बेटे | पोर्ट ब्लेअर |

| अ. नं. | प्रवेश | राजधानीचे शहर |
|---|---|---|
| ७ | लखदीव, मिनिकॉय व आमिनदेवी बेटे | कावरट्टी |

इंग्रज लोक आपला भारत देश सोडून गेले आणि आपण स्वतंत्र झालो, तेव्हा वर सांगितल्याप्रमाणे १५ वेगवेगळी राज्ये ह्या देशात होती. ही राज्ये इंग्रजांनी हा देश जसजसा जिंकला, तसतशी त्यांनी निर्माण केली. पण त्यांच्याच कारकीर्दीत साधारणपणे भाषेच्या धोरणाने त्यांना वेगळेपणा आलेला होता. उदाहरणच द्यावयाचे तर बिहारचे देता येईल. पूर्वी बिहार आणि ओरिसा यांचे एकच राज्य होते, पण नंतर दोन झाली. पूर्वी आसाम राज्यही बंगालमध्येच एकत्र असलेले होते. इतकेच नाही तर मुंबई राज्यामध्ये आज पाकिस्तानात गेलेला सिंध प्रांत होता; आणि पंजाब व बंगाल हे अखंड होते. पाकिस्तान वेगळे झाले, त्या वेळी काही बदल स्वाभाविकरित्याच झाला.

पण त्यानंतर म्हणजे स्वातंत्र्यानंतरही काही बदल घडून आजची राज्ये निर्माण झाली आहेत, झालेला बदल हा मुख्यतः भाषावार राज्ये तयार करावीत, ह्या पुढारी लोकांच्या पूर्वीच्या–म्हणजे स्वातंत्र्यापूर्वीच्या–धोरणामुळेच झाला.

आपला आजचा महाराष्ट्र १९६० साली अशाच प्रकारे बनलेला आहे. पूर्वी मुंबई राज्य होते. त्यामध्ये गुजराथ व कर्नाटकातील बेळगाव, धारवाड, विजापूर व कारवार हे जिल्हे सामील होते. नवीन महाराष्ट्र बनताना गुजराथी भाग व कन्नड भाग वेगळे झाले. संस्थाने नाहीशी झाल्यावर काठेवाड व कच्छ आणि गुजराथ यांचे एक वेगळे राज्य झाले. कानडी जिल्हे म्हैसूर राज्याला जोडले गेले व वऱ्हाड–नागपूरचे आठ जिल्हे, जे पूर्वी मध्य प्रदेशात होते ते आणि हैद्राबाद संस्थानात पूर्वी असलेले औरंगाबाद, बीड, नांदेड, उस्मानाबाद व परभणी हे मराठवाडा म्हणून ओळखले जाणारे पाच जिल्हे महाराष्ट्रात आले.

स्वातंत्र्यानंतर झालेली मोठी घडामोड म्हणजे आपल्या देशात इंग्रजांनी जो संस्थानी मुलूख ठेवला होता, तो सारा संस्थाने खालसा करून आपल्या देशात सामील करून घेतला. सरदार वल्लभभाई पटेल ह्या पोलादी पुरुषाने भारताचे गृहमंत्री असताना हे घडवून आणले. ही फार मोठी क्रांती झाली. त्यामुळेच सबंध देश एकजिनसी झाला. ही संस्थाने लहानमोठी मिळून जवळजवळ ७०० होती. संस्थाने नाहीशी केल्यावर तो मुलूख जवळच्या इतर राज्यात सामील करून टाकला. राजस्थान हे एक नवेच राज्य अशा प्रकारे तयार झाले आहे आणि आजच्या मध्य प्रदेशातही अशाच प्रकारच्या ग्वाल्हेर, इंदूर, देवास, धार, रतलाम, कोटा,

बुंदी वगैरे संस्थानांचा समावेश झालेला आहे. बडोदे राज्य आणि काठेवाडातील राजकोट, भावनगर वगैरे संस्थाने गुजराथ राज्यात, तर कोल्हापूर, फलटण, सांगली, मिरज, औंध, भोर, जव्हार, अक्कलकोट वगैरे संस्थाने महाराष्ट्र राज्यात सामील झालेली आहेत. इतरही अनेक राज्यांत अशीच शेजारची संस्थाने सामील करण्यात आलेली आहेत. म्हैसूरचे मोठे संस्थान, इतर कानडी जिल्हे त्यात सामील करून वेगळे कर्नाटक राज्य म्हणून तयार करण्यात आले आहे, तर आंध्र राज्य बनविताना मराठवाड्याच्या ५ जिल्ह्यांशिवाय हैद्राबाद संस्थानचा सारा भाग त्यामध्ये घातलेला आहे.

अशा प्रकारे भाषावार राज्य–रचना होईल तेवढी केलेली आहे. हिंदी ही देशातील फार मोठी भाषा असल्या-मुळे, म्हणजे फार लोकांची ती जन्मभाषा असल्यामुळे, एकाहून अधिक राज्यांत मात्र ती भाषा आजही चालत आहे. उत्तर प्रदेश हे राज्य पूर्वीचे आग्रा–अयोध्या राज्य म्हणून प्रसिद्ध होते; ते देशातील सर्वांत मोठे राज्य आहे. पण तेथील भाषा हिंदीच असल्याने अजून ते न दुभंगता टिकून राहिले आहे.

अशा प्रकारे आज बनलेल्या राज्यांच्या भाषा पुढील प्रमाणे चालू आहेत :—

| अ. नं. | राज्य | | भाषा |
|---|---|---|---|
| १ | जम्मू आणि काश्मीर | – | काश्मिरी, डोग्री व उर्दू |
| २ | पंजाब | – | पंजाबी |
| ३ | हरियाना | – | हिंदी |
| ४ | हिमाचल प्रदेश | – | ,, |
| ५ | उत्तर प्रदेश | – | ,, |
| ६ | बिहार | – | ,, |
| ७ | आसाम | – | आसामी आणि बंगाली |
| ८ | मेघालय | – | खाशी, जयंतिया व गारो |
| ९ | नागालँड | – | अनेक डोंगरी बोली |
| १० | पश्चिम बंगाल | – | बंगाली |
| ११ | ओरिसा | – | उरिया |
| १२ | मध्य प्रदेश | – | हिंदी |
| १३ | राजस्थान | – | ,, व राजस्थानी |
| १४ | गुजराथ | – | गुजराथी |
| १५ | महाराष्ट्र | – | मराठी |
| १६ | म्हैसूर | – | कन्नड |
| १७ | आंध्र प्रदेश | – | तेलगू |
| १८ | तामीळनाडू | – | तामीळ |
| १९ | केरळ | – | मल्ल्याळी |

ह्या अनेक भाषा देशामध्ये चालू असल्या, तरी राष्ट्र-भाषा म्हणून देशाने हिंदी भाषेला मान्यता दिलेली आहे

व प्रत्येक राज्याने आपल्या राज्यातील प्रमुख भाषा कोणतीही असली, तरी दुसरी भाषा म्हणून विद्यार्थ्यांना हिंदी भाषाही शिकवावी, असे ठरविण्यात आले आहे. वर दिलेल्या ह्या भाषा मुख्यतः आर्यन आणि द्रविडियन वर्गातल्या आहेत. दक्षिणेकडील कन्नड, तेलगू, तामीळ व मल्याळी ह्या भाषा द्रविडियन वर्गातील आहेत. त्यांची लिपीही वेगळी आहे. बाकीच्या भाषा–डोंगरी सोडून–बहुतेक साऱ्या आर्यन वर्गातील आहेत. त्यांचा आधार संस्कृत भाषा आहे किंवा असे म्हटले तरी चालेल की, ह्या भाषांतील पुष्कळ शब्द संस्कृत भाषेच्या आधाराने तयार झालेले आहेत; आणि ह्या भाषांची लिपी देवनागरी आहे. फक्त उर्दू भाषेची लिपी पर्शियन लिपीसारखी आहे. असे म्हणतात की, दक्षिणेकडील द्राविडियन भाषेमध्येही संस्कृत शब्दांचा भरणा बराच आहे.

## निरनिराळ्या भाषेतील काही शब्द

| भाषा | शब्द | | | |
|---|---|---|---|---|
| मराठी | दूध | मीठ | भात | साखर |
| संस्कृत | दुग्ध,क्षीर, | लवण | चरु,ओदन | शर्करा |
| हिंदी | दूध | नमक | चावल | शक्कर, चीनी |
| पंजाबी | दूध | लूण,नमक | चावल | खंड |
| उर्दू | दूध | नमक | चावल | कंद, शक्कर |

| भाषा | शब्द | | | |
|---|---|---|---|---|
| काश्मिरी | द्वद् | नून् | तोमुल | खंड, शक्कर |
| गुजराथी | दूध | मीठुं | भात | खांड, साकर |
| बंगाली | दूध | नुन | भात | चिनि |
| आसामी | गाखीर | निमख | भात | चेनि |
| उरिया | दुध,खीर | लुण | भात | चिनि |
| तेलगू | पालु | उप्पु | अन्नमु | पंचदार, चक्कर |
| तामीळ | पाल | उप्पु | सोद्द,सादम | शक्करै |
| मल्याळी | पालु | उप्पु | चोरू | पंचसार |
| कन्नड | हालु | उप्पु | अन्न | सक्करै |
| इंग्रजी | मिल्क | सॉल्ट | राइस(बॉईल) | शुगर. |

उत्तरेकडील भाषा सामान्यतः सारख्याच म्हणजे फारसा फरक नसलेल्या आहेत. उच्चारामुळे काही शब्द वगैरे निराळे भासतात. उदाहरणार्थ, आसामचे माजी मुख्यमंत्री बारडोलॉय या नावाचे होते. बारडोलॉय हा शब्द वर दलवाई म्हणजे श्रेष्ठ दलपती किंवा सेनापती ह्या अर्थाचा आहे. आपल्याकडील दळवी आणि शेणवी हे शब्द दलपती आणि सेनापती यांचीच रूपे आहेत !

आता प्रत्येक राज्याने आपली भाषा वेगळी ठेवण्याचा प्रयत्न चालू केलेला आहे; आणि त्या भाषेत राज्यकार-भार चालेल असे केलेले आहे. तथापि आपल्या सबंध देशाचे एक संघराज्य स्थापन झालेले असल्याने आणि

दिल्लीसारख्या केंद्राच्या ठिकाणी किंवा देशात इतर ठिकाणीही व्यापार–धंदा किंवा नोकरीसाठी अनेकांना जावे लागत असल्याने, आपल्या स्वतःच्या भाषेशिवाय इतरही काही भाषा येणे आवश्यक झालेले आहे. ज्ञान मिळविण्यासाठीही इतर भाषांची जरूरी आहे. देशातील विद्यार्थ्यांना निदान तीन तरी भाषा येणे आवश्यक आहे, असे सरकारी धोरण आहे. एक मातृभाषा, दुसरी राष्ट्र-भाषा आणि तिसरी जगात अनेक ठिकाणी चालणारी इंग्रजी अथवा देशातील एखाद्या दुसऱ्या प्रांतातील, अशा ह्या तीन भाषा.

आपल्या देशाचे जे राजकीय विभाग पाडण्यात आलेले आहेत, ते आपल्या संघराज्याचे वेगवेगळे भाग असले, तरी ते एकपरीने स्वतंत्रच आहेत, ती स्वतंत्र राज्येच आहेत; आणि ती आपआपला राज्यकारभार स्वतंत्र रीतीनेच करीत असतात.

देशाचे संरक्षण, परदेशाशी व्यापारी व इतर संबंध, जकात, रेल्वे, तार व पोस्ट खाते, देशाचे मोठे कारखाने व उद्योगधंदे सोडून इतर बाबतीत आपआपल्या राज्या-पुरता कारभार करण्यास राज्यांना मुभा असते.

आपल्या देशामध्ये आता लोकशाही सुरू झालेली आहे. म्हणजे वयात आलेल्या २१ वर्षांवरील वयाच्या लोकांनी मत देऊन निवडलेले पुढारी आता देशाचा व राज्याचा

कारभार करीत असतात. पूर्वी निरनिराळ्या राज्यांत राजे लोक कारभार करीत. ते लोकांनी निवडलेले नसत. त्यांनी स्वतः किंवा त्यांच्या बापजाद्यांनी जबरदस्तीने सत्ता मिळविलेली असायची. त्यामुळे राज्याचा कारभार करण्यासाठी प्रधान व इतर नोकर हे राजेच आपल्या इच्छेप्रमाणे नेमीत असत. ही एक प्रकारची हुकूमशाहीच होती. राजाच्या कारभारावर टीका करण्याचा जनतेला अधिकार नव्हता. आता तसे नाही. लोकांनी निवडलेले प्रतिनिधी एकत्र जमतात व आपला पुढारी निवडतात. हा पुढारी म्हणजे राज्याचा मुख्यमंत्री. हा मुख्यमंत्री मग आपणाला सोईचे असे मंत्री, निवडून आलेल्या लोकांमधून निवडतो, आणि त्यानंतर हे सगळे मंत्रीमंडळ हाताखालच्या नोकरांच्या मदतीने राज्याचा कारभार करीत असते. निवडून आलेल्या लोकांच्या सभा–विधानसभा–वर्षातून दोनतीनदा भरत असतात.

प्रत्येक राज्याला देशाच्या मध्यवर्ती सरकारने नेमून पाठविलेला एक राज्यपाल–गव्हर्नर–असतो. मंत्रीमंडळ व निवडून आलेले प्रतिनिधी यांनी केलेल्या कायद्यांना मान्यता देणे, आणि दरसाल नवीन विधानसभा–कायदे मंडळ–सुरू होताना भाषण करून सरकारी धोरण जाहीर करणे, हे काम राज्यपाल करीत असतो.

सबंध देशाचा कारभारही त्यासाठी लोकांनी निवडून

दिलेल्या प्रतिनिधींच्या मार्फतच चालत असतो. देशाच्या प्रतिनिधींची दोन मंडळे असतात. एक लोकसभा व दुसरी राज्यसभा. लोकसभेच्या प्रतिनिधींची निवड प्रत्यक्ष लोकच करीत असतात, पण राज्यसभेच्या प्रतिनिधींची निवड निरनिराळ्या राज्यांतील विधानसभांचे सभासद करीत असतात. मग ह्या लोकसभेच्या व राज्यसभेच्या सभासदांनी आपणांतील एका नेत्याची निवड करावयाची असते. निवडलेल्या प्रतिनिधींचे अनेक पक्ष असतात, त्यातील बहुमत असलेल्या पक्षांच्या प्रतिनिधींनी निवडलेल्या नेत्याच्या हाती देशाचा कारभार सोपविला जातो. ह्या नेत्यालाच देशाचा पंतप्रधान म्हणतात. निवड झाल्यावर हा पंतप्रधान आपल्या पसंतीच्या सभासदांतून–लोक प्रतिनिधींतून–आपणाला हवे तेवढे मंत्री निवडून घेतो व त्यांच्या मदतीने तो कारभार करतो.

राज्यासाठी जसा राज्यपाल असतो, तसा साऱ्या देशासाठी राष्ट्रपती असतो. ह्या राष्ट्रपतीची निवड लोकसभेच्या, राज्यसभेच्या व निरनिराळ्या राज्यांतील विधानसभांच्या सभासदांनी करावयाची असते. मंत्रीमंडळाला मान्यता देणे व शपथ देवविणे, वर्षाच्या आरंभी दोन्ही सभागृहांपुढे भाषण करणे, सभागृहांनी पसंत केलेल्या कायद्यांना मान्यता देणे, जरूरतर अचानक असा एखादा कायदा जारी करणे, युद्ध सुरू करण्यास अथवा

बंद करण्यास परवानगी देणे इत्यादी कामे राष्ट्रपतींना करावयाची असतात. राष्ट्रपती देशाचा कारभार प्रत्यक्ष करीत नाहीत, तथापी त्यांची जागा ही देशातील सर्वांत मोठी मानली जाते. राज्यांचा अथवा देशाचा कारभार देशाने तयार व पसंत केलेल्या घटनेप्रमाणे चाललेला आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या पुढाऱ्यांनी ही घटना तयार केली व दिनांक २६ जानेवारी १९५० पासून तिची अंमलबजावणी सुरू झाली. देशाचा कारभार कसा चालवावा, निवडणुका कशा घ्याव्यात, लोकांचे हक्क कोणते आहेत, इत्यादि गोष्टी घटनेने ठरविलेल्या आहेत.

राज्यांचा अथवा देशाचा जो कारभार चाललेला आहे, त्यातील एका महत्त्वाच्या गोष्टीकडे आपले लक्ष वेधणे जरूर आहे. ह्या कारभाराचे दोन महत्त्वाचे भाग आहेत. कारभार चालविण्यासाठी कायदे करणे व ते अमलात आणणे हे काम करयासाठी विधानसभा, लोकसभा व राज्यसभा आणि त्यांना जबाबदार असलेली मंत्रीमंडळे ही आहेत. त्यांच्या कारभाराला सरकार किंवा शासन म्हणतात. हा एक भाग झाला. कारभाराचा दुसरा आणि तितकाच महत्त्वाचा भाग न्यायदान करणे हा आहे. त्यासाठी जिल्हानिहाय, राज्यनिहाय व देशासाठी न्यायमंडळे किंवा कोर्टे आहेत. कायद्याप्रमाणे किंवा घटनेप्रमाणे राज्यकारभार चालला आहे किंवा नाही आणि लोकांना

मिळालेले हक्क शाबूत राहात आहेत किंवा नाहीत, हे ही न्यायमंडळे पाहात असतात. सेशन कोर्ट (जिल्ह्याचे), हायकोर्ट (राज्याचे) व सुप्रीम किंवा वरिष्ठ कोर्ट (देशाचे) यांचा कारभार हा राज्याच्या किंवा देशाच्या कारभाराचा एक महत्त्वाचा भाग आहे.

कोर्टाच्या किंवा न्यायमंडळाच्या न्यायाधीशांची नेमणूक प्रत्यक्ष राष्ट्रपतींच्या अखत्यारातील बाब आहे. ह्या न्यायाधीशांवर मंत्रीमंडळांची हुकमत असत नाही. आणि त्यामुळे कायदेशीरपणे न्याय देण्यास न्यायाधीश मोकळे असतात. म्हणून पुष्कळ वेळा सरकारने केलेले कायदे किंवा मंत्रीमंडळाने दिलेले आदेश (हुकूम) न्यायाधीश रद्द करू शकतात ! लोकांना दिलेल्या हक्कांचा, घटनेतील कलमांचा किंवा सरकारनेच पूर्वी केलेल्या कायद्यांचा भंग होतो आहे, असे वाटल्यास न्यायाधीश सरकारच्या विरुद्ध मत देऊ शकतात !

निवडणुका, विधानसभा, लोकसभा, मंत्रीमंडळे व त्यांचा कारभार यांचा सामान्य लोकांच्या मनावर एवढा जबरदस्त प्रभाव पडत असतो की, राजकारणाच्या रोजच्या व्यवहाराकडेच हे लोक आकर्षित होतात, राज्यकारभारातील सत्तेचा मोह त्यांना पडतो, आणि त्यामुळे न्यायमंडळाच्या कारभाराचा सरकारी कामाशी किंवा शासनाशी असलेला संबंधच लोकांच्या लक्षात येत नाही !

अनुक्रम ...
क्रमांक ... नोंद दि. ...

तशात राज्यकारभार आता केवळ वरच राहिलेला नाही, तो खाली अगदी खेडुतांपर्यंत येऊन पोचलेला आहे. आता सत्तेचे विकेंद्रीकरण झालेले आहे. म्हणजे सत्ता एकाच ठिकाणी एकवटून राहिलेली नाही, ती आता विभागलेली आहे. जिल्हा परिषदांचा, तालुका पंचायतींचा व ग्रामपंचायतींचा कारभार सुरू झाल्यापासून सत्ता आता अगदी सामान्य माणसापर्यंत आलेली आहे. जिल्हापरिषदांच्या हातात आता बरीच सत्ता आलेली आहे. जिल्ह्याचा विकास करावा, जिल्ह्यातील लोकांच्या हिताच्या बऱ्याच गोष्टी करता याव्यात, म्हणून जिल्हा परिषदांना खर्चासाठी पुष्कळ पैसा मिळेल, अशी व्यवस्था झालेली आहे. तालुका पंचायतींना काही प्रमाणात हे काम करता येते आणि थोड्या प्रमाणात का होईना, पण ग्रामपंचातींनाही असेच काम करता येते. हे काम आपोआप होत नाही. माणसेच ते काम करीत असतात. प्रत्यक्ष काम करणारांना तर काही पैसा मिळतोच, पण ते काम करून घेणारे जे पुढारी असतात, त्यांच्या हातून हा पैसा खर्च होत असल्याने, त्यांना स्वाभाविकपणेच मोठे महत्त्व प्राप्त झालेले आहे. जिल्ह्यातून निवडून जाणारे विधानसभेचे जे सभासद असतात–ज्यांना आमदार म्हणतात, त्यांना मोठा मान मिळत असला आणि दरमहा काही पगारही मिळत असला, तरी त्यांच्या हाती प्रत्यक्ष सत्ता काही असत

नाही. काही पैसा खर्च करण्याची किंवा काही लोकांना नोकरीला लावण्याची सत्ता त्यांच्या हाती असत नाही. जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांच्या म्हणजे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती यांच्या हातात ती सत्ता असते. म्हणून लहानशा भागावरचे का होईनात, हे एकप्रकारचे मंत्रीच असतात !

देशाचे राजकीय विभाग म्हणजे निरनिराळी राज्ये होत, यात शंका नाही. पण ह्या राजकीय विभागांची सत्ता जी वाटली गेली आहे, ती पाहिली म्हणजे हे राजकीय विभाग आता जिल्ह्यापर्यंत, तालुक्यापर्यंत आणि गावापर्यंतही पोचले आहेत, म्हटले तरी चालेल.

आणि लोकशाही कारभाराचा हा व्यवहार पाहिला म्हणजे, वयात आलेला प्रत्येक माणूस आता देशाचा कारभार पाहात आहे, किंवा अगदी थोड्या प्रमाणात का होईना सत्ताधीश आहे, असे म्हणावयास हरकत वाटत नाही.

# ५. देशाचे उत्पन्न–शेती व जंगले

एके काळी आपल्या देशात सोन्याचा धूर निघत होता, हे खरे असले, तरी आज हा देश जगामध्ये एक गरीब देश मानला जात आहे. अमेरिका, कानडा, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, रशिया, जपान, इत्यादि सुधारलेल्या देशाच्या मानाने आपल्या देशाचे माणशी उत्पन्न व एकंदरीचे उत्पन्नही कमीच असल्याने त्याला गरीब समजण्यात येते. आपल्या देशापेक्षाही गरीब देश जगात पुष्कळ आहेत, पण सुधारलेले काही देश आपल्यापेक्षा मोठ्या वैभवात आहेत, यात शंका नाही.

इंग्रजांनी आपल्या देशावर राज्य करायला सुरुवात केल्यानंतर जाणूनबुजून त्यांनी हा देश कंगाल बनविला. येथील उद्योगधंदे बुडविले, कारागिरांचा छळ केला; आणि इंग्लंडला कच्चा माल पुरविणारा एक देश असेच त्याला बनवून टाकले.

इंग्रजांनी आम्हांला गुलाम बनवून दरिद्री केले असले, तरी आम्ही आमच्या गुणांनीच मागे पडलो आहो, यात शंका नाही. हजार वर्षांचा काळ होत आला, आम्हांला एक प्रकारचे नैराश्य प्राप्त झालेले आहे. निराशेने आम्हांला

धरलेले आहे. आमच्यातील जोम, उत्साह कमी झालेला आहे. लाथ मारीन तेथे पाणी काढीन ही आमच्यातील धमक आता उरलेली नाही. आला दिवस कसा तरी घालवावा, अशा धोरणाने आम्ही वागायला लागलो आहो. देव आणि दैव यांच्यावर विश्वास ठेवून आम्ही स्वतःचा विश्वास घालवून बसलो आहो. म्हणूनच आपण अंग मोडून काम करीत नाही. काम न करता पैसा मिळावा ह्या तत्त्वज्ञानाचा पगडा आमच्यावर बसलेला आहे, म्हणूनच आम्ही नवीन काही करायच्या भानगडीत पडत नाही. वडिलांची कीर्ती गाण्यात आम्ही पटाईत बनलो आहो. अमेरिकेत राहून आलेल्या एका भारतीयाने म्हटले आहे की, ‘ हिंदुस्तान भूतकाळात जगतो आहे आणि अमेरिका वर्तमानकाळात जगत आहे. ’ हे त्याचे म्हणणे अगदी खरे आहे.

गेल्या हजार वर्षांच्या काळात आपल्या देशात काही शूर पुरुष आणि थोर साधुसंत होऊन गेलेले असले, तरी सामान्य जनता एकंदरीने दुबळीच राहिलेली आहे. तिला आपल्या दुबळेपणाची लाजही वाटत नाही.

जर्मनी आणि जपान हे देश दुसऱ्या महायुद्धात म्हणजे २५–२६ वर्षांपूर्वी अगदी धुळीला मिळालेले होते, पण तेथील लोक कर्तबगार आहेत. काम करण्यातच सुख मानणारे आहेत, त्यामुळे त्यांनी एवढ्या थोड्या काळात पुन्हा

आपले देश जगातील सुधारलेल्या मोठ्या राष्ट्रांच्या बरोबरीला आणून सोडलेले आहेत.

आम्हांला हे कळेल तो सुदीन !

देश स्वतंत्र झाल्यापासून आम्हीही थोडे सुधारलो आहो, आणि पूर्वीपेक्षा आपली स्थिती काहीशी बरी झालेली आहे, यात शंका नाही. आपली गरिबी नाहीशी करण्याचा तर आता आपण चंगच बांधला आहे. यापुढे आपणही मोठ्या राष्ट्रांच्या पंगतीला जाऊन बसू, असे वाटायला लागले आहे.

तेव्हा आज आपली परिस्थिती कशी आहे, ते पाहाणे हिताचे होईल. आपल्या देशामध्ये कशाचे व किती उत्पन्न होते आहे, हे पाहू या.

### शेतीचे उत्पन्न

आपला देश पूर्वीच्या काळापासून शेतीप्रधान देश आहे. शेतीचे म्हणजे जमिनीचे उत्पन्न हे आपले मुख्य उत्पन्न आहे. आजही आपल्या देशातील ७० टक्के लोक शेतीवरच जगत आहेत. जगातील इतर देशांचे पाहून आम्हीही आता सुधारलेल्या पद्धतीने शेती करण्याचा प्रयत्न करीत असून, इतके दिवस परदेशातून धान्य आणीत होतो, ते पुढच्या वर्षापासून बंद करणार आहोत.

१९६८–६९ सालचे भारताच्या शेतीच्या उत्पन्नाचे आकडे मिळाले आहेत, ते असे :—

| | |
|---|---|
| तांदूळ– | ३९७६१००० टन |
| गहू– | २१८६५००० ,, |
| ज्वारी– | ९६०४००० ,, |
| बाजरी– | ३८०२००० ,, |
| मका– | ५७०१००० ,, |
| नाचणी– | १६४८००० ,, |
| इतर हलके धान्य– | १८०४००० ,, |
| बार्ली– | २४२४००० ,, |
| हरभरा– | ४३०९००० ,, |
| तूर– | १८१६००० ,, |
| इतर कडधान्ये– | ४२९३००० ,, |
| बटाटे– | ४७७३००० ,, |
| ऊस– | ११७५७२००० ,, |
| काळी मिरी– | २१००० ,, |
| मिरची– | ४१९००० ,, |
| सुंठ– | १९००० ,, |
| तंबाखू– | ३४७००० ,, |
| भुईमूग शेंगा– | ४४७६००० ,, |
| एरंडी– | १११००० ,, |
| तीळ– | ४१५००० ,, |
| मोहरी– | १५७२००० ,, |
| जवस– | ३५२००० ,, |

| | |
|---|---|
| कापूस (गठ्ठे) | ५२७०००० टन |
| ज्यूट (वाल) | ३०५२००० ,, |
| चहा– | ३८०००० ,, |
| कॉफी– | ७३००० ,, |
| रबर– | ७१००० ,, |
| नारळ– | ५३२००० ,, |

१९७०–७१ सालामध्ये गहू व तांदूळ यांचे उत्पन्न मागील सालापेक्षा जास्तच आलेले आहे.

आपल्या देशात तयार होणारे मसाल्याचे पदार्थ हे विशेष उत्पन्नाचे पदार्थ आहेत, असे म्हणावयास हरकत नाही. कारण ते इतर देशांत तयार होत नाहीत. ह्या मसाल्याच्या पदार्थांसाठी तर प्राचीन काळापासून परदेशांतील व्यापारी भारताकडे येत आहेत. युरोपातील लोकांना तिखट म्हणून खाण्यासाठी मिरे लागतात. काळ्या मिऱ्यांची पूड ते तिखट म्हणून वापरतात. ही मिरी भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील केरळ प्रदेशातच मुख्यतः होतात. मिरी, वेलदोडे, काजू इत्यादि पदार्थांचा परदेशात खप चांगला होतो. काळी मिरी केरळच्या शेजारच्या म्हैसूर, तामीळनाडू ह्या राज्यातही पण थोड्या प्रमाणात होतात. वेलदोडे हे केरळ आणि निलगिरी पर्वत प्रदेशात होतात. जगात वेलदोडे पाठविणारे भारत हेच पहिल्या प्रतीचे राष्ट्र आहे. जवळजवळ १८०००० एकरांत

वेलदोडे तयार होतात. मिऱ्यांच्या खालोखाल काजूही परदेशी जातात. जगाच्या बाजारात ९५ टक्के काजू भारताचेच खपतात. मुंबईपासून दक्षिणेस कन्याकुमारीपर्यंत पश्चिम किनाऱ्यावर काजू पिकतात. हळदही मसाल्यासाठी लागते. हळदीचे उत्पन्न महाराष्ट्र, तामीळनाडू व केरळ-मध्ये होते.

तांदूळ—भाताचे पीक हे आपल्या देशातील पहिल्या प्रतीचे म्हणजे मोठ्या प्रमाणावरील पीक आहे. लागवडी-खालील जमिनीपैकी ३० टक्के जमिनीत भात पिकतो. आंध्र प्रदेश, तामीळनाडू, बिहार, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, ओरिसा, आसाम आणि महाराष्ट्र ह्या राज्यांत भाताचे पीक घेतले जाते.

गहू—गव्हाचे पीक मुख्यतः उत्तरेकडील प्रदेशात म्हणजे पंजाब, उत्तर प्रदेश व मध्य प्रदेशात होते, तरी इतर राज्यांतही थोडा गहू पिकतो आणि देशातील लोकांच्या खाण्यातील तो एक महत्त्वाचा पदार्थ आहे.

ज्वारी आणि बाजरी ही पिकेही सामान्य लोकांच्या रोजच्या खाण्यातील पिके म्हणून महत्त्वाची आहेत. ज्वारी मुख्यतः महाराष्ट्र, मध्य प्रदेश. आंध्र प्रदेश, तामीळ-नाडू आणि उत्तर प्रदेशात व बाजरी मुख्यतः राजस्थान, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, तामीळ नाडू आणि पंजाब या राज्यांत पिकते. आणि मक्याचे पीक मोठ्या प्रमाणावर

उत्तर प्रदेशात व बिहारमध्ये होते.

चहा–भारतामध्ये चहाचे सुमारे ८००० मळे आहेत. जगाला लागणाऱ्या चहापैकी ४० टक्के चहा आपण पुरवतो. जगातील दुसऱ्या क्रमांकाचे चहाचे पीक आपल्याकडे होते. यापैकी जवळजवळ निम्मे मळे आसाममध्ये आहेत. बाकीचे निलगिरी पर्वतावर व इतर ठिकाणी आहेत.

कॉफी–चहाच्या खालोखाल कॉफीचेही उत्पन्न आपल्या देशात होते. मात्र कॉफीला हवा उष्ण लागत असल्याने ती पश्चिम किनाऱ्यावरील सह्याद्रीच्या उतरणीवर होते. म्हैसूर, तामीळ नाडू व केरळ ह्या राज्यांमध्ये कॉफीचे उत्पन्न होते.

तंबाखू–जगातील तिसऱ्या क्रमांकाचे तंबाखू पिकविणारे राष्ट्र भारत आहे. सुमारे ७५ कोटी रुपयांची ३२५० लक्ष किलोग्रॅम तंबाखू आपल्या देशात पिकते. जवळजवळ निम्मे उत्पन्न आंध्र राज्यात होते आणि बाकीचे गुजराथ, तामीळ नाडू, म्हैसूर, बिहार, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगालमध्ये होते.

सुपारी—नारळाच्या बरोबरच सुपारीचेही उत्पन्न आपल्या देशात बरेच होते. आपल्या देशात मजेने पान-तंबाखू खाणारांची संख्या फार आहे. पान खाताना सुपारी लागतेच. एरव्हीही सुपारी तोंडात टाकणारे काही कमी नाहीत. शिवाय धार्मिक कार्यक्रमात सुपारीची जरूर पडते.

गमतीची गोष्ट ही की, जोडप्याने धार्मिक विधी करा-वयाच्या वेळेला पुरुषाच्या जोडीला बायको नसेल तर करवटीला सुपारी खोवली की भागते ! पैज मारतानाही सुपारी उचलतात. सुपारी उत्पन्न करणाऱ्या देशात आपल्या देशाचा पहिला क्रमांक लागतो. केरळ, म्हैसूर आणि आसाम राज्यात सुपारीचे पीक विशेष येते. महा-राष्ट्र, पश्चिम बंगाल आणि तामीळ नाडूमध्येही सुपारी बरीच पिकते. आपल्या महाराष्ट्रातील कोकणपट्टीत समुद्र–किनाऱ्याला एखाद्या खाडीच्या दोन्ही अंगाला सुपा-रीची बने पाहिली म्हणजे फार सुंदर देखावा दिसतो.

गवती चहा––हे एक प्रकारचे गवत आहे. आपल्या-कडे पडसे आले म्हणजे ह्या गवताच्या पानांचा काढा करून घेतात. त्याला गवती चहा म्हणतात. ही वनस्पती औषधी आहे. गवती चहाचे तेलही काढतात. ते फार महत्त्वाचे आहे. ते सुवासिकही असते. औषधाप्रमाणे साबण व उटणे तयार करताना त्याचा उपयोग करतात. ह्या गवताचे मुख्य उत्पादन केरळ राज्यात होते. ह्याच्या तेलाचे गिऱ्हाईक इंग्लंड, अमेरिका, रशिया, जपान, पश्चिम जर्मनी व हॉलंड हे देश आहेत.

हिरडा––सुमारे ३ ते ५ हजार फूट उंचीवर होणाऱ्या जंगली झाडाचे फळ हिरडा हेही एक महत्त्वाचे फळ आहे. जनावरांची कातडी रंगविण्यात त्याचा फार उपयोग होतो.

औषधीही आहे. त्रिफळाचूर्णामध्ये ते मुख्य असते, हिरडा; बेहडा व आवळकट्टी यांचा चुरा म्हणजे त्रिफळाचूर्ण. मध्य प्रदेश, तामीळ नाडू, महाराष्ट्र, बिहार आणि ओरिसा यांच्या जंगलात हिरडा होतो.

साखर--ऊस हे आपल्या देशातील एक महत्त्वाचे पीक आहे. त्याच्यापासून गूळ व साखर होते. जगामध्ये क्यूबाच्या खालोखाल आपल्या देशातच अधिक साखर होते. उत्तर प्रदेश, बिहार व महाराष्ट्र या राज्यात उसाचे पीक चांगले येते.

कापूस—माणसाला कपड्यालत्त्याला जरूरीचे आणि पैसा देणारे पीक म्हणून कापसाला आपल्या देशात महत्त्वाचे स्थान आहे. फार पूर्वीच्या काळापासून आपल्या देशातील कापड प्रसिद्ध आहे. इंग्रज लोक येण्यापूर्वी भारतातील कापड युरोपातही चांगले खपत होते. बंगाल-मध्ये डाक्याची मलमल हे एक जगप्रसिद्ध तलम असे कापड होते. आज डाका हे शहर पूर्वबंगालमध्ये (पाकिस्तानात) आहे. पण सबंध बंगाल प्रांत आणि इतर राज्येही चांगले कापड तयार करीत. महाराष्ट्र, पंजाब, मध्य प्रदेश, तामीळनाडू, उत्तर प्रदेश, आंध्र, राजस्थान आणि गुजराथ ही राज्ये कापूस उत्पन्न करतात. भारतातील साडी हे स्त्रियांचे नेसते वस्त्र युरोप—अमेरिकेतील स्त्रियांनाही आवडू लागले आहे. देशामध्ये मुंबई,अहमदाबाद

वगैरे शहरात कापडाच्या खूप गिरण्या आहेत.

ताग, अंबाडी आणि विशेषतः ज्यूट यांचेही उत्पन्न आपल्या देशात चांगले होते. यांच्या वाखाचा उपयोग कापड, दोरे, दोऱ्या व पोती तयार करण्याला होतो. मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश व महाराष्ट्र यांमध्ये ताग, अंबाडीचे व पश्चिम बंगालमध्ये ज्यूटचे उत्पन्न होते.

रेशीम–प्राचीन काळापासून आपल्या देशात रेशमाचेही उत्पन्न होते. बनारशी साड्या व शालू प्रसिद्धच आहेत. ओरिसा, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल, काश्मीर वगैरेकडे रेशीम तयार होतेच, पण सध्या आपल्या देशातील उत्पन्नाच्या २/३ उत्पन्न म्हैसूर राज्यातून होते. श्रीमंत लोक रेशमी वस्त्र वापरतात.

भुईमूग–आपल्या देशात बऱ्याच तेलबिया उत्पन्न होतात. खाण्यासाठी आणि साबण वगैरे तयार करण्यासाठी लागणारे तेल निर्माण करणाऱ्या देशांत आपल्या देशाचा क्रमांक बराच वरचा लागतो. भुईमूग हे असेच खाण्याचे तेल देणारे पीक आहे. एरव्ही खाण्यासाठीही भुईमुगाच्या शेंगाचा उपयोग करतात. भुईमुगाचे दाणे हे गरिबांचे बदामच समजतात. ते चांगले पौष्टिकही आहेत. वनस्पती तूप तयार करण्यासाठीही भुईमुगाच्या तेलाचा उपयोग होतो. गुजराथ, आंध्र, महाराष्ट्र, म्हैसूर, तामीळ नाडू आणि मध्य प्रदेश यांमध्ये भुईमुगाचे पीक विशेष

होते. करडीचे तेलाचाही उपयोग रोजच्या खाण्यात भुईमुगाच्या तेलाप्रमाणेच होतो, पण त्याचे पीक कमी होते.

खोबरे–नारळाचा उपयोग सुपारीप्रमाणेच धर्मकार्यात होतो. तथापि त्याचा मुख्य उपयोग तेलासाठी करतात. हे तेल खाण्यात–कालवणात–विशेषतः दक्षिणेकडे वापरतात, पण अंगाला लावण्यासही उपयोजितात. देशाच्या पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यावर नारळाची झाडे चांगली उगवितात. नारळाच्या झाडाचा ताजा रस माडी म्हणून पिण्यासाठी व नारळ चेचून काढलेला रस दुधासारखा केळीचे शिकरण करण्यासाठी वगैरे वापरतात.

मोहरी––खाण्यासाठी उत्तर हिंदुस्तानात मोहरीच्या तेलाचा वापर फार करतात. ते औषधीही आहे. मोहरीचे उत्पन्नही तिकडेच अधिक होते.

तीळ, जवस, एरंडी, सरकी (कापसाची) यांच्यापासूनही तेल काढतात व त्याचा निरनिराळ्या कामासाठी उपयोग करतात. आपल्या देशात हे सर्व पिकते.

शेतीचे उत्पन्न वाढावे म्हणून आता देशात खताचे कारखानेही मोठ्या प्रमाणावर निघालेले आहेत.

फळे :––आरोग्याच्या दृष्टीने फळे खाणे चांगले असे डॉक्टर लोक सांगतात, तथापि आपल्या देशात फळे खाण्याकडे लोकांची प्रवृत्ती कमी आहे. गरिबीमुळे फळे

खाणे पुष्कळांना परवडत नाही हेही खरेच. त्यामुळे फळांच्या बागा एकंदरीने बेताच्याच आहेत. अथापि काही फळे आपल्या देशात प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहेत आणि श्रीमंत व मध्यम स्थितीतील लोक त्यांचा उपयोग करीत असतात.

आंबा––हे फळ भारतातील प्रसिद्ध फळ आहे. ते सामान्यतः सर्व लोकांना आवडते. परदेशी लोकांतही आता ते प्रिय होत चालले आहे, त्यामुळे हापूससारख्या काही प्रसिद्ध आंब्यांच्या पेट्या आता परदेशीही जाऊ लागल्या आहेत. देशात सगळीकडे आंबे पिकतात.

केळी––केळी हे गरिबांपासून श्रीमंतांपर्यंत आवडणारे व परवडणारे फळ आहे. केळ्यांचीही आता परदेशात निर्यात होऊ लागली आहे. महाराष्ट्रात केळी चांगली होतात.

संत्री, मोसंबी, द्राक्षे, पेरू यांचे उत्पन्नही अलीकडे बरेच होत आहे. काही माल परदेशीही जातो. पेरूला उत्तर भारतात काशीच्या बाजूला अमरूद (अमृत) म्हणतात. तिकडच्या बाजूचे पेरू असतातही अधिक गोड.

बोरे, जांभळे, करवंदे ही फळेही सामान्य लोकांच्या खाण्यात बरीच येतात. बोरे तर भगवान रामचंद्र प्रभूच्या वेळेपासून प्रसिद्ध आहेत. शबरी भिल्लिणीने त्याला बोरे खायला दिल्याची कथा सर्वांना माहीत असेलच.

सफरचंद वगैरे फळे चांगली असली तरीही ती फार महाग असल्याने गोरगरिबांना खाणे परवडत नाही. त्यांचे उत्पन्नही कमीच होते.

## जंगल–संपत्ती

जमिनीच्या उत्पन्नामध्येच जंगलसंपत्तीच्या उत्पन्नाला धरायला हरकत नाही. पण शेतीचे उत्पन्न असे त्याला म्हणता येणार नाही. शेतीचे उत्पन्न हे शेतकरी मुद्दाम तयार करीत असतो. जंगलाच्या उत्पन्नाचे तसे नाही. त्याचा बराचसा भाग हा आपोआप तयार झालेला असतो. पाऊस काळ जास्त आणि डोंगराळ प्रदेश अशा ठिकाणी प्राचीन काळापासून जंगले वाढत आलेली आहेत. आपोआप वाढलेल्या लहानमोठ्या झाडांच्या प्रदेशाला जंगल म्हणतात.

आपल्या देशातील जमिनीचा २३ टक्के भाग जंगलांनी व्यापलेला आहे; आणि काही जंगले घनदाट व मोठीही आहेत. तथापि एकंदरीने बराच जंगल भाग साधारण प्रतीचा आहे. त्यामुळे जगातील टंड्रा प्रदेश म्हणून ओळखला जाणारा भाग जसा जंगल–संपत्तीने संपन्न आहे, तसा प्रदेश आपल्याकडे कमी आहे. म्हणून उद्योगधंद्यांच्या दृष्टीने आपल्या जंगलांचा उपयोग बेताचा होतो. म्हणूनच कागदाचे कारखाने आपल्याकडे थो_ आहेत. इमारती लाकूड, जळाऊ लाकूड, कोळसा, लाकडाच्या पेट्या, टेबल–खुर्च्या, कपाटे इ. तयार करणे,

रेल्वेच्या रुळाखाली घालावयाच्या जाड पट्टया (स्लीपर्स), कागदासाठी लगदा करणे, तेले (अत्तर) काढणे वगैरे कामासाठी आपल्याकडील लाकडाचा चांगला उपयोग होतो. लाख व डिकही झाडापासून मिळतो. जंगलातून जनावरांसाठी चारा (गवत इ.) ही मिळतो; आणि हवेत गारवा निर्माण करण्यास व पाऊस अधिक पडण्यास जंगलांचा उपयोग होतो. जंगलातील अनेक वनस्पती औषधे म्हणूनही उपयोगी पडतात. सागवान, शिसव, देवदार, ओक, चंदन, बाभूळ, वड, निंब, चिंच, पिंपळ इ. अनेक प्रकारची जंगल–संपत्ती आपल्या देशात तयार आहे; आणि तीपासून वर्षाला ६० कोटींहून अधिक रुपयांचे उत्पन्न मिळते.

वाचनालय

## ६. देशाचे उत्पन्न—खनिज पदार्थ

खनिज पदार्थ म्हणजे जमिनीतून खणून काढलेले पदार्थ. लोखंड, मँगनिज, सोने, रूपे, तांबे, शिसे, जस्त, कथील, अभ्रक इत्यादि धातू; दगडी कोळसा; हिरे, माणके व संगमर्मरसारखे मौल्यवान दगड आणि रॉकेल किंवा पेट्रोल व गॅससारखे ज्वालाग्राही (पेट घेणारे) पदार्थ तसेच मीठ हे सारे खनिज पदार्थच आहेत. हे सर्व पदार्थ कमी-जास्त मानाने आपल्या देशात उत्पन्न होतात. अणूचा स्फोट करून वीज तयार करण्यासाठी लागणारा पदार्थ युरेनियमही आपल्या देशातील खनिजांपैकी एक महत्त्वाचा पदार्थही पुरेसा मिळत आहे.

सोने आणि हिरेमाणके मौल्यवान खरे, पण देशातील उद्योगधंद्यांना अत्यंत जरूरीचे पदार्थ म्हणजे लोखंड, कोळसा व खनिज तेले हे होत.

लोखंड :—आपल्या देशात फार प्राचीन काळापासून लोखंडाचा उपयोग होत आला आहे. शेतीला उपयोगी पडणारी अवजारे आणि लढाईला उपयोगी पडणारी शस्त्रे व अस्त्रे (हातात धरून मारायला आणि फेकून मारायला उपयोगी पडणारी हत्यारे) पूर्वीपासून आपल्या देशात

होत आहेत. अलेक्झांडर दी ग्रेट म्हणून जग जिंकणारा शिकंदर बादशाह इसवी सनापूर्वी चौथ्या शतकात हिंदुस्तानात येऊन गेला. त्याने पंजाब प्रांत जिंकलाही होता. तो जेव्हा परत आपल्या देशाला—ग्रीसला—जायला निघाला, तेव्हा पंजाबच्या पोरस (पुरू) राजाने त्याला भेट म्हणून रत्ने किंवा सोनेरूपे नव्हे तर उत्तम प्रतीचे पोलाद ३० पौंड दिलेले होते, हे लक्षात घेण्यासारखे आहे. आज दिल्लीजवळच्या कुतुबमीनारशेजारी असलेला एका हिंदू राजाने रोवलेला एक विजयतंभ—लोखंडी खांब उभा आहे, तो उत्तम प्रतीच्या लोखंडाचा केलेला आहे. आज सोळाशे—सतराशे वर्षे झाली, तो तेथे उभा आहे, तरी अजून जशाचा तसा आहे. म्हणजे इतक्या वर्षांपूर्वी आपल्या देशात उत्तम प्रतीचे लोखंड तयार करणारे कारागीर होते, यात शंका नाही.

आपल्या देशात लोखंडाचा साठाही मोठा आहे. जगातील लोखंडाचा चौथा हिस्सा लोखंड आपल्या देशात आहे, असे म्हणतात. पश्चिम बंगाल, बिहार, ओरिसा, हिमाचलप्रदेश, तामीळनाडू, म्हैसूर या प्रदेशात हा साठा मुख्यतः आहे. अलीकडे गोव्यातही लोखंडाचे उत्पादन सुरू झालेले आहे. सध्या तेथे ७० खाणी आहेत! खाणीत असलेले लोखंड अशुद्ध असते. ते शुद्ध करून वापरावे लागते.

आपल्या देशात १९११ साली स्थापन झालेली आणि कलकत्त्यापासून १५६ मैलांवर असलेली जमशेटपूर येथील टाटा आयर्न अँड स्टील कंपनी हा एकच मोठा कारखाना स्वतंत्र्याच्या आधीच्या काळात काम करीत होता. आजही हा कारखाना चालू आहेच. खाजगी रीतीने चालू असलेला आणि १९५३ व १९५५ साली वाढविण्यात आलेला इंडियन आयर्न अँड स्टील कंपनीचाही एक काखाना चालू आहे.

पण स्वातंत्र्यानंतर जर्मनी, रशिया वगैरे देशांच्या मदतीने सरकारनेच लोखंडाचे ५–६ मोठे कारखाने रुर- केला, भिलाई, दुर्गापूर, भद्रावती, बोकारो इत्यादी ठिकाणी चालू केलेले आहेत. आंध्र प्रदेश, तामीळ नाडू व म्हैसूर राज्यातही नवीन कारखाने सुरू करण्याचे सर- कारने ठरविलेले आहे. तरी अजून आपल्या देशाची लोखंडाची गरज पुरी झालेली नाही. लवकरच ती पुरी होईल आणि उद्योगधंद्याच्या दृष्टीने आपला देश बराच सुधारेल अशी आशा आहे. लोखंड हे उद्योगाला अत्यंत आवश्यक असते. त्याला काळे सोने म्हटले जाते. कल- कत्त्याकडील चित्तरंजनचा रेल्वे इंजिने तयार करणारा कारखाना, म्हैसूरचा विमाने, घड्याळे व यंत्रसामग्री तयार करणारा कारखाना व मच्छलीपट्टणचा बोटी बांधणारा कारखाना हे या दृष्टीने फार महत्त्वाचे काम करीत आहेत.

दगडी कोळसा—–देशाच्या भरभराटीला दगडी कोळशाचा फारच उपयोग झालेला आहे. आपल्या देशात बंगाल, बिहार, आसाम, ओरिसा, आंध्रप्रदेश, मध्य प्रदेश, तामीळ नाडू वगैरे प्रदेशांत दगडी कोळशाच्या खाणी आहेत. सध्या आपल्या देशात अशा खाणी सुमारे ८५० आहेत. दगडी कोळसा हे इंधन (जाळ तयार करणारे) असल्याने जेथे जेथे शक्ती उत्पन्न करण्याचे इंजिनाचे काम चालते, तेथे तेथे त्याचा फार उपयोग होतो. रेल्वेसाठी आणि लहान–मोठे कारखाने चालविण्यासाठी दगडी कोळशाचा मोठा उपयोग होतो. राणीगंज या बंगालमधील ठिकाणी पहिल्या प्रथम १८१४ साली पहिली दगडी कोळशाची खाण चालू झालेली आहे. दगडी कोळशापासून निर्माण होणाऱ्या इतर पदार्थांचा उपयोग डांबर करण्याकडे व निरनिराळे रंग तयार करण्याकडेही होतो. आपल्या देशात सुमारे १२१३६० दशलक्ष टन कोळसा जमिनीत आहे. १९६९ साली ७२७.३ लक्ष टन कोळसा आपल्या देशातील खाणींतून काढण्यात आला.

खनिज तेल—रॉकेल आणि पेट्रोल व क्रूड ऑईल यांचा उपयोग देशात दिवसेंदिवस वाढतच चालला आहे. घरगुती वापरासाठी आणि विमान, मोटारी व इतर इंजिने यांच्यासाठी हे तेल आवश्यक आहे. वाहतुकीच्या व लष्करी विमानासाठी तर हे तेल फारच लागत आहे. आपल्या

देशात पूर्वी हे तेल फार थोडे निघत होते. जमिनीत तेल कोठे आहे, याचा शोधही फारसा केलेला नव्हता. फक्त आसामच्या बाजूला ते काहीसे निघत होते. पण आता अनेक ठिकाणी ह्या तेलाचा शोध लागलेला आहे. आसाम त्रिपुरा, मणीपूर, पश्चिम बंगाल, गंगेचे खोरे, पंजाब, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, राजस्थान आणि गुजराथ ह्या राज्यांत खनिज तेलांचे साठे सापडले आहेत.

ऑईल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन ह्या सरकारी संस्थे-मार्फत १९५६ पासून आतापर्यंत ७८० विहिरींचे खोद-काम झालेले आहे आणि यांपैकी ४३९ विहिरींत कच्चे तेल व ६३ विहिरींत गॅस सापडलेला आहे. ऑईल इंडिया लिमिटेड ह्या कंपनीमार्फतही २७२ विहिरी खोदून तेल काढण्यात येत आहे. आपल्या देशात सुमारे १०·३६ लाख चौरस किलो मीटर भागात ह्या तेलाचे साठे असावेत असा अंदाज आहे.

१९६९ सालात सुमारे ६७·२ लक्ष टन तेल आपल्या देशात निघाले होते आणि देशाच्या गरजेसाठी सुमारे १०५·८ लक्ष टन तेल परदेशातून आणावे लागले होते. तथापी लवकरच आपल्या गरजेपुरते तेल आपण काढू शकू, असे वाटते.

मँगनीज :—पोलाद तयार करण्यासाठी ह्या धातूचा

उपयोग करतात. जगातील तिसऱ्या क्रमांकाचे मँगनीज उत्पन्न करणारे राष्ट्र म्हणून भारत ओळखला जातो. ह्याचा साठा आपल्या देशात १८ कोटी टनांचा असावा, असा अंदाज आहे. रासायनिक उद्योगात व कोरड्या सेल बॅटऱ्या तयार करण्यासही मँगनीज वापरतात. बिहार, गुजराथ, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, राजस्थान, ओरिसा, म्हैसूर, तामीळ नाडू इत्यादि राज्यात मँगनीज निघते.

अभ्रक :–जगाला लागणाऱ्या अभ्रकापैकी ८० टक्के अभ्रक आपला देश पुरवितो. प्राचीन काळापासून आयुर्वेदिक औषधे तयार करण्यास आपल्या देशात अभ्रकाचा उपयोग केला जातो. बिहार, राजस्थान व आंध्र प्रदेशात अभ्रक सापडते.

सोने :–आपल्या देशात सोने फार कमी सापडते. जगातील सोन्याच्या २ टक्के सोने फक्त आपल्या देशातील खाणीतून निघते. त्यापैकी ६५ टक्के सोने म्हैसूर राज्यातील कोलार येथील खाणीतून निघते.

सिमेंट :–अलीकडे सिमेंटचा वापर आपल्या देशात मोठ्या प्रमाणावर होऊ लागला आहे. त्याचे उत्पादनही बरेच होत आहे. विशेषतः गुजराथेतील पोरबंदर, राजस्थानातील लाखेरी, मध्य प्रदेशातील जबलपूर व कटणी,

आंध्र प्रदेशातील गुंतूर येथील सिमेंटचे कारखाने प्रसिद्ध आहेत.

इतर खनिजे :—मीठ व इतर खनिज पदार्थ त्या मानाने आपल्या देशात कमीच उत्पन्न होतात.

## ७. देशाचे इतर उत्पन्न

देशाच्या जमिनीतून होणाऱ्या उत्पन्नाबरोबरच देशाकडेच्या समुद्रातून आणि देशातील नद्यांच्या पाण्यातूनही काही उत्पन्न मिळते आणि तेही महत्त्वाचे आहे. आपल्या रोजच्या खाण्यामध्ये येणारे मीठच घ्या. मिठावाचून आपले जेवण एक घास तरी जाईल का ?

मीठ--जमिनीतून खाणीतून काढूनही काही मीठ आपल्या देशात मिळते. राजस्थान, कच्छचे रण व हिमाचल प्रदेशातील मंडी येथून अशा प्रकारचे मीठ मिळते, पण ते समुद्रापासून मिळणाऱ्या मिठाच्या मानाने फारच कमी असते. समुद्रकिनारा आपल्या देशाला बराच मोठा असल्यामुळे आपल्या जीवनाला पुरे एवढे मीठ आपण तयार करू शकतो. गुजराथ, महाराष्ट्र, तामीळनाडू, ओरिसा, पश्चिम बंगाल आणि केरळ राज्यामध्ये मिठागरे आहेत. भरतीच्यावेळी समुद्राचे पाणी घेऊन ते सुकवून मीठ तयार केले जाते.

मासे--देशातील लहान-मोठ्या नद्यांतून, सरोवरांतून व विशेषतः समुद्रातून मासे काढले जातात. समुद्रकाठच्या प्रदेशातील लोकांचे मासे हे एक महत्त्वाचे असे अन्न आहे.

पश्चिम बंगाल, ओरिसा, महाराष्ट्र, तामीळनाडू व केरळ येथील लोकांच्या खाण्यामध्ये मासे बरेच येतात. समुद्र-किनाऱ्यावर मासे गोठविण्यासाठी मुद्दाम बांधलेली काही ठिकाणे आहेत. असे गोठविलेले मासे इतर ठिकाणीही पाठविले जातात. समुद्रातील ह्या महत्त्वाच्या संपत्तीकडे अजून आपल्या लोकांचे लक्ष जावे तसे गेलेले नाही. वाढत्या लोकसंख्येला अन्नाचा तुटवडा पडत असूनही आपण अजून ह्या दिशेने जोराचे प्रयत्न केलेले नाहीत. तथापि सरकारने अलीकडे मासे धरणाऱ्या कोळ्यांना अनेक बोटी व जाळी पुरविलेली आहेत. सामान्य लोकांनीही पूरक अन्न म्हणून मासे खाण्याकडे वळणे जरूरीचे आहे. सध्या आपल्या देशात सुमारे ५ लक्ष लोक मासेमारीचा धंदा करतात; आणि ८५ हजार बोटी या कामी वापरतात. तरी वर्षाकाठी सरासरीने आपला कोळी दोन ते अडीच हजार किलोग्रॅम मासे पकडतो. तेच पश्चिमेकडील देशातील कोळी वर्षाकाठी सरासरीने आठ हजार किलोग्रॅम मासे धरतो.

मोती——मानारच्या आखातात तामीळनाडूच्या किनाऱ्यावर मोती काढण्याचा व लखदीव बेटाच्या आसपास पोवळी काढण्याचा व्यवसाय थोड्या प्रमाणात चालतो.

सागरी संपत्तीकडेही अजून आपले लक्ष कमीच गेलेले आहे. समुद्राच्या तळातील खडकातून तेल निघू शकते, हे

अलीकडेच आपणाला कळून आलेले आहे आणि गुजराथेतील खंबायतच्या आखातात त्या दृष्टीने प्रयत्नही झालेले आहेत. पण काही देशातील लोकांनी समुद्रातील वनस्पतींचा–शेवाळांचा वगैरे अन्न म्हणून उपयोग करता येईल आणि समुद्रामध्ये धान्येही तयार करता येतील, म्हणून प्रयत्न चालविले आहेत, त्याचाही आपण विचार करणे जरूर आहे.

पशुधन––जनावरे म्हणजे आपल्या देशातील उत्पन्नाचे एक मोठे साधन आहे. फार पूर्वीच्या काळी आपल्या देशातील लोक जनावरांना धनच समजत होते. इतकेच नाही तर ते विनिमयाचे साधनच होते. विनिमय म्हणजे देवघेव. काही वस्तू विकत घेताना आज आपण पैशाचा–नाण्यांचा व नोटांचा, चेकचा–व्यवहार करतो, तसा पूर्वी गाई व इतर जनावरे एकमेकांना देऊन गरजा भागवीत. आजही खेड्यापाड्यातून मेंढ्यांचे कळप बाळगणारे लोक त्यांना आपली संपत्तीच समजतात.

गाई, बैल, म्हैस, रेडे, शेळ्या-मेंढ्या, घोडे-गाढवे, खेचरे, डुकरे इत्यादि जनावरे आपल्या देशात पुष्कळ आहेत. गाई-बैल १५० दशलक्ष, म्हशी-रेडे ४३ दशलक्ष, बकरी ४० दशलक्ष, शेळ्या ४७ दशलक्ष, घोडे १०५ दशलक्ष आहेत. जगातील जनावरांच्या चौथ्या हिश्श्यापेक्षा जास्त आपल्या देशातील जनावरे आहेत, परंतु ह्या आपल्या

संपत्तीकडेही आपण काळजीपूर्वक पाहिलेले नाही.

गाईला गोमाता म्हणतात. गाईचे दूध हे लहान मुलांना आईच्या दुधाच्या खालोखाल उपयोगी पडते आणि मोठ्या माणसांनाही ते अन्न म्हणून चांगले ठरलेले आहे. पण सुधारलेल्या देशातील गाई जेवढे दूध देतात, तेवढे दूध काही आपल्या देशातील गाई देत नाहीत. कॅनडा देशातील गाईच्या १५ पट गाई आपल्या देशात आहेत, पण दूध मात्र कॅनडामध्ये मिळते त्याच्या दुप्पटच आपण मिळवितो. जगामध्ये डेन्मार्क हा देश दूधदुभत्याच्या बाबतीत सर्वात पुढारलेला आहे. ह्या देशातून नुकत्याच १०० गाई आपण आणविल्या असून, पुण्याजवळील उरुळी-कांचन येथील केंद्रात त्यांचे संगोपन–सांभाळ–चालू आहे. ह्या गाईच्या धर्तीवर आपल्याकडे अधिक दूध देणाऱ्या गाई निर्माण करण्याचा प्रयत्न होणार आहे. दूध हे महत्त्वाचे अन्न आहे, पण आपल्या देशातील गाय वर्षाला सरासरीने ४१३ पौंड (अर्धा किलोला थोडे कमी म्हणजे एक पौंड) दूध देते, तर हॉलंड देशातील गाय वर्षाला ८००० पौंड, ऑस्ट्रेलियातील गाय ७००० पौंड, स्वीडन-मधील गाय ६००० पौंड आणि अमेरिकेतील संयुक्त संस्थानातील गाय ५००० पौंड दूध देते !

चांगली धष्टपुष्ट जनावरे निर्माण करण्याचा प्रयत्न आपल्या देशातही अलीकडे सुरू झालेला आहे. तथापि

आजही जनावरांचे श्रम आपणाला लाभत आहेत, त्यांचे मोल १००० कोटी रुपयांचे आहे; आणि त्यांच्या खतांचे उत्पन्नही वर्षाकाठी १००० कोटी रुपयांचे आहे, असे म्हणतात.

जनावरांचे मांस हेही आपले एक महत्त्वाचे अन्न आहे, शेळ्या-मेंढ्यांचे मांस तर पुष्कळ लोक खातातच, पण इतर जनावरांचेही मास शहरातील हॉटेलातून खाणारे बरेच लोक आहेत. गाईचे मांस खाणे चांगले नाही, असे पुष्कळ हिंदू लोकांना वाटते. पण त्यांना हे माहीत नाही की, पूर्वीच्या काळी आपले वाडवडील, ऋषीमुनीही गाई-बैलांचे मांस खात होते. असे म्हणतात की, वशिष्ट ऋषी एकदा जनक राजाकडे गेले होते, तेव्हा जनक राजाने आपल्या अतिथीसाठी म्हणजे पाहुण्यासाठी छानसा पाडा (तरणा बैल) मारलेला होता !

बौद्ध आणि जैन धर्माच्या अहिंसा तत्त्वापासून व वारकरी आणि लिंगायत लोकांच्या धार्मिक भावनेतून मांस-मासे न खाणारे काही लोक आढळत असले, तरी मांसाहार करणाऱ्या लोकांची संख्या काही कमी नाही आणि त्यांच्या दृष्टीने पशुधन महत्त्वाचे आहे. फार पूर्वीच्या काळापासून शिकार करून जनावरांच्या मांसावरच जगातील इतर देशांतील लोकांप्रमाणे आपल्या देशातील लोकही जगत आलेले आहेत.

कोंबड्या, बदके इ. पक्षी मारून खाणारे आणि त्यांच्या अंड्यांचा खाण्यासाठी उपयोग करणारे लोकही पुष्कळ आहेत. त्या दृष्टीने ते एक प्रकारचे धन व उत्पन्नाचे साधनच आहे.

देशाच्या उत्पन्नाचा येथवर जो विचार केला, तो जमिनीतून, पाण्यातून किंवा इतर उपायाने निसर्गाचा उपयोग करून माणसाने काढलेल्या उत्पन्नासंबंधीचा होता. हे उत्पन्न एखाद्या माणसाचे, कुटुंबाचे आणि काही अंशी देशाचेही होते.

पण देशाचे उत्पन्न एवढ्यावरच थांबत नाही. देशाचा कारभार चालविण्यासाठी म्हणजे नोकरलोकांचा पगार देण्यासाठी व देशामध्ये नाना प्रकारच्या सुधारणा करण्यासाठी आणि मुख्यतः देशाचे संरक्षण करण्यासाठी जो खर्च लागतो, तो भागविण्यासाठी, देशाला आणखी वेगळ्या प्रकारानेही उत्पन्न उभारावे लागते. सरकार ही लोकांनीच लोकांच्या हितासाठी चालविलेली एक संस्था आहे. म्हणून सरकार मुख्यतः लोकांच्या उत्पन्नावर कर बसवून आपले उत्पन्न उभे करते. जमिनीवरचा कर, घरांवरचा कर, उद्योगधंद्यांतून उत्पन्न केलेल्या वस्तूंवरचा कर, व्यापारासाठी परदेशी पाठवावयाच्या किंवा परदेशातून आणावयाच्या मालावरचा कर, व्यापारातून किंवा इतर रीतीने मिळविलेल्या पैशांवरचा कर, चैनीसाठी किंवा व्यसना-

साठी वापरावयाच्या वस्तूंवरचा कर, वाहनांवरचा कर इत्यादी अनेक प्रकारचे कर बसवून आणि रेल्वे, पोस्ट व तारखाते आणि अनेक प्रकारचे सरकारी उद्योग व कारखाने यांचे येणारे उत्पन्न हे सरकारचेच उत्पन्न असते.

चालू साली सरकारने जे बजेट मंजुरीसाठी मांडलेले आहे, त्यामध्ये ३५६२ कोटी रुपये उत्पन्नाच्या बाजूला व ३५८७ कोटी रुपये खर्चाच्या बाजूला धरलेले आहेत. यापैकी संरक्षणासाठी धरलेला खर्च १०७९·२३ कोटी रुपयांचा आहे, ही लक्षात धरण्यासारखी गोष्ट आहे.

# ८. लोक आणि त्यांची संस्कृती

आपल्या देशाच्या उत्पन्नाचा येथवर जो विचार केला, तो मुख्यतः निसर्गाने आपणाला जे काही दिलेले आहे, त्याचा आपण कसा व किती उपयोग केलेला आहे, ह्या-संबंधाचा आहे.

निसर्ग म्हणजे जे मूळचेच आहे ते. माणसांनी कोणी निर्माण केलेले नाही, पृथ्वीच्या जन्माबरोबरच जे आलेले आहे, म्हणजे मूळचेच, आपोआप तयार झालेले. आपल्या देशाचा जो निसर्ग आहे, म्हणजेच आपल्या देशातील जमीन, डोंगर, नद्या, समुद्र इत्यादि जे आपणाला लाभलेले आहे, त्याच्यापासून आपणाला काय मिळते किंवा आपण त्यापासून काय उत्पन्न करीत आलो आहो, त्याचा येथवर विचार केला.

यानंतर ह्या निसर्गाचा उपयोग करून माणसाने त्याच्यावर जो विजय मिळविला आहे किंवा आपल्या कर्तबगारीने माणसाने ज्या काही सुखसोई आपणासाठी करून घेतलेल्या आहेत, त्याचा विचार करावयाचा आहे, पण त्याच्या अगोदर आपल्या देशातील लोक व त्यांची संस्कृती यांचा विचार करण्याचे मी ठरविलेले आहे.

देश म्हणजे त्या देशातील जमीन किंवा प्रदेश हे खरे असले, तरी खरा देश म्हणजे त्यातील लोक होत. आपल्या देशात असे ५५ कोटी लोक सध्या राहात आहेत. फार मोठी संख्या आहे ही. हे एवढे लोक काही एकाच वंशाचे, एकाच धर्माचे किंवा एकाच जातीचे नाहीत. जगातील इतर देशांप्रमाणे फार पूर्वीच्या काळी आपल्या देशातही फार थोडे लोक राहात होते, पण वेळोवेळी त्यांच्यामध्ये भर पडत गेली. ही भर त्या पूर्वीच्या लोकांच्या वंशजांची म्हणजे त्यांच्या पोटी जन्माला आलेल्यांची तर आहेच, पण त्यापेक्षा बाहेरून येऊन ह्या देशात राहिलेल्यांचीही आहे.

माणसाचा रंग, त्याच्या डोक्याची ठेवण, गालाची हाडे, डोळ्याचा रंग, नाकाची लांबीरुंदी, केस वगैरेवरून माणसांचा वंश ठरविला जातो. जगावर—पृथ्वीवर—प्रथम निर्माण झालेली माणसे सगळी काही सारखीच नसणार. निरनिराळ्या देशांमध्ये तेथील हवामानाप्रमाणे त्यांच्या शरीराची ठेवण झालेली असणार व त्यावरूनच हे वंश मागाहून अलीकडच्या काळात कोणीतरी ठरविलेले असणार. जगातील लोक सामान्यतः पाच प्रकारच्या वंशांचे आहेत असे समजले जाते. आर्यन किंवा आर्य, मंगोलियन, सेमेटिक, निग्रो व रेडइंडियन हे ते पाच वंश. युरोपियन व इराणी लोक हे आर्यवंशाचे आहेत; चीन, मंगोलिया,

तिबेट ह्या देशांतील व आग्नेय आशियातील लोक मंगोलियन वंशाचे आहेत; इजिप्त, अरब देशातील व जवळच्या मध्य आशियातील लोक सेमेटिक वंशाचे; मध्य व दक्षिण आफ्रिकेतील लोक निग्रो वंशाचे व अमेरिकेतील मूळचे रहिवासी हे रेडइंडियन वंशाचे आहेत, असे समजण्यात येते.

आपल्या देशातील लोक हे आर्य आणि त्यांचीच जुनी शाखा द्रविड व शक-हूण वगैरे सेमेटिक आणि मोंगल वंशाला जवळचे असलेल्या वंशाचे आहेत. काही जंगली किंवा वनात राहाणारे मूळचे लोक ह्या देशात आहेत, नाही असे नाही, पण त्यांची संख्या आता कमी झालेली आहे. ह्या लोकांना आता गिरीजन म्हणतात. ते आणि हरीजन व इतर मागास मानले गेलेले लोक हे आपल्या देशाचे मूळचे लोक होत. मागाहून बाहेरून येऊन ह्या देशात वरचढ ठरलेल्या आर्य लोकांनी ह्या मूळच्या लोकांना कमी दर्जाचे ठरविलेले आहे. आर्य लोक हे मध्य आशियातील. आजच्या रशियाच्या दक्षिणेकडील प्रदेशातील. ते भारतात आले त्यालाही आता तीन-चार हजार वर्षे झाली. हे आर्य लोक भारतात येण्यापूर्वी येथे रहिवासी झालेले द्रविड लोक सबंध देश—उत्तर हिंदुस्तान—व्यापून राहिलेले होते. ते चांगले सुधारलेले होते. त्यांनी उत्तम नगरे वसविलेली होती. शेती चांगली केलेली होती. कालवेही काढलेले होते. हे द्रविड लोक असेच केव्हातरी

पूर्वी येथे येऊन राहिलेले आहेत, असे म्हणतात. आर्य लोक येथे राहायला आले ते अफगणिस्तानाच्या मार्गाने खैबरखिंडीतून पंजाबात उतरले व मग हळूहळू इतर ठिकाणी पसरले. मूळच्या एथे असलेल्या द्रविड लोकांची व ह्या आर्य लोकांची तुंबळ युद्धे झाली. ही युद्धे शेकडो वर्षे चालू होती. आर्य लोक स्वतःला सुर व द्रविडांना असुर म्हणत होते. वेदांमध्ये वर्णन असलेली युद्धे ती ह्या लोकांतीलच. आर्यांचे वर्चस्व उत्तर हिंदुस्थानात होऊ लागले, तसतसे द्रविड लोक देशाच्या पूर्व व दक्षिण भागात जाऊन राहिले. आजचे तामीळ नाडू, आंध्र, म्हैसूर व केरळ राज्यांतील लोक हे मुख्यतः द्रविडवंशीय आहेत.

आपण महाराष्ट्रीय लोक ह्या आर्य व द्रविड वंशांच्या मिश्रणापासून बनलेले आहोत. दोहोंच्या मध्य भागी आपला प्रांत आहे, त्याचा हा परिणाम आहे. उत्तरेकडे-सुद्धा शुद्ध आर्यवंशी लोक थोडेच आहेत. त्यांच्यामध्ये काही द्रविडांचे आणि आर्यांच्याही मागाहून आलेल्या शक किंवा हूण लोकांचे रक्त आहे. शक किंवा हूण लोक हे विशेषतः राजस्थान व मध्य प्रदेश आणि काही महा-राष्ट्रातही येऊन कायमचे राहिलेले आहेत.

द्रविडांचे दैवत महादेव होते. हे लोक शेती करणारे असल्याने बैलांचा वापर त्यांच्यामध्ये जास्त होता.

म्हणूनच ते महादेवाबरोबर नंदीलाही पूजीत. आजही सबंध भारतात महादेव हेच हिंदू लोकांचे मुख्य दैवत आहे. एकही गाव असे सापडायचे नाही की, जेथे महादेवाचे देऊळ नाही.

आर्य लोकांचे मुख्य दैवत विष्णू हे होते. देवाचे दहा अवतार हे विष्णूचेच अवतार होत. विष्णू म्हणजे सर्वांना व्यापून राहिलेला देव. नारसिंह, परशुराम, राम, कृष्ण हे विष्णूचेच अवतार. ह्यांचीही देवळे अनेक ठिकाणी आहेत. पण आर्यांनी भारतात आल्यावर द्रविडांच्या देवदेवता व कल्पना यांचाही स्वीकार केला. त्यामुळे शुद्ध आर्य किंवा शुद्ध द्रविड कोठेच आढळणार नाहीत. दक्षिण भारतात महादेवाची जशी मोठमोठी देवळे व क्षेत्रे आहेत, तशीच विष्णूच्याही निरनिराळ्या रूपांची देवळे आहेत. उत्तर भारतात तर आजही महादेवाची क्षेत्रे पुष्कळच आहेत. बदरीनाथ किंवा केदारनाथ, काशीचा विश्वेश्वर अथवा अनेक ठिकाणी ईश्वर शब्द पुढे असलेल्या नावाचे देव सारे महादेवच आहेत.

शैव आणि वैष्णव हे हिंदू लोकातील भेद शिवाचे म्हणजे महादेवाचे भक्त आणि विष्णूचे भक्त यावरूनच पडलेले आहेत. हे दोन्ही प्रकारचे लोक साऱ्या भारतात आढळतात. बौद्ध आणि जैन धर्माच्या प्रसारानंतर पुन्हा वैदिक किंवा हिंदू धर्म बाढीला लावणारे पहिले शंकरा-

चार्य द्रविडवंशी केरळ प्रांतातील राहाणारे. त्यांनी भारतामध्ये उत्तरेकडे हिमालयात, पश्चिमेकडे काठेवाडात, पूर्वेकडे ओरिसात व दक्षिणेकडे तामीळ नाडूमध्ये अशी चार धामे किंवा पवित्र ठिकाणे ठरवून दिली व सर्वत्र महादेवाची पूजा चालू केली. ह्या चारी धामांची–बदरी-केदार, द्वारका, पुरी व रामेश्वर यांची–यात्रा करणारे आज हजारो हिंदू आढळून येतील.

म्हणजे काहीशा भिन्न वंशांचे लोक भारतामध्ये राहात असले, तरी ते आता इतके एकमेकात मिसळून गेले आहेत की, ते सारे एकजीव होऊन गेलेले आहेत. त्यांच्यामध्ये आता वंशाचा अतिरेकी अभिमान राहिलेला नाही आणि ते सारे भारतीय बनलेले आहेत.

आपल्या देशातील लोक आता अनेक धर्मांचे झालेले आहेत. हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती, पारशी, बौद्ध, जैन, शीख, लिंगायत, यहुदी इत्यादी हे धर्म आहेत. यांमध्ये हिंदू आणि मुसलमान यांचीच संख्या जास्त आहे. आणि सर्वांत अधिक संख्या हिंदू लोकांचीच आहे. पूर्वी तर केवळ हिंदूच लोक येथे राहात होते आणि त्यामुळेच ह्या देशाला हिंदुस्तान हे नाव पडलेले होते.

हिंदू हे भारतातील लोकांचे नाव परक्या लोकांनी दिलेलेच आहे. अरब व इराण देशातील पूर्वीच्या काळच्या लोकांनी हे नाव दिलेले आहे. भारतातील उत्तरेकडील

मुख्य नदी जी सिंधु तिच्यावरून हे नाव पडलेले आहे. जमिनीच्या मार्गाने पश्चिमेकडून भारतात येणाऱ्या लोकांना प्रथमच लागणारी मोठी नदी म्हणजे सिंधूच होय. हे लोक प्रथम पंजाबात येत व तेथे सिंधू आणि तिला मिळणाऱ्या जेहलम, चिनाब, रावी, बियास आणि सतलज ह्या पाच नद्या ह्या परक्या लोकांना लोभवून टाकीत. सिंधूला मिळणाऱ्या पाच जलाशयांमुळे–नद्यांमुळे म्हणजे पाच आब म्हणजे पाण्यामुळे पंच आब–पंजाब–असे नाव ह्या प्रदेशाला पडलेले आहे. ह्या पाच नद्या पुढे एकत्र होऊन सिंधूलाच मिळत असल्यामुळे सिंधूला स्वाभाविकच महत्त्व प्राप्त झाले होते. सिंधूच्या भागात–खोऱ्यात–राहाणारे लोक ते सिंधू लोक, इराणी लोकांच्या भाषेत ‘ स ’ नाही, ते ‘ स ’ ऐवजी ‘ ह ’ अक्षर वापरतात, म्हणून त्यांनी सिंधूचे हिंदू करून टाकले. अर्थात सिंधूच्या खोऱ्यातील लोक ते सारे हिंदू लोक. यावरून दिसून येईल की हिंदू हे नाव मूळचे धर्माचे नाव नाही.

मग येथील पूर्वीच्या लोकांच्या धर्माचे नाव काय होते? काही सांगता येत नाही.

काही लोक म्हणतात, हे लोक त्याकाळी वेदाचे तत्त्वज्ञान मानणारे होते, म्हणून त्यांना वैदिक लोक किंवा वेदान्ती म्हणत असावे, पण ते काही खरे नाही.

आर्य लोकांनी वेदांची रचना केलेली आहे, पण आर्य

लोक भारतात येण्यापूर्वीही द्रविड किंवा त्यांच्यासारखे लोक येथे होते, ते सुधारलेले होते आणि त्यांची एक विशेष प्रकारची संस्कृतीही होती. इतिहासाचा अभ्यास केलेले लोक ह्या काळच्या लोकांच्या संस्कृतीला सिंधू-संस्कृती म्हणतात. पंजाब व सिंध प्रांतातील (आजच्या पाकिस्तानातील) मोहेंजोदडो व हारप्पा ह्या उकरून काढलेल्या शहरांचा अभ्यास करून सिंधू संस्कृतीवर पुष्कळ प्रकाश पाडण्यात आलेला आहे.

अगदी जुन्या काळच्या भारतीय लोकांच्या धर्माला नाव काय होते हे सांगता येत नसले, तरी त्या लोकांच्या धार्मिक कल्पना माहीत झालेल्या आहेत.

मोहेंजोदरो व हरप्पा येथील उकरलेल्या ठिकाणातून ज्या वस्तू काढलेल्या आहेत, त्यांचा अभ्यास केलेल्या शहाण्या लोकांचे म्हणणे असे आहे की, त्या काळचे म्हणजे आजपासून पाच हजार वर्षांपूर्वीचे लोक मातृदेवीची–धरणीमातेची–पूजा करीत, वृक्षाची पूजा करीत, पाण्याची–जलदेवतेची पूजा करीत; आणि शिवाची व लिंगाचीही पूजा करीत. उकरलेल्या एका प्रेताजवळ माणसाबरोबरच बकरीचीही हाडे सापडलेली आहेत, त्यावरून स्वर्गात जाताना बकरीचा आपल्याला उपयोग होईल, असे त्या लोकांना वाटत असावे, असे अनुमान काढलेले आहे. स्वर्गाच्या, नरकाच्या आणि पुनर्जन्माच्या कल्पना ह्या

लोकांच्या ठायी असाव्या. ते देवीची–शक्तीची–उपासना करणारेही असावे.

त्यानंतर आर्य लोक येथील रहिवासी झाल्यावर त्यांनी आपल्या नव्या धार्मिक कल्पनांबरोबर जुन्या काळच्या रहिवाशांच्या कल्पनाही पचनी पाडल्या. वेदांच्या, उपनिषदांच्या आणि त्यानंतर बौद्ध, जैन वगैरे लोकांच्या धार्मिक कल्पना आताच्या भारतातील लोकांच्या ठायी वसत आहेत. मुसलमान आणि ख्रिस्ती लोकांच्या कल्पनाही येथील अनेक लोकांनी आता आपल्याशा केलेल्या आहेत. तथापि सर्व लोकांच्या अंतःकरणात जुन्या धार्मिक कल्पनाच दडून राहिलेल्या आढळून येतील; आणि लोकांच्या रोजच्या वागणुकीत त्या दिसल्याशिवाय राहाणार नाहीत. परमेश्वरावर विश्वास, त्याची पूजा-अर्चा आणि प्रार्थना; नवससायास, जादूटोणा, भुतेखेते, ज्योतिष यांवर विश्वास; परलोक आणि पुनर्जन्म यासंबंधाच्या कल्पना इत्यादि गोष्टी जवळजवळ सर्व धर्मांच्या लोकांच्यामध्ये सारख्याच आढळून येतात. पुस्तकी पंडित काही सांगत असले, तरी वेळप्रसंगी तेसुद्धा वर दिलेल्या प्रकारच्या समजुतींना बळी पडलेलेच दिसतात.

आपल्या देशातील लोक पुष्कळ प्रकारच्या धर्मांचे आहेत, तसेच त्यांच्या जातींच्या कल्पनाही पुष्कळ प्रकारच्या आहेत. अनेक जातींमध्ये हे लोक विभागलेले आहेत.

तथापि देशाच्या एकजुटीला ह्या जाती आड येत आहेत, असे वाटत नाही. १९६५ साली पाकिस्तानने भारताशी युद्ध पुकारले, त्यावेळी भारताने जो लढा दिला आणि पाकिस्तानला पराभूत केले, त्यावेळी भारतातील सर्व जातींचे व धर्मांचे लोक एक होऊन लढले, ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. पाकिस्तानसारख्या मुसलमान राष्ट्राच्या विरुद्ध भारतातील मुसलमान सैनिकही प्राणपणाने लढले, ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे.

आपल्या देशाची संस्कृती तशी वरच्या दर्जाची आहे. संस्कृती म्हणजे पिढ्यान पिढ्या लोकांच्या मनात घर करून राहिलेले विचार व त्याप्रमाणे होणारी वागणूक. भारतीय लोकांनी आपल्या राज्याच्या वाढीसाठी परक्या-देशावर कधी स्वाऱ्या केल्या नाहीत आणि देशातल्या देशात धार्मिक कारणावरून कधी युद्धेही केलेली नाहीत. युरोपात ख्रिस्ती धर्मातील रोमन कॅथॉलिक आणि प्रॉटे-स्टंट ह्या दोन पंथांच्या लोकांनी जी आपसात युद्धे केली आणि विरुद्ध मताच्या लोकांना जाळून मारण्यापर्यंत मजल मारली, तसे आपल्या देशात कधी घडलेले नाही. इस्लाम म्हणजे शांती. देशात शांती निर्माण करण्यासाठी स्थापन झालेल्या मुसलमान लोकांनी आपसात ज्या कत्तली केल्या आणि आजही त्या चालू आहेत, तसे भारतात कधी झालेले नाही. याचे कारण भारताची संस्कृती श्रेष्ठ आहे,

हेच आहे.

भारतीय लोकांचा आपल्या धार्मिक आणि सामाजिक नियमांवर विश्वास आहे. पापपुण्याच्या आणि नीतिअनीतीच्या त्यांच्या कल्पना श्रेष्ठ प्रतीच्या आहेत. ईश्वर सर्वत्र आहे, तो सर्व प्राणिमात्रातही आहे. आपल्या कुटुंबातल्या माणसात आणि शेजाऱ्या–पाजाऱ्यांच्या ठायीही तो आहे. तेव्हा सर्वांशी समभावाने आणि प्रेमाने वागावे, कोणाचीही हिंसा करू नये––दुसऱ्याला त्रास होईल असे वागू नये. परोपकारः पुण्याय। म्हणजे परोपकार केल्यानेच पुण्य लागते. अशा प्रकारची शिकवण वाडवडील प्राचीन काळापासून देत आलेले आहेत, त्यामुळेच इतर धर्मांच्या लोकांबद्दल हिंदू माणसाच्या ठायी अनादराची भावना नसते. सर्व नद्या–मग त्या कोठूनही निघालेल्या असोत–शेवटी समुद्रालाच जाऊन मिळतात, त्याप्रमाणे कोणत्याही धर्माप्रमाणे आचरण केले तरी शेवटी त्याला परमेश्वरप्राप्ती होणारच, अशी आमची समजूत आहे. हीच आमची श्रेष्ठ संस्कृती. भगवान श्रीकृष्णाने, भगवान गौतम बुद्धाने आणि महात्मा महावीराने हेच आम्हाला शिकविले आणि अलीकडील साधूसंतांनी ह्याच तत्त्वाची शिकवण दिली.

भारतात सध्या असलेल्या लोकांपैकी फार थोडे लोक परदेशातून येऊन राहिलेले आहेत. येथील बहुतेक सारे लोक ह्याच देशातील मूळचे रहिवासी आहेत. यांपैकी काहींनी

ख्रिस्ती किंवा मुसलमानी धर्म स्वीकारलेला असला, तरी ते येथीलच आहेत, युरोपातून किंवा अरबस्तानातून ते येऊन राहिलेले नाहीत. ह्या सर्व लोकांची जन्मभूमी भारतच आहे आणि त्यामुळे त्या सर्वांची संस्कृती एकच आहे.

# ९. एकाच संस्कृतीची अनेक रूपे

'एकं सद्विप्रा बहुधा वदन्ति' म्हणजे परमेश्वर एकच असला तरी शहाणे लोक त्याला निरनिराळ्या रूपाने ओळखतात किंवा निरनिराळी नावे देतात, त्याप्रमाणे आपल्या देशातील लोक एकाच संस्कृतीचे असले, तरी प्रत्यक्षात पाहाताना ते निरनिराळ्या गुणधर्मांचे दिसतात. त्यांचे रंगरूप, पोषाख, खाणेपिणे, राहणी व चालीरीती वेगवेगळ्या वाटतात.

जम्मू आणि काश्मीर––हे आपल्या देशातील अगदी उत्तरेकडचे राज्य. त्यातील जम्मू भागात हिंदूंची वस्ती बरीच आहे, पण काश्मीरमध्ये बहुतेक मुसलमानच राहातात. ह्या राज्याला आपल्या देशातील नंदनवन म्हणायला हरकत नाही. उंच पठारावर पर्वत–प्रदेशात हे राज्य आहे. त्यामुळे येथील हवा उन्हाळ्यातही थंड असते. झाडीझुडी मुबलक आहे. बागबगीचेही आहेत आणि उत्तम प्रतीची सरोवरेही आहेत. त्यामुळे आपल्या देशातील व परदेशांतीलही खूप लोक उन्हाळ्यात ह्या प्रदेशाला भेट देतात. ह्या राज्याची राजधानी श्रीनगर हे शहर जेहलम नदीच्या दोन्ही तीरांवर वसलेले आहे. ह्या नदीवर व सरोवरातून

अनेक हाऊसबोटी चालतात. हाऊसबोट म्हणजे ज्या नावेवर राहाण्याचीही सोय असते, अशा नावा. प्रवासी लोक या हाऊसबोटीत राहात असतात. पुष्कळ लोक असला नावाड्याचा धंदा करतात. येथील लोकांची हीच मोठी कमाई. बाकी



हाऊस बोटी

प्रदेश वनश्रीसंपन्न असला, तरी धनधान्य बेताचेच पिकत असल्याने व इतर उद्योगधंदेही कमीच असल्याने लोक एकंदरीने गरीब आहेत. हां, येथील शेळ्यामेंढ्यांची लोकर चांगली असल्याने लोकरीचे व रेशमी गालिचे येथे चांगले होतात. ते जगात प्रसिद्ध आहेत. हे कारागीर मात्र बरे पोट भरतात. येथील लोकांमध्ये आर्यवंशाचे रक्त बरेच असल्याने व हवा थंड असल्याने ते रंगाने चांगले गोरे आहेत. येथील स्त्रियांची सौंदर्याबद्दल ख्याती आहे. पूर्वीच्या वर्षी ह्या प्रदेशात मोठमोठे विद्वान लोक होऊन गेले, म्हणून येथील ब्राह्मणांना पंडित असे आजही म्हणतात. आपले पहिले लाडके पंतप्रधान पंडित नेहरू हे मूळचे



पंडित नेहरू

काश्मीरचेच राहाणारे. ह्या राज्याचा ईशान्य भाग लडाख हा मोठा प्रदेश आहे, पण तो १७,००० फूट उंचीवर असल्याने तेथील हवा फारच थंड आहे आणि शेतीचे उत्पन्न फारच कमी असल्याने तेथे लोकवस्तीही फार कमी आहे. तथापि हे सारे राज्यच सरहद्दीवरचे आहे आणि त्यामुळे येथील लोकांना नेहमीच युद्धाचे प्रसंग येतात, म्हणून ते चांगले शूरही बनलेले आहेत. १९६५ साली पाकिस्तानने युद्ध सुरू केले, ते ह्या प्रदेशात घुसूनच.

काश्मीरच्या दक्षिणेकडील पंजाब प्रदेश (पंजाब, हरियाणा व हिमाचल प्रदेश ही राज्ये) हा आपल्या देशातील अत्यंत महत्त्वाचा प्रदेश आहे. हा भाग म्हणजे सुपीक मैदान आहे. यामधून अनेक नद्या वाहातात व त्यांना मोठमोठे कालवेही काढलेले आहेत, त्यामुळे ह्या प्रदेशात गव्हाचे पीक मुबलक होते. येथील लोकात आर्यरक्तच जास्त असल्यामुळे ते रंगाने साधारणपणे गोरे, नाकेले, उंच व हाडापेराने धिप्पाड आहेत. त्यांना खाण्याला सकस

व भरपूर अन्न मिळते. येथील जनावरेही धिप्पाड आहेत. दूधदुभते चांगले आहे. आणि हा प्रदेशही सरहद्दीवरचाच असल्याने येथील लोकांना युद्धाचे प्रसंग आजवर अनेकदा आलेले आहेत, त्यामुळे हे लोकही मोठे शूर आहेत. कौरव



भांगडा नृत्य

पांडवांचे युद्ध येथेच झाले होते. लष्करामध्ये ह्या लोकांचा भरणा फार आहे. 'भांगडा' हे ह्या लोकांचे नृत्य प्रसिद्ध आहे. अलिकडे ह्या प्रदेशात लहानमोठे उद्योगधंदेही पुष्कळ सुरू झालेले आहेत. काश्मीरी लोकाप्रमाणेच येथील लोकांचा पोषाख असतो. हिवाळ्यात हवा फार थंड असल्याने स्त्रियाही विजारी नेसतात, अंगात कुडते घालतात व डोक्यावरून एक वस्त्र पांघरते घेतात. पंजाबात शीख लोक पुष्कळ आहेत. हिंदूंचाही भरणा आहे आणि मुसलमानही बरेच आहेत. शीखपुरुष डोक्याचे केस राखतात व वर फेटा बांधतात. ते दाढीही ठेवतात. दिल्ली हे शहर मूळचे पंजाबचे राजधानीचे शहर, आता ते स्वतंत्र ठेवलेले आहे. दिल्ली हे सबंध देशामध्ये प्रसिद्ध व पुष्कळ वेळा

राजधानीचे स्थान लाभलेले शहर असल्याने त्याला पुष्कळ वेळा युद्धाचे तडाखे बसलेले आहेत. दिल्लीच्या जवळच असलेले पानिपत हे ठिकाणही ह्यासाठी प्रसिद्धी पावलेले आहे.

पश्चिम सरहद्दीवर असलेले आणखी एक राज्य म्हणजे राजस्थान. राजस्थान म्हणजे राजे लोकांचे ठिकाण. ह्या भागात पूर्वी पुष्कळ राज्ये होती आणि त्यांचे राजेही तसेच होते. ह्या प्रदेशात राहाणाऱ्या लोकांना–त्यांच्या-पैकी पुष्कळांना–राजपूत किंवा रजपूत म्हणतात. ह्यांनाही पूर्वी पुष्कळ वेळा लढाईचे प्रसंग आल्याने तेही शूर बनलेले आहेत. राणा संग, राणा हम्मीर, राणा प्रताप वगैरे पराक्रमी राजे होऊन गेले, ते ह्याच भागातील. पद्मिनीसारख्या शूर राण्याही ह्या राजस्थानातच होऊन गेल्या. ह्या राजस्थानच्या पश्चिम भागात



राजस्थानी जोडपे

वाळवंटाचा प्रदेश आहे म्हणूनच ह्या प्रदेशात उंट बरेच आहेत. त्यामानाने पूर्व भाग बरा आहे. रजपूत लोक पंजाबी लोकासारखे उंच व धिप्पाड नाहीत, पण बरेच काटक आहेत. रजपूतरमणीही सुंदर म्हणून प्रसिद्ध आहेत. ह्या स्त्रिया लहंगा नेसतात आणि डोक्यावरून ओढणी घेतात. पुरूष चुनीदार विजारी घालतात, अंगात घोळदार अंगरखा घालतात व डोक्याला पगडी किंवा पागोटे बांधतात. राजस्थानात इमारतीला उपयुक्त असे तांबडे दगड डोंगरामध्ये चांगले सापडतात. राजधानीचे शहर जयपूर हे सुंदर शहर म्हणून प्रसिद्ध आहे. आपल्या देशाच्या सैन्यात रजपुतांचा भरणा बराच आहे.

मध्य प्रदेश, उत्तरप्रदेश, बिहार व बंगाल — ही राज्ये आपल्या देशातील सखल प्रदेशातील, नद्या बऱ्याच असलेली व चांगली पिके येणारी म्हणून प्रसिद्ध आहेत. गंगा यमुना आणि त्यांना मिळणाऱ्या नद्यांच्या खोऱ्यातील हा भाग असल्यामुळे प्राचीन काळापासून अतिशय भरभराटलेला प्रदेश म्हणून प्रसिद्ध आहे. देशातील दाट वस्तीचा हा भाग आहे; आणि अमरनाथ, केदारनाथ, हरिद्वार, मथुरा, प्रयाग, काशी, गया वगैरे क्षेत्रे ह्याच भागात आहेत. जगप्रसिद्ध ताजमहाल असलेला आग्रा एथेच आहे. भगवान श्री रामचंद्र, भगवान श्रीकृष्ण, भगवान गौतमबुद्ध व भगवान महावीर यांची कर्मभूमी असलेला असा हा

प्रदेश आहे, प्राचीन काळचे सम्राट चंद्रगुप्त, सम्राट अशोक आणि सम्राट हर्षवर्धन हे राजे ह्याच भागात होऊन गेले.



भगवान गौतम बुद्ध

प्राचीन काळचे कवि कालीदास, भवभूती व अलिकडचे प्रसिद्ध कवि रवींद्रनाथ टागोर यांची भूमी हीच. संत कबीर तुळशीदास, सूरदास आणि चैतन्य ह्याच भूमीत निपजले होते; आणि अलीकडच्या काळात जगाला धर्मांचे खरे स्वरूप समजावून देणारे परमहंस रामकृष्ण व त्याचे पट्ट शिष्य स्वामी विवेकानंद याच मुलखातले. काशी हे पंडितांचे आणि शास्त्री लोकांचे प्रमुख स्थान बंगाल तर क्रांतीकारक लोकांचे जन्मस्थानच; आणि अलिकडच्या काळात लोखंडाचे व इतर अनेक मोठे कारखाने याच भागात निघाले आहेत. साखरेचेही पुष्कळ कारखाने या भागात आहेत. ‘सश्य शामला’ म्हणून ज्या मातृ भूमीचे वंदे मातरम कर्ते कवि बंकिमचंद्रानी वर्णन केले आहे,

मराठी ग्रंथ ... राज्य शास्त्र
अनुक्रम ...
क्रमांक 3658 नोंद दि. 1.2.62

ती उपजाऊ भूमी हीच. हिंदी व बंगाली ह्या भाषांचा हा मुलूख. सामान्यतः लोक खाऊन पिऊन सुखी. मेवामिठाईचा हा प्रदेश. मध्य प्रदेश व उत्तर प्रदेश यांमध्ये जनावरे पुष्कळ व चांगली. मथुरेच्या आसपासचा गोकुळ वृन्दावनाचा भाग तर गवळ्यांचा भाग म्हणूनच पूर्वीच्या काळापासून प्रसिद्ध आहे. येथील राधा व इतर गवळणी आणि श्रीकृष्ण यांच्या लीलांनी पावन झालेला हा मुलूख.



स्वामी विवेकानंद

ह्याच प्रदेशातील जाठ लोक चांगले शेतकरी व शूर शिपाई म्हणून प्रसिद्ध आहेत. हिमालयाची दक्षिण उतरण उत्तर प्रदेश व बिहारच्या उत्तरेला आहे. या भागातील रोहिले लोकही शूर म्हणून प्रसिद्ध आहेत. देशाच्या आजच्या राजकारणामध्येही ह्या भागातीलच लोक अधिक आहेत. पंडित नेहरूंच्या नंतर होऊन गेलेले पंतप्रधान लालबहादूर शास्त्री

व आजच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांचा मुलूख हाच. आपले पहिले राष्ट्राध्यक्ष राजेन्द्र प्रसाद बिहार-मधील. गया हे बौद्ध धर्माचे जगातील प्रमुख ठिकाण आहे. ब्रह्मदेश, जपान, सीलोन व इंडोचायनातील बुद्धधर्मीय भारतात यात्रेसाठी एथेच येतात. योगी अरविंद आणि नेताजी सुभाषचंद्र बोस हे बंगालमधील. एथील स्त्रियाही कर्तबगार आहेत. झाशीची राणी येथीलच, हर्ष राजाची बहीण राज्यश्री एथीलच आणि सरोजिनी नायडू ह्याच मुलखातल्या. आजच्या प्रसिद्ध हिंदी कवियित्री महादेवी वर्मा एथीलच. बंगाली नटनटी व सिनेमा क्षेत्रातील लोकही प्रसिद्ध आहेत. असा हा भारतभूमीच्या हृदयाच्या ठिकाणी असलेला भू भाग आहे.



हिमालयाचे एक शिखर

आसाम आणि त्याच्या-लगतचे मेघालय, नागालंड, मणिपूर, त्रिपुरा वगैरे आपल्या देशातील उत्तरे-कडचाच पण अगदी ईशान्य कोपऱ्यातला हिमालयाचा भाग आहे. १९६२ साली चीनने आपल्या देशावर चढाई केली होती, तेव्हा प्रसिद्धीला आलेला नेफा (नॉर्थ ईस्ट फ्रॉंटियरचा म्हणजे ईशान्य सरहद्दीवरचा मुलूख) हा ह्या आसाम

राज्यातीलच्च आहे. पाकिस्तान, चीन आणि ब्रह्मदेशाला लगत असल्यामुळे ह्या राज्यातील लोकांनाही नेहमी सावध असावे लागते.

आसाम म्हणजे असम. सम म्हणजे सारखे. डोंगर आणि दऱ्याखोऱ्यांनी व्यापलेला असा हा प्रदेश असल्याने तो असम आहे. ह्या भागात पाऊसही फार पडतो. जगातील सर्वात जास्त पाऊस पडणारे चेरापुंजी हे ठिकाण आसाम-मधीलच्च. ह्या राज्यातून ब्रह्मपुत्रा ही फार मोठी नदी वाहात जाते आणि तिला वरचेवर मोठमोठे पूर येत असल्यामुळे वरचेवर धोका निर्माण होतो. गोहत्ती, दिब्रूगढ वगैरे ठिकाणे ह्या धोक्यात सापडतात.




चहाचा मळा–वेचणी

ह्या राज्यात देशातील मोठे चहाचे मळे आणि तेलाच्या बऱ्याच खाणी आहेत.

ह्या राज्यातील स्त्रिया फार सुंदर आहेत. त्यांचे मणीपुरी नृत्य प्रसिद्ध आहे. म्हणून ह्या राज्याला पूर्वी कामरूप हे नाव होते. ह्या राज्यातील प्रसिद्ध देवीचे नावही कामाख्या असे आहे. असे म्हणतात की, पूर्वीच्या काळी ह्या राज्यात बाहेरून गेलेले पुरुष सहसा परत येत नसत !


ओरिसा—बिहारच्या दक्षिणेला असलेले आणि पूर्वी बिहारमध्येच असलेले हे एक आपल्या देशातील लहानसे पण प्रसिद्ध राज्य आहे. ह्या राज्यात लोखंडाच्या व दगडी कोळशाच्या खाणी आहेत, कारखानेही आहेत. जगन्नाथ-पुरी हे ह्या राज्यातील तीर्थ देशामध्ये प्रसिद्ध आहे. ह्या राज्यातील कोणार्क येथील सूर्याचे देऊळ व चक्र प्रसिद्ध आहे. ह्या राज्यातून महानदी नावाची एक मोठी नदी वाहाते व तिच्या काठी कटक हे प्रसिद्ध बंदर आहे. तथापि देशातील दुष्काळी भागांपैकी हा एक भाग मानला जातो ! उत्तरेकडील बिहार प्रांतातही पूर्वी अनेक वेळा दुष्काळ पडलेला होता.



जगन्नाथपुरी—मंदिर

गुजराथ :—हे भारतातील एक महत्त्वाचे राज्य आहे. गुजराथ आणि त्याच्या लगतच उत्तरेला असलेला मारवाड भाग यातील लोक आपल्या देशातील मोठे व्यापारी लोक आहेत. आपल्या देशात क्वचितच एकादे ठिकाण असेल की, जेथे गुजर आणि मारवाडी यांचे दुकान नाही. देशातील मोठे कारखानदार आणि पर-

देशाशी व्यवहार करणारे लोकही मुख्यतः हेच आहेत. आपल्या देशाच्या पश्चिमेला असलेल्या अरबी समुद्राच्या पलीकडे आफ्रिका खंडातील बऱ्याच देशांतून व्यापाराच्या निमित्ताने एथील लोक जाऊन राहिलेले आहेत. ह्या राज्याच्या राजधानीचे शहर अहमदाबाद. एथे अनेक कापड गिरण्या आहेत. हे मोठे व्यापारी शहर आहे.



महात्मा गांधी

साबरमती नदीच्या काठावर हे शहर आहे. ह्या शहराच्या पलीकडेच नदीकाठी महात्मा गांधींचा साबरमती आश्रम होता. महात्मा गांधींना आपण राष्ट्रपिता समजतो. गांधी म्हणजे गुजराथने राष्ट्राला दिलेली फार मोठी देणगी होय. गुजराथच्या काठेवाड भागाच्या पश्चिमेकडील पोर-बंदर एथे गांधीजींचा जन्म झालेला होता. सरदार वल्लभ

भाई पटेलसारखा पोलादी पुरुषही गुजराथनेच पुरविला. आजचे राजकारणी पुरुष मोरारजीभाई देसाई ह्याच गजराथेतील. संत नरसी मेहता हा साधु पुरुष ह्याच राज्यातील; आणि प्रसिद्ध सोरठी सोमनाथचे मंदीर व श्रीकृष्णाची द्वारका ह्याच राज्यात आहेत. ज्या संस्थानाने देशाला प्रगतीचा मार्ग दाखविला ते बडोदे संस्थान आता



गरबा नाच

ह्याच राज्यात सामील झालेले आहे. श्रीमंत सेना खासखेल सयाजीराव महाराज गायकवाड यांनीच शिक्षणाच्या व इतर सोईवरून बडोद्याचे नाव गाजविले. भगवान श्रीकृष्णाचा जन्म मथुरेजवळ गोकुळात झाला असला आणि त्याचे लहानपण तेथेच गेले असले तरी त्याच्या आयुष्याचा बाकीचा भाग द्वारकेला गेलेला अस-

त्याने श्रीकृष्णाची पूजा अर्चा व भक्ती या भागातही केली जाते. गुजराथी स्त्रियांचा गरबा नाच ह्याच कृष्णभक्तीतून निर्माण झालेला आहे. गुजराथेत व त्याच्या दक्षिणेस महाराष्ट्रात भिल्ल लोक बरेच आहेत. ह्या भिल्लांच्या सुधारणेसाठी कै. ठक्कर बाप्पानी आपले आयुष्य वेचले.



एक भिल्ल जोडपे

<u>महाराष्ट्र</u> :—महाराष्ट्र हे आपले राज्य आहे. उत्तर आणि दक्षिण भारताच्या मध्यभागी असल्यामुळे आणि दोहो बाजूंशी त्याचे दळणवळण व इतर संबंध असल्यामुळे देशाचा समतोल टिकविण्याची जबाबदारी त्याच्यावर आहे. मागे सांगितल्याप्रमाणे आर्य आणि द्रविड दोन्ही वंशांचे रक्त महाराष्ट्रीय लोकांत असल्यामुळे उगीच वांशिक (वंशाचा) अभिमान त्याच्या ठायी नाही. महाराष्ट्रात डोंगर बरेच असल्यामुळे व खडकाळ जमीनही बरीच असल्याने तो पंजाबसारखा सुपीक नाही, तथापि शूरपणात पंजाबला

काही तो हार जाणारा नाही. इंग्रजांच्या ताब्यात भारत देश असताना १९१४ ते १९१८ व १९३९ ते १९४५ पर्यंत जी दोन मोठी जागतिक युद्धे झाली, त्यांमध्ये इंग्रजांच्या बाजूने लढणाऱ्या सैन्यातील मराठा शिपायांनी जगाला दिपविणारी बहादुरी गाजविली होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी तर मोगल व इतर मुसलमान बादशाहांच्या तावडीतून महाराष्ट्र देश केवळ येथील मावळचा शेतकऱ्यांच्या मदतीने स्वतंत्र केला होता.



छत्रपती शिवाजी महाराज

देशाच्या स्वातंत्र्याच्या लढ्यातही येथील लोकांनी मोठ्या प्रमाणावर भाग घेतला होता; आणि १९६२ साली चीनने देशावर स्वारी केली, तेव्हा पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी महाराष्ट्राचे त्यावेळचे मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांना संरक्षण मंत्री म्हणून दिल्लीस नेले होते. आजही श्री. यशवंतराव चव्हाण अर्थ मंत्री म्हणून दिल्लीस कारभार करीत आहेत.

महाराष्ट्राची राजधानी मुंबई शहर तर आपल्या देशामध्ये प्रसिद्धच आहे. ते फार चांगले बंदर आहे आणि त्यामुळे साऱ्या जगाशी एथून व्यापार चालतो. जगातील सर्व देशांतील लोक या ना त्या कारणाने मुंबईस येऊन राहिलेले आहेत; आणि त्यामुळे त्याला एक आगळेच महत्त्व प्राप्त झालेले आहे. देशातील सर्वात जास्त कापडाच्या गिरण्या मुंबईला आहेत आणि मुंबईत व आसपास दूरवर अनेक प्रकारचे उद्योगधंदे व कारखाने निघालेले आहेत. महाराष्ट्रातील दुसरे मोठे शहर पुणे हे विद्येचे माहेरघर म्हणून प्रसिद्ध आहे. विदर्भातील नागपूरही प्रसिद्ध शहर आहे. महाराष्ट्रात नवीन सामील झालेले विदर्भ व मराठवाडा हे भाग धान्ये व कापूस यांच्या पिकासाठी प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्रातील वेरूळ व अजंठा एथील कोरीव लेणी पाहाण्यासारखी आहेत.




वेरूळचे कैलास लेणे

दक्षिण भारतातील म्हैसूर, आंध्र, तामीळ नाडू व केरळ ही राज्ये ही देशातील महत्त्वाची केंद्रे आहेत. ह्या राज्यांतील लोक बहुतांशी


द्रविड वंशाचे आहेत; आणि त्यांच्या भाषाही उत्तरेकडील सर्व राज्यांपेक्षा वेगळ्या अशा आहेत. इतर सर्व राज्यांमध्ये देवनागरी लिपी (उत्तरेकडील काहीशा भागातील उर्दू लिपी सोडून) चालते आणि त्यांच्या भाषा संस्कृतला जवळच्या असल्यामुळे त्यांच्यामध्ये फारसा फरक नाही. पण दक्षिणेकडील ह्या चार राज्यांतील लोकांच्या भाषा व त्यांची लिपी ही निराळीच आहे. तथापि ह्या राज्यांतील लोकांचा धर्म व त्यांची संस्कृती ही उत्तरेकडील लोकांच्या सारखीच असल्यामुळे हे दक्षिणेकडील लोक भारतीयच राहिलेले आहेत. आणि बंगाली लोकांप्रमाणे दक्षिणेकडील समुद्रालगतचे लोक भात व मासे खाणारे असल्यामुळे ते अधिक तल्लख बुद्धीचे व हुषार आहेत. त्यांच्यामध्ये चंद्रशेखर रामन सारखे शास्त्रज्ञ आणि विश्वेश्वरअय्यासारखे प्रसिद्ध इंजिनियर निर्माण झालेले आहेत. मागे सांगितले आहेच की, हिंदू धर्माला नवीन स्वरूप प्राप्त करून देणारे पहिले शंकराचार्य हे ह्या भागातीलच केरळमधील. म्हैसूर राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर वीज निर्माण करण्यात आलेली आहे, त्यामुळे ह्या राज्यामध्ये कारखाने बरेच निघालेले आहेत. म्हैसूर व बंगलोर ही शहरे या दृष्टीने महत्त्वाची आहेत. बंगलोरच्या कारखान्यातील विमानांनीच १९६५ सालच्या पाकिस्तान युद्धात महत्त्वाची कामगिरी बजावली आहे.

म्हैसूर राज्यातील चंदन जगप्रसिद्ध आहे. आंध्र राज्यामध्ये तांदळाचे मोठे उत्पन्न होते. आंध्रमधील रेड्डी हे कर्तबगार शेतकरी आहेत. आणि ह्या राज्यातील हैद्राबाद हे फार प्रसिद्ध शहर आहे, एथील सालारजंग म्युझियमही प्रसिद्ध आहे. ह्या राज्यातील तेलंगी ब्राह्मणही देशभर प्रसिद्ध आहेत. आपले माजी राष्ट्राध्यक्ष व मोठे विद्वान गृहस्थ डॉ. राधाकृष्णन आंध्रमधीलच. आंध्रमध्ये विशाखापट्टण एथे बोटी बांधण्याचा मोठा कारखाना आहे. म्हैसूर राज्यातील उडुपी ब्राह्मणांनी हॉटेलचा धंदा सर्व देशभर चालविलेला आहे.



विमान कारखाना

केरळ हा प्रदेश अतिशय दाट वस्तीचा आहे; आणि त्यामुळेच गरीब लोकांची वस्ती ह्या प्रदेशात जास्त आहे. तथापि फार प्राचीन काळापासून




बोटी बांधण्याची गोदी

जगाशी—विशेषतः युरोपियन लोकांशी येथील लोकांचा संबंध आल्यामुळे ह्या राज्यात शिक्षणाचा प्रसार फार झालेला आहे. देशामधील पुष्कळ कारखान्यातून व सरकारी नोकरीतून येथील अय्यर, अय्यंगार व मेनन हे लोक दिसून येतील. केरळी कथ्यक नृत्य प्रसिद्ध आहे. सामान्य लोकांच्या गरिबीमुळे कम्युनिस्ट विचारसरणीचे लोक ह्या राज्यामध्ये फार आहेत. केरळचा समुद्र किनारा सुंदर आहे. तामीळनाडू हे अगदी दक्षिणेकडील राज्य. येथील लोकांच्या तामीळ भाषेमुळे अलीकडेच ह्या राज्याला तामीळनाडू नाव देण्यात आलेले आहे. पूर्वी ह्याला राजधानीच्या शहरावरून




कथ्यक नृत्य



केरळचा समुद्र किनारा

मद्रास राज्य म्हणत होते. मद्रासी लोकही चांगले विद्वान आहेत. आणि त्यांची राहणी साधी असल्यामुळे व भात आणि मासे मिळाले, नुसता भात भरपूर मिळाला, तरी त्यांचे भागत असल्यामुळे व तिकडील उष्ण हवेमुळे, एक सदरा व एक लुंगी एवढ्या कपड्यावर त्यांचे भागत. म्हणून हे लोक साधारणपणे कमी पगारावर कोठेही काम करावयास जाण्याला राजी होतात. त्यामुळे सरकारी नोकरीत व इतर ठिकाणीही ह्या लोकांचा भरणा बराच दिसून येतो. पूर्वीच्या काळी जावा, सुमात्रा, बाली वगैरे पूर्वेकडील बेटां-मधून गेलेले हिंदू लोक मुख्यतः तामीळनाडूमधीलच. आजही दक्षिणेकडील सिलोन बेटात बरेच तामीळ भाषी लोक असलेले दिसून येतात. ह्या राज्यात हिंदूंची फार मोठमोठी देवळे आहेत; आणि त्या देवळासमोरची गोपुरेही फार मोठी व सुंदर आहेत. मदुरा येथील मीनाक्षीदेवीचे देऊळ तर जगप्रसिद्ध आहे. हे राज्य आपल्या देशातील



मीनाक्षी मंदिर

अगदी दक्षिणेकडचे राज्य आहे. ह्याचे दक्षिण टोक कन्याकुमारी हे एक प्रसिद्ध ठिकाण आहे. कन्याकुमारीच्या तिन्ही बाजूला समुद्र आहे. आणि येथे कन्याकुमारी देवीचे देऊळ आहे. ह्या देवीच्या समोरच्याच टेकडीवर नुकताच स्वामी विवेकानंदांचा पुतळा बसविलेला आहे. ह्या राज्यातील रामेश्वर हे चारी धामांपैकी एक यात्रेचे ठिकाण आहे; आणि तंजावर हे शिवाजी महाराजांचे वडील शहाजी राजे यांनी मराठी राज्याची दक्षिणेकडील राजधानी केलेले एक ठिकाण आहे.

## १०. सुधारणेच्या काळात

आपला देश जुन्या काळात चांगला सुधारलेला होता आणि एकप्रकारे साऱ्या जगाचा गुरु होता, हे खरे असले, तरी अलीकडच्या काळात तो मागे पडला आणि अजूनही बराचसा मागेच आहे. तथापि स्वातंत्र्य मिळाल्यापासून आपण बरीच प्रगती केलेली आहे, यातही शंका नाही.

निरनिराळ्या यंत्रांचे व ती यंत्रे चालविण्यासाठी लागणाऱ्या शक्तींचे शोध लागले, तेव्हापासून जगाची सुधारणा झपाट्याने व्हायला लागली, पण ह्या काळात आपला देश परक्यांच्या ताब्यात असल्यामुळे आपण ह्या सुधारणा लवकर आपल्याशा करू शकलो नाही.

सुधारणा म्हणजे आपले रोजचे जीवन आहे ते अधिक सुखाचे व्हावे म्हणून माणसाने केलेले प्रयत्न. केवळ आपल्या शक्तीने आपण जी कामे करीत होतो, ती कामे यंत्रांच्या मदतीने थोड्या वेळात, अधिक चांगल्या रीतीने व खूप मोठ्या प्रमाणात होऊ लागल्यापासून माणसाच्या अलीकडील सुधारणेला सुरवात झाली.

काही काळ श्रीमंती भोगलेल्या कुटुंबात पुढे चैनी व आळशी पिढी निपजते आणि त्या कुटुंबाची स्थिती

खालावते, तसे आपल्या देशाचे घडलेले आहे. पूर्वीच्या काळी आपल्या देशातही यंत्रे वगैरे चांगली होती, असे त्या काळच्या ग्रंथांवरून दिसते. शस्त्रे आणि अस्त्रे म्हणजे हातात धरून लढण्याची हत्यारे व फेकून मारण्याची साधने आपल्या देशात तयार होत होती. अग्न्यस्त्रे (अग्नी उत्पन्न करणारी, जाळपोळ करणारी साधने), पर्जन्यास्त्रे (पाऊस पाडणारी साधने), वाय्वस्त्रे (वायु किंवा वारा उत्पन्न करणारी अस्त्रे) आपल्या जवळ होती; वज्रासारखी कठीण अस्त्रे आमच्याकडे होती, असे जुन्या माहितीवरून दिसते. इतकेच नव्हे, तर लढाईत किंवा इतर काही कारणाने पाय कापून काढावा लागला, तर त्याच्या जागी लोखंडी पाय बसविण्याची अक्कलही आपल्या पाशी होती. विचाराची बैठक तर साऱ्या जगा-पेक्षा वरच्या दर्जाची होती. चांगली वस्त्रे आणि दाग-दागिने किंवा शोभेच्या वस्तूही भरपूर करता येत होत्या. म्हणूनच त्या काळी आपला देश इतर देशांच्या मानाने अधिक पुढारलेला होता. पण इसवी सनाच्या आठव्या नवव्या शतकापासून म्हणजे अकराशे बाराशे वर्षांपासून आपणाला एक प्रकारची मरगळ आली. आपण दैवावर हवाला ठेवणारे आणि आणि आळशी बनलो आणि वाड-वडिलांचे ज्ञान विसरून गेलो !

इंग्रजांनी आमचा देश जिंकून घेतला आणि आम्हांला

अधिकच दरिद्री बनविले, हे खरे असले, तरी त्यांनी पुन्हा आम्हांला सुधारलेल्या जगाची तोंडओळख करून दिली, हेही खरे आहे. सर्वसामान्य लोकांनाही त्यांनी शिक्षण द्यायला सुरवात केली आणि काहीं सुधारणाही ह्या देशात आणल्या.

आपल्या देशात रेल्वे मार्ग इंग्रजांनीच बांधले. इ. स. १८५३ साली मुंबई ते ठाण्यापर्यंत त्यांनी आगगाडी सुरू केली व पुढे साऱ्या देशभर रेल्वेचे जाळे पसरले. आज आपण त्याचा फायदा घेत आहो. आपण आणखी काही नवे रेल्वेमार्ग सुरू केले आहेत. आता आपण रेल्वेची इंजिने व वाघिणीही तयार करीत आहोत.

दळणवळणाची साधने भरपूर व चांगल्या प्रतीची असणे हे देशाच्या सुधारणेचे एक महत्त्वाचे अंग आहे. या दृष्टीने रेल्वेला फार महत्त्व आहे. १९६८–६९ साली आपल्या देशामध्ये ६००१४ किलो मीटर लांबीचे रेल्वे रस्ते होते. त्यासाठी १३.५ लाख लोक रेल्वेकडे नोकरीस होते आणि ३७९७·२ कोटी रु. भांडवल गुंतवलेले होते. ह्यावर्षी देशामध्ये दररोज १०००० आगगाड्या धावत होत्या; आणि त्या रोज ६१ लाख प्रवासी व ५·५९ लाख टन माल यांची ने-आण करीत होत्या. ह्या वर्षीचे वार्षिक उत्पन्न ९००·९० कोटी रुपयांचे होते, यावरून ह्या अवाढव्य व्यवहाराचे चांगले दर्शन होईल. गेल्या दोन

तीन वर्षांत अर्थातच ह्यामध्ये आणखी वाढ झालेली आहे.

रेल्वे होण्यापूर्वी पक्क्या आणि कच्च्या सडकांचा व पायवाटांचा उपयोग देशभर होत होता. आजही तो चालू आहे. पण आता ह्या सडकांपैकी बऱ्याच सडका डांबरी किंवा काँक्रीटच्या झालेल्या असून त्यांवरून आता बैल-गाडी, घोडा गाडी, घोडे यांच्या शिवाय मोटारी व ट्रक्स-ही धावू लागले आहेत. सायकली व रिक्षा यांचाही उप-योग लोक करीत आहेत. १९६९ साली देशात ३२४९४० किलो मीटर लांबीच्या चांगल्या पक्क्या सडका होत्या व ६४७३९० किलो मीटर लांबीच्या कच्च्या सडका होत्या. मार्च १९६८ मध्ये १३·३३ लाख मोटारी, ३·४७ लाख मोटरसायकली व ऑटोरिक्षा, ५·२३ लाख खासगी मोटारी व जिप्स, ८२६०० सार्वजनिक बसेस, २·८६ लाख ट्रक्स (माल मोटारी) याशिवाय ९५ हजार इतर वाहाने ह्या रस्त्यांवरून ये–जा करीत होती.

जलमार्ग :—समुद्रातून आणि नद्या व त्यांचे कालवे यांमधूनही माणसांचे व मालाचे जाणे–येणे सध्या चालू आहे. पाण्यावरून तराफे व होड्या यांच्या साह्याने प्राचीन काळापासून लोक जा–ये करीत आहेत. १ मार्च १९७० रोजी २३·२९ लाख टन वजनाच्या २५८ बोटींतून आपल्या देशाचे दळणवळण घडले. पैकी देशाच्या किनाऱ्या-किनाऱ्याने ८१ बोटी व परदेशाशी व्यवहार करणाऱ्या

१७७ बोटी चालू होत्या. नद्या आणि त्यांचे कालवे यांतून १४००० किलोमीटर वाहतूक या वर्षी घडली. यामध्ये ३५०० मोटर बोटींनी व बाकीची साध्या नावांनी झाली. कलकत्ता, मुंबई, मद्रास, मार्म गोवा, कोचीन, विशाखापट्टण, कांडला व परदीप ही आपल्या देशातील चांगली बंदरे आहेत.

विमाने–आता आपल्या देशामध्ये विमान-वाहतूकही चांगल्या प्रकारे चालू झालेली आहे. १९६९ साली ७·१८ कोटी किलोमीटरचा प्रवास ह्या विमानांनी केला असून २५·५० लाख प्रवाशांची व ५४२ लाख किलोग्रॅम सामानाची त्यांनी ने-आण केली आहे. आता ह्या वाहतुकीत आणखी वाढ झालेली आहे. नुकतेच एक मोठे जंबो जेट विमान इंडियन एअर लाईन्सने म्हणजे आपल्या देशाने विकत घेतलेले आहे व असली आणखी विमाने घेण्यात येणार आहेत. लष्कराकडील विमानांचा अर्थात याच्याशी काही संबध नाही.

पोस्ट, तार, रेडिओ, टेलिफोन आणि टेलिव्हिजन यांची सोयही दळणवळणाचीच सोय आहे. इंग्रजांनी रेल्वेच्या अगोदरच पोस्टाची आणि तारेचीही सोय आपल्या देशात करून ठेवली होती. रेडिओ, टेलिफोन व टेलीव्हिजन ही साधने त्या मानाने अलीकडेच प्रचारात आलेली आहेत. १९६९ सालात देशामध्ये १३२८३८ ठिकाणी पोस्ट ऑफिसे

होती; या सर्व ऑफिसांतून १९६८–६९ सालात मनी-ऑर्डरीसुद्धा ६०५·६० कोटी कागदांचा व्यवहार झाला, म्हणजे कार्डे पाकिटे मनीऑर्डरी, पार्सले वगैरे आली गेली; आणि त्यांमुळे पोस्ट खात्याला ९३·९८ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले. १९६८–६९ साली देशात १४५९४ तार ऑफिसे होती व त्यांचे उत्पन्न २२·५२ कोटी रुपयांचे झाले. तसेच ह्या साली देशात १११९००० लोकांजवळ टेलिफोन होते व त्यांच्यापासून ९२·२६ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले. रेडिओ जवळ बाळगणारांना पोस्टात फी भरून लायसेन्स घ्यावे लागते. ३१ डिसेंबर १९६९ रोजी अशा लायसेन्सधारकांची संख्या १००३४९६० होती; आणि टेलिव्हिजन सेट्स घेतले-ल्यांची संख्या १२३०३ होती. रेडिओचा प्रसार आता खेडोपाडीही झालेला आहे. टेलिव्हिजनचा मात्र अजून फार कमी आहे. दिल्ली आणि दिल्लीच्या आसपास व काही मुंबईत एवढाच अजून त्याचा पसारा आहे. टेलि-व्हिजनमध्ये पडद्यावर देखावे दिसतात व आवाजही ऐकू येतो. रेडिओमध्ये नुसता आवाज ऐकू येतो.

ह्या सुधारणांशिवाय अलीकडे आपल्या देशामध्ये नद्या आडवून मोठमोठी धरणे बांधली आहेत आणि ह्या धरणांजवळच विजेचीही केन्द्रे अनेक ठिकाणी तयार केली आहेत. ह्याशिवाय कोळशाच्या व तेलाच्या उष्णतेच्या

साह्याने ही वीज उत्पन्न करण्यात येत आहे. वीज ही फार मोठी शक्ती आहे. तिच्या साह्याने केवळ दिवे लावून घरच उजळून निघत नाही, तर शेकडों उद्योगधंदे निघून देशही प्रकाशात येत आहे. हरियाना राज्याने प्रत्येक गावात वीज नेऊन आपल्या देशात सगळ्यात पुढे पाऊल टाकले आहे. आपल्याकडेही आता पुष्कळ गावांना वीज मिळाली आहे आणि शेकडो कारखान्यांनाच नव्हे तर हजारो शेतकऱ्यांच्या विहिरीवर पाणी उपासण्यासाठीही आता वीज उपयोगात येत आहे.

पाणी पुरवठा आणि वीज :—स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ह्या कामाला खरा जोर चढला. पूर्वी २.२ कोटी हेक्टर ( १ हेक्टर म्हणजे २.५ एकर) जमिनीला पाणी मिळत होते ते आता ३.७२ कोटी हेक्टर जमिनीस पाणी मिळत आहे; आणि पूर्वी देशामध्ये २० लाख किलोवॅट वीज उत्पन्न होत होती, ती आता १.५५ कोटी किलोवॅट मिळू लागली आहे. ह्या संबंधातील योजना हाती घेऊन पार पाडल्या आहेत त्या अशा :—

| | |
|---|---|
| नागार्जुन सागर योजना– | आंध्र राज्य |
| तुंगभद्रा योजना– | म्हैसूर राज्य. |
| गंडक योजना– | उत्तर प्रदेश व बिहार. |
| कोसी योजना– | बिहार. |
| काकरापारा योजना– | गुजराथ. |

| | |
|---|---|
| उकाई योजना– | गुजराथ. |
| पेरियर खोरे योजना– | केरळ. |
| चंबळ योजना– | मध्यप्रदेश आणि राजस्थान |
| गिरणा योजना– | महाराष्ट्र. |
| पूर्णा योजना– | महाराष्ट्र. |
| भद्रा योजना– | म्हैसूर |
| उत्तर कृष्णा योजना– | म्हैसूर. |
| मलप्रभा योजना– | म्हैसूर. |
| हिराकूद योजना– | ओरिसा. |
| भाक्रानानगल योजना– | पंजाब, हरियाना व राजस्थान. |
| बियास योजना– | पंजाब, हरियाना व राजस्थान. |
| राजस्थान मध्यवर्ती योजना- | राजस्थान. |
| पारांबिकुलम अलियार ,, – | तामीळनाडू व केरळ. |
| रामगंगा योजना– | उत्तर प्रदेश. |
| मयूराक्षी योजना– | पश्चिम बंगाल. |
| फराक्का योजना– | पश्चिम बंगाल. |
| दामोदर खोरे योजना– | पश्चिम बंगाल व बिहार. |

मुख्यतः वीज तयार करणाऱ्या योजना आहेत त्या अशा :—

| | |
|---|---|
| मचुकुंद योजना– | आंध्र राज्य |

| | |
|---|---|
| श्रीशैलम हायड्रो इलेक्ट्रिक (पाण्यावरची) योजना— | आंध्र राज्य |
| कठगुदाम थर्मल (उष्णतेवरचे) वीजकेंद्र— | आंध्र राज्य |
| खालची शिलेरू हायड्रो इले. योजना— | आंध्र राज्य |
| नाहर कटिया थर्मल योजना— | आसाम |
| बरौनी थर्मल वीजकेंद्र— | बिहार |
| पत्रातु थर्मल वीजकेंद्र— | बिहार |
| ध्रुवारण (खंबायत) थर्मल वीजकेंद्र— | गुजराथ |
| इड्डिकी हायड्रो इले. योजना— | केरळ |
| सातपुडा थर्मल वीजकेंद्र— | मध्य प्रदेश |
| कोयना योजना— | महाराष्ट्र |
| नागपूर (कराडी) थर्मल केंद्र— | महाराष्ट्र |
| शरावती हायड्रो इले. योजना— | म्हैसूर |
| तालचेर थर्मल केंद्र— | ओरिसा |
| बालमोला धरण व हायड्रो इले. योजना— | ओरिसा |
| एन्नोर थर्मल वीज केंद्र— | तामीळ नाडू |
| मेट्टूर टनेल (बोगदा) हायड्रो इले. योजना— | तामीळ नाडू |
| यमुना हायडल योजना— | उत्तर प्रदेश |
| रिहांद बंधारा योजना— | उत्तर प्रदेश |

| | |
|---|---|
| ओब्रा थर्मल वीज केंद्र– | उत्तर प्रदेश |
| बंदेल थर्मल वीज केंद्र– | पश्चिम बंगाल |
| संतालदिह थर्मल वीज केंद्र– | पश्चिम बंगाल |
| बदरपूर थर्मल वीज केंद्र– | दिल्ली |
| बेरा–शिऊल योजना– | हिमाचल प्रदेश |
| सालोल हायड्रो इले. वीज केंद्र– | जम्मू आणि काश्मीर |
| लाक्तक योजना– | मणिपूर |
| भाटिंडा थर्मल वीज केंद्र– | पंजाब |

ह्याशिवाय मुंबईजवळ ट्रॉम्बे येथे आणि नंतर उत्तरेला गुजराथ राज्याच्या सरहद्दीजवळ तारापूर येथे अणूपासून वीज तयार करण्याची योजना अमलात आणलेली आहे. अणूशक्तीची योजना आपले पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या इच्छेप्रमाणे डॉ. होमी जे. भाभा यांनी अमलात आणलेली आहे. आता पंडित नेहरू किंवा डॉ. भाभा हयात नाहीत, पण ह्या योजनेचे काम डॉ. विक्रम साराभाई यांच्या नेतृत्वाने सुरळीतपणे चाललेले आहे. यावरून दिसून येईल की आपला देशही सुधारणेच्या काळात फारसा मागे राहिलेला नाही.

स्वातंत्र्यानंतर शिक्षणाच्या क्षेत्रातही आपण पुष्कळ प्रगती केलेली आहे. लिहिता वाचताही न येणाऱ्या म्हणजे निरक्षर लोकांची संख्या आता बरीच कमी होत आलेली आहे. सबंध देशभर लोकांत जागृती निर्माण झालेली असून

सर्व प्रकारच्या शिक्षणाच्या सोई आता देशामध्ये विद्यार्थ्यांना मिळत आहेत. आपल्या देशात शिक्षण घेतलेले पुष्कळ विद्यार्थी परदेशीही वरच्या प्रतीचे किंवा वेगळ्या प्रकारचे शिक्षण घेण्यासाठी जात आहेत आणि तेथे ते नाव कमवीत आहेत. आपल्या देशात आता शास्त्रीय व इतर संशोधनामध्येही पुष्कळ विद्वान गढलेले आहेत. त्यांच्यासाठी स्वतंत्र संस्था–संशोधन शाळा–काढण्यात आलेल्या आहेत. पुण्याजवळ पाषाण येथे अशा प्रकारची नॅशनल केमिकल लॅबोरेटरी ही संस्था चांगले काम करीत आहे. पनवेल जवळची ‘ रासायनी ’ही अशीच महत्त्वाची आहे.

अलिकडे रशिया व अमेरिका या राष्ट्रांनी अवकाश संशोधनात फार मोठी आघाडी मारलेली आहे. त्यांची आकाशयाने आता चंद्रापर्यंत जाऊन आली आहेत आणि मंगळापर्यंत जाण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे. आकाशातील वातावरणाचाही अभ्यास त्यांचे संशोधक करीत आहेत; आणि आकाशात उपग्रह सोडून जगातील बातम्या एका क्षणात सगळीकडे पोचविण्यातही त्यांनी यश मिळविले आहे. अमेरिकेतील अशा प्रकारच्या संशोधकांत आपल्या देशातीलही काही लोक आहेत; आणि आपण केरळ मधील थुंबा येथे या प्रकारचे काम छोटया प्रमाणात का होईना सुरूही केलेले आहे. तेथून आकाशात रॉकेट

सोडून सुमारे २०० किलोमीटर पर्यंतच्या वातावरणाचे संशोधन आपले संशोधक करीत आहेत. थोड्याच दिवसात एखादा उपग्रहही आपल्या ह्या केंद्रामार्फत सोडला जाईल.

लोकांच्या आरोग्याच्या संबंधातही आपण पुष्कळ संशोधन केलेले आहे. देशातून आता प्लेग नाहीसा झालेला आहे, हिवताप आणि कॉलरा यांनाही पुष्कळसे आटोक्यात आणले आहे. क्षयासारख्या भयानक रोगावरही औषधे शोधून काढली आहेत. पुण्याजवळ पिंपरी येथील हिंदुस्तान अँटी बायोटिक्स कारखाना व तसलाच उत्तर प्रदेशातील हृषीकेश येथील कारखाना या दृष्टीने चांगले काम करीत आहेत. पेनिसिलीन व स्ट्रेप्टोमायसिन ही औषधे आता मुदतीचा ताप (टायफॉईड) व क्षय यांवर गुणकारी ठरलेली आहेत. येथेच हेमायसिन म्हणून त्वचा रोगावरचे चांगले औषध शोधून काढण्यात आलेले आहेत. मुंबई येथील टाटा हॉस्पिटलमधील कॅन्सर रिसर्च इन्स्टिटयूट ही संस्था देशातील कॅन्सर रोगावर संशोधन व उपचार करणारी प्रसिद्ध संस्था आहे.

कलेच्या क्षेत्रातही आपला देश नाव कमावीत आहे. वेरूळ अजिंठ्याच्या लेण्या, सांचीचा बौद्ध स्तूप, अबू पर्वतावरील जैन मंदिरे, म्हैसूर राज्यातील बेळगोळ एथील बाहुबलीचा उंच पुतळा, तामीळनाडूमधील भव्य मंदिरे आणि आग्रा व फत्तेपूरशिक्री एथील ताजमहाल व इतर

इमारती पाहिल्या म्हणजे इमारती बांधणे, पुतळे तयार करणे, कोरीव काम व चित्रकला यांमध्ये आपला देश पूर्वी पासून प्रसिद्ध आहे. हे दिसून येईल.

नाटक सिनेमा क्षेत्रातही जगभर प्रसिद्धी पावलेले लोक आपल्या देशात आहेत. गायन वादन व नृत्य ह्या कलातील नामवंत लोक आपल्या देशात आहेत. ते परदेशात जाऊन मान्यताही मिळवून आले आहेत. सर्कस घेऊन जगभर फिरून आलेले आणि आपल्या जादूच्या विद्येने जगाला दिपवून टाकलेले लोकही एथे आहेत; आणि पैलवान म्हणून व क्रिकेट, हॉकी, टेनिस व फूटबॉल खेळात चमकणारे लोकही ह्या देशात आहेत.

आणि पूर्वी केवळ कच्चा माल परदेशाला रवाना करणारा, आपला देश आता चांगला पक्का मालही परदेशी पाठवू लागला आहे. रेल्वेच्या वाघिणी व इंजिने, साड्या व इतर तलम कापड, चप्पल बूट वगैरे चामड्याचे पदार्थ इत्यादि वस्तू सुधारलेल्या युरोपियन, रशियन व अमेरिकन देशालाही आता जात आहेत. गेल्यासाली आपण १५ अब्ज २० कोटींची निर्यात केली व १६ अब्ज १९ कोटींची आयात केली.

आणि अहिंसेच्या तत्त्वावर लढा देऊन देश स्वतंत्र करून दाखविणाऱ्या, महात्मा गांधीच्या किमयेचा उपयोग करून आफ्रिकेतील व इतर खंडातील अनेक देश आता

स्वतंत्र होऊन भारताला गुरु मानीत आहेत. जगात आता दिवसे दिवस आपल्या देशाला एक विशेष प्रकारचे स्थान प्राप्त होत आहे. ह्याचा स्वाभाविक परिणाम होऊन वंश, धर्म, जात वगैरेंचा अभिमान बाजूला ठेवून यापुढे भारत हा एकजुटीचा व बलाढ्य देश झालेला जगाला दिसेल, अशी खात्री वाटत आहे.

म. ग्रं. सं. ठाणे, [illegible]
क्र. [illegible] नों दि ..........
[illegible]

इकडे तिकडे

## भारताचा परदेशी व्यापार

### १९६८–६९ साल

| प्रमुख देश | निर्यात | आयात |
|---|---|---|
| | (आकडे लक्ष रुपयांचे) | |
| युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका | २०१५० | ५७५०६ |
| ग्रेट ब्रिटन | २३४२७ | १२७८ |
| सोव्हिएट रशिया | १४८३१ | १८५५ |
| जपान | १५८२३ | ११५३ |
| जर्मनी (फेडरल रिप०) | २६५० | ११९ |
| ऑस्ट्रेलिया | २५५० | २५७ |
| कॅनडा | २९७० | ९८७२ |
| फ्रान्स | २०१५ | ३६३९ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचन
अनुक्रम. [illegible] वि. [illegible]
क्रमांक... ३७५६ ...नोंद दि
IRBK-0114059

# सोन्याची पेंढी

...जमीन भरपूर पीक देते तेव्हा शेतकरी तिला 'सोने देणारी जमीन' असें म्हणतो. गोदावरी नदीच्या कांठी महाराष्ट्रांत अशा उत्कृष्ट जमीनीबाबत ह्या अर्थाची एक म्हणच आहे.

अलिकडल्या वर्षांत 'सोने देणारी जमीन' हा ...ोग देशाच्या अनेक भागांतल्या जमीनींसाठी ... त येऊ लागला आहे. सरकारी दप्तरांत ... ह्यांचा 'दुष्काळी भाग' म्हणून उल्लेख होता त्यांतही भरपूर पीक येऊ लागले आहे. प्रत्येक ...ंत भरपूर दाणे आणि प्रत्येक पेंढीला भाराभर ...स...प्रत्येक पेंढी म्हणजे 'सोन्याची गड्डीच'.

हें चांगल्या बी-बियाणांमुळें घडून आले कीं जास्त खतामुळें, जास्त पंप बसविल्याने कीं सुधारलेल्या शेतीमुळें? याचे उत्तर कांहींही असो. एक गोष्ट मात्र खरी कीं दोन वर्षांच्या अवर्षणानंतर आता भारत अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन करूं लागला आहे.

ह्याला हरित क्रांति म्हणा अगर म्हणू नका. गेल्या वर्षीं भारतांत १० कोटी टन...म्हणजे १९५० सालीं झालेल्या अंन्नधान्याच्या दुप्पट पीक निघाले.

मानवी जीवन अधिक सुखावह् करण्यासाठीं विज्ञानाचा उपयोग करून घेऊन आपण जेव्हां आगेकूच करीत आहोत तेव्हां आपणांस हे ठाऊक आहे की:

आजचा काल अधिक सुखाचा आहे
आणि यांतूनच
अधिकच उज्वल भविष्यकाळ येणार आहे,

• "आजचा भारत" ही पुस्तिका विनामूल्य मिळविण्यासाठी या पत्त्यावर लिहा — डी.ए.व्ही.पी., पी.टी.आय., बिल्डिंग, पार्लमेंट स्ट्रीट, नवी दिल्ली-१.



70/615

SAMAJ SHIKSHAN MALA
(Marathi Monthly)

Reg. No. M H 1110
जुलै ऑगस्ट १९७१


# आमचे उद्दिष्ट...

राज्याचा सर्वांगीण आर्थिक विकास करणे व जनतेला आर्थिक व सामाजिक न्याय मिळवून देणे हे आमचे ध्येय आहे. अल्प किंवा अत्यल्प भूमिधारक, भूमिहीन शेतमजूर, आणि अनुसूचित जाती व जमाती यांसारख्या आर्थिक व सामाजिक दृष्टया मागासलेल्या समाजांकडे आम्ही खास लक्ष पुरविले आहे. हे समाज आर्थिक दृष्टया स्वावलंबी होऊन त्यायोगे अधिक पुढारलेल्या वर्गांना मिळणारे फायदे त्यांनाही मिळावेत हे आमचे उद्दिष्ट आहे.

# सर्वांना आर्थिक व सामाजिक न्याय

प्रसिद्धी संचालक
महाराष्ट्र शासन
मुंबई.